दादा भगवान प्ररूपित

प्रतिक्रमण

(संक्षिप्त)



Marathi

दादा भगवान प्ररूपित

प्रतिक्रमण

(संक्षिप्त)

मूळ गुजराती संकलन : डॉ. नीरूबहन अमीन

मराठी अनुवाद : महात्मागण

प्रकाशक : **अजीत सी. पटेल**
दादा भगवान विज्ञान फाउन्डेशन,
1, वरूण अपार्टमेंट, 37, श्रीमाळी सोसायटी,
नवरंगपुरा पुलिस स्टेशनच्या समोर, नवरंगपुरा,
अहमदाबाद - 380009, Gujarat, India.
फोन : +91 79 3500 2100, +91 9328661166/77

प्रथम आवृत्ति : 1000 प्रती डिसेंबर 2012
रीप्रिंट : 5000 प्रती मे 2014 ते ऑगस्ट 2015
नवीन रीप्रिंट : 5000 प्रती जुलै 2023

भाव मूल्य : 'परम विनय' आणि
'मी काहीच जाणत नाही', हा भाव!

द्रव्य मूल्य : 40 रुपये

मुद्रक : अंबा मल्टीप्रिंट
एच.बी.कापडिया न्यू हाइस्कूलच्या समोर,
छत्राल-प्रतापपुरा रोड, छत्राल,
ता. कलोल, जि. गांधीनगर-382729, गुजरात
फोन : +91 79 3500 2142

ISBN/eISBN : 978-93-82128-14-4

Printed in India

त्रिमंत्र





नमो अरिहंताणं
नमो सिद्धाणं
नमो आयरियाणं
नमो उवज्झायाणं
नमो लोए सव्वसाहूणं
एसो पंच नमुक्कारो
सव्व पावप्पणासणो
मंगलाणं च सव्वेसिं
पढमं हवइ मंगलं ॥ १ ॥
ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥ २ ॥
ॐ नम: शिवाय ॥ ३ ॥
जय सच्चिदानंद





दादा भगवान कोण?

जून 1958 संध्याकाळची अंदाजे सहाची वेळ, सुरत स्टेशनवर अलोट गर्दी होती. रेल्वेच्या प्लेटफॉर्म नंबर तीनच्या बाकावर बसलेल्या श्री अंबालाल मूळजीभाई पटेल रूपी देहमंदिरात नैसर्गिक स्वरूपात कित्येक जन्मांपासून व्यक्त होण्यासाठी आतूर असलेले 'दादा भगवान' संपूर्णपणे प्रकट झाले आणि निसर्गाने सर्जन केले अध्यात्माचे अद्‌भुत आश्चर्य! एका तासात त्यांना विश्वदर्शन लाभले! मी कोण? भगवंत कोण? जग कोण चालवित आहे? कर्म म्हणजे काय? मुक्ती कशाला म्हणतात? इत्यादी जगातील सर्व आध्यात्मिक प्रश्नांची रहस्ये संपूर्णपणे प्रकट झाली.

त्यांना प्राप्ती झाली तशी ते फक्त दोन तासात इतर मुमुक्षूनां सुद्धा आत्मज्ञानाची प्राप्ती करवित असत, त्यांच्या सिद्ध झालेल्या अद्‌भुत ज्ञान प्रयोगाद्वारे! त्याला अक्रम (क्रमविरहीत) मार्ग म्हटले जाते. क्रम म्हणजे पायरी पायरीने, क्रमाक्रमाने वर चढणे! अक्रम म्हणजे लिफ्ट मार्ग! शॉर्ट कट!

ते स्वत: प्रत्येकाला 'दादा भगवान कोण?' याबद्दलची फोड करून देताना म्हणायचे की, ''हे दिसतात ते 'दादा भगवान' नाहीत. हे तर 'ए.एम. पटेल' आहेत. आम्ही ज्ञानी पुरुष आहोत आणि आत प्रकट झाले ते दादा भगवान आहेत. दादा भगवान तर 'चौदालोकाचे' नाथ आहेत, ते तुमच्यात पण आहेत, सर्वांमध्ये आहेत! तुमच्यात अव्यक्त रुपात आहेत आणि 'येथे' माझ्या आत संपूर्णपणे व्यक्त झालेले आहेत! मी स्वत: भगवान नाही. माझ्या आत प्रकट झालेले 'दादा भगवान' यांना मी पण नमस्कार करतो.''

आत्मज्ञान प्राप्तीची प्रत्यक्ष लींक

परम पूज्य दादा भगवान (दादाश्री) यांना 1958 मध्ये आत्मज्ञान प्रकट झाले. त्यानंतर 1962 ते 1988 पर्यंत देश-विदेश परिभ्रमण करून मुमुक्षुंना सत्संग आणि आत्मज्ञानाची प्राप्ती करवित असत.

दादाश्रींनी आपल्या हयातीतच आत्मज्ञानी पूज्य डॉ. नीरूबहन अमीन (नीरूमा) यांना आत्मज्ञान प्राप्त करवून देण्याची ज्ञानसिद्धी प्रदान केली होती. दादाश्रींच्या देहविलयानंतर नीरूमा त्यांच्याप्रमाणेच मुमुक्षुंना सत्संग व आत्मज्ञान प्राप्ती निमित्त भावाने करवित असत.

आत्मज्ञानी पूज्य दीपकभाई देसाई यांना सुद्धा दादाश्रींनी सत्संग करण्याची सिद्धी प्रदान केली होती. वर्तमानात पूज्य नीरूमांच्या आशीर्वादाने पूज्य दीपकभाई देश-विदेशात निमित्तभावाने आत्मज्ञान प्राप्ती करवित आहेत.

या आत्मज्ञान प्राप्तीनंतर हजारो मुमुक्षु संसारात राहून, सर्व जबाबदाऱ्या सांभाळत असताना सुद्धा आतून मुक्त राहून आत्मरमणतेचा अनुभव घेत आहेत.

निवेदन

ज्ञानी पुरुष संपूज्य दादा भगवान यांच्या श्रीमुखातून अध्यात्म आणि व्यवहारज्ञाना संबंधीत जी वाणी निघाली, तिला रेकॉर्ड करून संकलन व संपादन करून पुस्तकाच्या रूपाने प्रकाशित केले जात आहे. विभिन्न विषायांवर निघालेल्या सरस्वतीचे अद्‌भुत संकलन ह्या पुस्तकात झाले आहे, जे नवीन वाचकांसाठी वरदान रूप सिद्ध होईल.

प्रस्तुत अनुवादामध्ये विशेष लक्ष ठेवलेले आहे की प्रत्येक वाचकाला दादाश्रींची प्रत्यक्ष वाणीच ऐकली जात आहे असा अनुभव व्हावा. याच कारणाने कदाचित काही ठिकाणी अनुवादाची वाक्य रचना मराठी व्याकरणानुसार त्रूटीपूर्ण जाणवेल, परंतु तिथे जर आशय समजून वाचण्यात आले तर अधिक लाभदायी होईल.

प्रस्तुत पुस्तकात काही ठिकाणी कंसात दर्शविलेले शब्द किंवा वाक्य दादाश्रींद्वारा बोलल्या गेलेल्या वाक्यांना अधिक स्पष्टतापूर्वक समजावण्यासाठी लिहिले गेले आहेत. तसेच काही ठिकाणी इंग्रजी शब्दांना मराठी अर्थाच्या रूपात ठेवले गेले आहेत. दादाश्रींच्या श्रीमुखातून निघालेले काही शब्द जसेच्या तसेच *इटालिक्स* मध्ये ठेवलेले आहेत, कारण त्या शब्दांसाठी मराठी भाषेत असे शब्द नाहीत की जे त्याचा पूर्ण अर्थ देऊ शकतील. तरी पण त्या शब्दांचे समानर्थी शब्द कंसात तसेच पुस्तकाच्या शेवटी पण दिले गेले आहेत.

ज्ञानींच्या वाणीला मराठी भाषेत यथार्थ रूपाने अनुवादित करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु दादाश्रींच्या आत्मज्ञानाचा आशय जसा आहे तसा तर आपल्याला गुजराती भाषेतच अवगत होईल. ज्यांना ज्ञानाचा गहन अर्थ समजून घ्यायचा असेल, ज्ञानाचे खरे मर्म समजायचे असेल त्यांनी ह्या हेतूने गुजराती भाषा शिकावी असा आमचा अनुरोध आहे. अनुवादासंबंधी उणीवांबद्दल आपले क्षमा प्रार्थी आहोत.

❖❖❖❖❖

समर्पण

अतिक्रमणाची तांडे अनंत;
कर्मांचे क्षणोक्षणी होत आहे बंधन!

मोक्ष तो कुठे, धर्म धरे मौन;
पायवाट मार्गस्थ, चढवे कोण?

अक्रम विज्ञानी दादा तारणहार;
प्रतिक्रमणचे दिले हत्यार!

मोक्ष मार्गाचा खरा साथीदार;
ताज बनून शोभावे दादा दरबार!

'प्रतिक्रमण' संक्षिप्तात क्रियाकार;
सोडवे बंधन मूळ अहंकार!

प्रतिक्रमण विज्ञान अत्रे साकार;
समर्पण विश्वाला, मचाव जयजकार!

– डॉ. नीरूबहन अमीन

संपादकीय

अगदी मनापासून मोक्षमार्गावर जाणाऱ्या व्यक्तींना पदोपदी सतावणाऱ्या कषायांना मुळापासून नष्ट करण्यासाठी, व मोक्षमार्गावर प्रगती करण्यासाठी काही अचूक साधन हवे की नको? स्थूलतमपासून सूक्ष्मतमपर्यंतच्या संघर्षानां कसे टाळता येतील? आपल्याला किंवा आपल्याकडून अन्य व्यक्तीला दु:ख झाले तर त्याचे निवारण कसे करता येईल? कषायांची बॉम्बार्डिंग थांबविण्यासाठी किंवा ते पुन्हा होऊ नयेत यासाठी कोणते उपाय करता येतील? इतके धर्माने वागलो, जप, तप, उपवास, ध्यान, योग, इत्यादि सर्व केले, तरीही मन-वचन-कायेने होणारे दोष का थांबत नाहीत? अंतरशांती का लाभत नाही? कधीतरी स्वत:चे दोष दिसतात, तर त्यासाठी काय करावे? त्या दोषांना कसे दूर करावे? मोक्षमार्गावर पुढे जाण्यासाठी आणि संसारमार्गात सुख-शांती, मंद-कषाय व प्रेमभावाने जगण्यासाठी काही योग्य साधन तर पाहिजे ना? वीतराग भगवंतांनी धर्मसारामध्ये जगाला काय बोध दिला आहे? खरे धर्मध्यान कोणते? पापापासून परतण्यासाठी एखादा अचूक मार्ग आहे का? असेल तर तो दिसत का नाही?

धर्मशास्त्रात लिहिलेले बरेच काही वाचले जाते, तरीही ते जीवनात का उतरत नाही? साधू, संत, आचार्य, कथाकार वगैरे इतका उपदेश देतात परंतु ते जीवनात परिणमित होण्यासाठी काय कमी पडते? प्रत्येक धर्मात बऱ्याच प्रकारच्या क्रिया केल्या जातात, अनेक प्रकारचे जप, तप, नियम, अस्तित्वात आहेत, तरीही ते का फलदायी ठरत नाहीत? कषाय का कमी होत नाहीत? दोषांचे निवारण का होत नाही? याची जबाबदारी आसनस्थ उपदेशकांची नाही का? हे असे जे लिहिले जात आहे ते द्वेष किंवा वैरभावाने नसून करुणा भावाने आहे, तरीही त्यातून मुक्त होण्यासाठी काही उपाय आहे की नाही? अज्ञान दशेपासून ज्ञान दशा आणि थेट केवळ ज्ञान स्वरूप दशेपर्यंत पोहोचण्यासाठी ज्ञानींनी, तीर्थंकरानी कोणते निर्देश दिले असेल? ऋणानुबंध व्यक्तींकरिता असलेल्या राग किंवा द्वेषाच्या बंधनातून मुक्त होऊन वीतरागता कशी प्राप्त करावी?

'मोक्ष मार्ग शूरांचा आहे, तिथे भित्र्यांचे काम नाही', परंतु शौर्याचा उपयोग कुठे करावा की ज्यामुळे शीघ्रतिशीघ्र मोक्षप्राप्ती होईल? भित्रेपणा कशास म्हणावे? पापी पुण्यशाली बनू शकतात का? कशा प्रकारे बनू शकतात?

सारे जीवन या RDX च्या अग्निमध्ये जळत आहे, तो अग्नि कसा विझवावा? रात्रंदिवस पत्नीचा जाच, मुला-मुलींचा संताप, आणि पैसे मिळवण्यासाठी उपद्व्याप, या सर्व त्रासांपासून शांती मिळवून जीवन नौका कशी पार करता येईल?

गुरु आणि शिष्यांमध्ये, गुरुमाता आणि शिष्यांमध्ये, निरंतर होणाऱ्या कषायात अडकलेले उपदेशक परत कसे फिरू शकतील? बिनहक्काची लक्ष्मी आणि बिनहक्काच्या स्त्रीयांबाबत वाणी-वर्तन किंवा मनाने किंवा दृष्टीने दोष झाले असतील तर त्याला तिर्यंच अथवा नरकगतीशिवाय दुसरे कोणते स्थान मिळू शकेल? यातून कशी सुटका होऊ शकेल? यासाठी सावध कसे राहावे? आणि मुक्त कसे व्हावे? पेचात टाकणाऱ्या अशा अनेक प्रश्नांची उकल कशी होईल?

प्रत्येक मनुष्य स्वत:च्या जीवन काळात कधी कधी संयोगांच्या दबावामुळे अशा परिस्थितीत फसतो की संसार-व्यवहारात चुका करायची इच्छा नसतातही चुका होतच राहतात, आणि त्या चुकांपासून मुक्त होता येत नाही. अशा परिस्थितीत मनाने स्वच्छ असणारी माणसे सतत गोंधळाचा अनुभव करतात. अशा लोकांना चुकांपासून मुक्त होऊन जीवन जगण्यासाठी अचूक मार्ग मिळावा की जेणे करून त्यांना आंतरिक सुख-शांती लाभेल आणि त्यांची प्रगती होईल. या हेतूने यापूर्वी कधीही प्राप्त न झालेले अध्यात्म विज्ञानाचे एकमेव आणि अचूक 'आलोचना-प्रतिक्रमण-प्रत्याख्यान' रूपी हत्यार तीर्थंकरांनी, ज्ञानींनी जगाला अर्पण केले आहे. त्या हत्याराद्वारे दोष रूपी विशाल वृक्षाचे मुळासकट निर्मूलन करून अनंत जीवांनी मोक्ष लक्ष्मी प्राप्त केली आहे. अशा ह्या मुक्ती देणाऱ्या प्रतिक्रमणरूपी विज्ञानाचे, त्यातील रहस्यांचे, यथार्थ स्पष्टीकरण

प्रकट ज्ञानी पुरुष श्री दादा भगवान यांनी केवळ ज्ञान स्वरूपात पाहून बोललेल्या वाणीद्वारे व्यक्त केले आहे. ते सर्व प्रस्तुत ग्रंथात संकलित करण्यात आले आहे, जे सूज्ञ वाचकांना आत्यंतिक कल्याणासाठी उपयोगी सिद्ध होईल.

ज्ञानी पुरुषांची वाणी द्रव्य-क्षेत्र-काळ तसेच भिन्न-भिन्न निमित्तांच्या आधीन निघाली आहे, त्या वाणीच्या संकलनात आढळणाऱ्या त्रुटींना क्षम्य मानून ज्ञानी पुरुषांच्या वाणीचा अंतर आशय प्राप्त करावा, हीच नम्र विनंती.

ज्ञानी पुरुषांकडून जी वाणी बोलली जाते ती नैमित्तिक रूपाने जे कोणी मुमुक्षु-महात्मा प्रश्न विचारतात, त्यांच्या समाधानासाठी बोलली गेली असते आणि ती वाणी जेव्हा ग्रंथरूपात संकलित होते, तेव्हा काही ठिकाणी विरोधाभास भासू शकतो. उदाहरणार्थ, एका प्रश्नकर्त्याच्या आंतरिक दशेच्या समाधानासाठी ज्ञानी पुरुषांकडून 'प्रतिक्रमण ही जागृती आहे आणि अतिक्रमण हे डिस्चार्ज आहे', असे प्रत्युत्तर मिळते आणि सूक्ष्म जागृतीच्या दशेपर्यंत पोहोचलेल्या महात्म्यांना सूक्ष्मतेने समजावण्यासाठी 'ज्ञानी पुरुष' असा खुलासा करतात की 'अतिक्रमण हे डिस्चार्ज आहे आणि प्रतिक्रमण हे सुद्धा डिस्चार्ज आहे, म्हणून डिस्चार्जला डिस्चार्जने संपवायचे आहे'. हे दोन्ही खुलासे नैमित्तिकरूपाने यथार्थच आहेत, परंतु सापेक्ष रूपाने यात विरोधाभास वाटतो. तर अशा प्रकारे प्रश्नकर्त्याच्या दशेमध्ये फरक असल्यामुळे प्रत्युत्तरात विरोधाभास वाटतो. तरीही सैद्धांतिक दृष्ट्या यात विरोधाभास नाहीच. सूज्ञ वाचकांना ज्ञानवाणीची सूक्ष्मता आत्मसात करून गोष्ट समजून घ्यावी यासाठी सहजपणे हे सूचित केले आहे.

-डॉ. नीरूबहन अमीन

अनुक्रमणिका

प्रतिक्रमण

1. प्रतिक्रमणाचे यथार्थ स्वरूप

प्रश्नकर्ता : माणसाने जीवनात मुख्यत: काय केले पाहिजे?

दादाश्री : मनात जसे असेल तसेच बोलले पाहिजे, आणि वर्तनसुद्धा तसेच केले पाहिजे. आपल्याला जे काही बोलायचे असेल पण ते बोलतानाच जर मनात वाईट विचार आले तर त्यासाठी प्रतिक्रमण केले पाहिजे. प्रतिक्रमण कशाचे करावे? कोणाच्या साक्षीने कराल? तर, 'दादा भगवानां'च्या साक्षीने प्रतिक्रमण करायचे. हे जे दिसतात, ते 'दादा भगवान' नाहीत, हे तर भादरणचे ए.एम.पटेल आहेत. 'दादा भगवान' तर आत प्रकट झालेले 'चौदालोकां'चे नाथ आहेत. म्हणून त्यांच्या नावाने प्रतिक्रमण करायचे की 'हे दादा भगवान! माझे मनोभाव बिघडले म्हणून मी माफी मागतो, मला माफ करा.' मी सुद्धा त्यांच्या नावाने प्रतिक्रमण करतो.

चांगली कर्मे करणे याला धर्म म्हणतात आणि वाईट कर्मे करणे याला अधर्म म्हणतात. आणि धर्म-अधर्माच्या पलीकडे जाणे याला आत्मधर्म असे म्हणतात. चांगली कर्मे केल्याने 'क्रेडिट' (पुण्य) जमा होते आणि ते क्रेडिट भोगण्यासाठी पुन्हा जन्म घ्यावा लागतो. वाईट कर्मे केली तर 'डेबिट' (पाप) उत्पन्न होते आणि ते डेबिट भोगण्यासाठी पण पुन्हा जन्म घ्यावा लागतो. ज्याच्या वही-खात्यात क्रेडिट-डेबिट उरले नाहीत, त्याला आत्मा प्राप्त होतो.

प्रश्नकर्ता : आम्ही या संसारात आलो आहोत म्हणून कर्मे तर करावीच लागतील ना? कळत-नकळत वाईट कर्मे झाली तर काय करावे?

दादाश्री : जर असे घडले तर त्यावर उपाय पण असतोच ना. वाईट कर्म झाल्यानंतर लगेच पश्चात्ताप होतो, आणि अगदी मनापासून, सिन्सियारिटीने पश्चात्ताप केला पाहिजे. पश्चात्ताप केल्यानंतर सुद्धा पुन्हा चूक झाली तर त्याची काळजी करू नये, पुन्हा पश्चात्ताप करायचा. यामागे कोणते विज्ञान आहे हे तुम्हाला कळणार नाही त्यामुळे तुम्हाला असे वाटते की 'पश्चात्ताप केल्यानंतरही हे बंद होत नाही.' का बंद होत नाही? यामागेही विज्ञान आहे. म्हणून तुम्ही सतत पश्चात्ताप करतच राहावे. जो अगदी मनापासून पश्चात्ताप करतो त्याची सर्व कर्मे धुतली जातात. तुमच्यामुळे जर कोणाला वाईट वाटले असेल तर तुम्ही त्यासाठी पश्चात्ताप करायलाच हवा.

प्रश्नकर्ता : शरीरधर्म पाळतो तर काय त्याचेही प्रायश्चित्त करावे लागेल?

दादाश्री : होय तर, जोपर्यंत 'मी आत्मा आहे', असे भान होत नाही तोपर्यंत प्रायश्चित्त केले नाही तर कर्मे जास्त चिकटतात. प्रायश्चित्त केल्याने कर्माच्या गाठी सैल होतात. नाही तर त्या पापाचे फळ फार वाईट येते. मनुष्यपणही निघून जाते, आणि जरी मनुष्य जन्म मिळाला तरी त्याला अनेक प्रकारच्या अडचणी येतात. खाण्याच्या, पिण्याच्या, अशा अनेक अडचणी येतात. आणि मान-सन्मान तर कधी मिळतच नाही, सदैव अपमानच होत राहतो. म्हणूनच हे प्रायश्चित्त व अन्य सर्व क्रिया कराव्या लागतात. याला परोक्ष भक्ती म्हणतात. जोपर्यंत आत्मज्ञान होत नाही, तोपर्यंत परोक्ष भक्ती करणे आवश्यक आहे.

आता पश्चात्ताप कोणाच्या हजेरीत केला पाहिजे? कुणाच्या साक्षीने केला पाहिजे? तर ज्या देवाला तुम्ही मानता, श्रीकृष्णाला मानत असाल किंवा दादा भगवानांना मानत असाल, तुम्ही ज्या कोणाला मानत

असाल त्याच्या साक्षीने पश्चात्ताप केला पाहिजे. या जगात कुठल्याही गोष्टीवर उपाय नाही असे नाहीच. प्रथम उपाय जन्म घेतो त्यानंतर रोग उत्पन्न होतो.

हे जग कसे निर्माण झाले? तर अतिक्रमणाने. क्रमणाने कसलाच त्रास नाही. तुम्ही हॉटलमध्ये गेल्यावर काही वस्तू मागवून खाल्ल्या, तिथे तुमच्या हातून दोन बशा फुटल्या म्हणून तुम्ही त्याचे पैसे देऊन बाहेर पडलात, म्हणजे तुम्ही अतिक्रमण केले नाही, त्यामुळे त्याचे प्रतिक्रमण करण्याचीही गरज नाही. परंतु बशा फुटल्या आणि तुम्ही म्हणालात 'तुमच्या नोकराने फोडल्या' की मग वाद सुरू होतो. हे झाले अतिक्रमण, त्याचे प्रतिक्रमण करावे लागेल. आणि अतिक्रमण झाल्याशिवाय राहतच नाही, म्हणून प्रतिक्रमण करा. बाकी सारे क्रमण तर आहेच. सहजपणे बोलणे झाले तर ते क्रमण आहे, त्यात काही गैर नाही. पण अतिक्रमण झाल्याशिवाय राहत नाही, म्हणून त्याचे प्रतिक्रमण करा.

प्रश्नकर्ता : हे जे अतिक्रमण झाले ते स्वतःला कसे समजेल?

दादाश्री : ते स्वतःलाही समजते आणि समोरच्यालाही समजते. अतिक्रमण झाले हे समोरच्यालाही समजते. त्याच्या चेहऱ्यावर झालेला परिणाम तुम्हाला समजतो. आणि तुमच्यावरही त्याचा परिणाम होतो. दोघांवर परिणाम होतो. म्हणून त्याचे प्रतिक्रमण करावेच लागते.

दादाश्री : क्रोध-मान-माया-लोभ, या सर्व गोष्टी म्हणजे अतिक्रमण. त्यांचे प्रतिक्रमण केले म्हणजे क्रोध-मान-माया-लोभ गेले. जर अतिक्रमण झाले आणि प्रतिक्रमण केले, की क्रोध-मान-माया-लोभ निघून जातात.

अतिक्रमणाने हा संसार उत्पन्न झाला आहे, आणि प्रतिक्रमणाने तो संपुष्टात येतो.

प्रश्नकर्ता : मग प्रतिक्रमण म्हणजे नक्की काय?

दादाश्री : प्रतिक्रमण म्हणजे समोरची व्यक्ती जेव्हा आपला अपमान करते, तेव्हा आपल्याला हे समजले पाहिजे की 'या अपमानाचा खरा गुन्हेगार कोण आहे?' आपण आधी हे ठरवले पाहिजे की 'अपमान करणारा गुन्हेगार आहे की भोगणारा गुन्हेगार आहे?' अपमान करणारा अजिबात गुन्हेगार नसतो, एक टक्काही गुन्हेगार नसतो. तो केवळ निमित्तच असतो आणि आपल्याच कर्मांच्या उदयामुळे तो निमित्त आपल्याला भेटतो. म्हणून हा आपलाच गुन्हा आहे. आता अशावेळी जर समोरच्या व्यक्तीबद्दल आपले भाव बिघडले तर मात्र प्रतिक्रमण करावे. त्याच्यासाठी जर 'हा नालायक आहे, लुच्चा आहे' असे विचार मनात आले तर मात्र प्रतिक्रमण करावे. जर असे विचार आले नसतील आणि तुम्ही त्याचे उपकार मानले असेल तर प्रतिक्रमण करण्याची गरज नाही. कोणी आपल्याला शिवी देतो तर तो आपलाच हिशोब आहे, आणि ती व्यक्ती तर निमित्त आहे. आपला खिसा कापला गेला तर तो कापणारा निमित्त आहे आणि तो आपलाच हिशोब आहे. लोक तर निमित्ताचाच चावा घेतात (दोष देतात). त्यामुळेच ही सर्व भांडणे आहेत.

उलटे चाललो याला अतिक्रमण म्हणतात आणि परत फिरलो याला प्रतिक्रमण म्हणतात.

जिथे भांडणे आहेत, तिथे प्रतिक्रमण नाहीत, आणि जिथे प्रतिक्रमण आहेत तिथे भांडणे नाहीत.

मुलाला मारण्याचा तुम्हाला अधिकार नाही, समजावण्याचा अधिकार आहे. तरीसुद्धा मुलाला मारले गेले आणि प्रतिक्रमण केले नाही, तर कर्मे चिकटच राहतील ना! प्रतिक्रमण तर करावेच लागेल ना!

'मी चंदुभाई आहे' हेच अतिक्रमण आहे. तरी पण आम्ही व्यवहारात त्याला 'लेट गो' करतो (चालवून घेतो). पण तुमच्यामुळे कुणाला दुःख होते का? जर दुःख होत नसेल तर ते अतिक्रमण नाही.

साऱ्या दिवसात तुमच्याकडून एखाद्याला दु:ख झाले तर ते अतिक्रमण होय. त्याचे प्रतिक्रमण करा. हे वीतरागींचे विज्ञान आहे. अतिक्रमण अधोगतीत घेऊन जाते आणि प्रतिक्रमण ऊर्ध्वगतीत घेऊन जाते. थेट मोक्षाला जाईपर्यंत प्रतिक्रमण मदत करते.

प्रतिक्रमण कुणी करू नये? तर ज्याने कधी अतिक्रमण केले नाही त्याने.

प्रश्नकर्ता : व्यवहार, व्यापार, व अन्य प्रवृत्तीमध्ये अन्याय होताना दिसल्यावर मनात ग्लानी येते, आणि त्यामुळे जर व्यवहार चुकीचा होऊ लागला तर काय करावे? आमच्याकडून जर असा अन्याय होत असेल तर त्याचे प्रायश्चित्त कसे करावे?

दादाश्री : प्रायश्चित्तासाठी आलोचना-प्रतिक्रमण-प्रत्याख्यान केले पाहिजेत. जिथे जिथे कोणावर अन्याय केला असेल तिथे तिथे आलोचना, प्रतिक्रमण करावे लागते आणि असा अन्याय मी पुन्हा करणार नाही, असे ठरवावे लागते. ज्या देवाला मानत असाल, कोणत्या देवाला मानता?

प्रश्नकर्ता : शंकराला.

दादाश्री : ठीक! तर मग शंकराजवळ पश्चात्ताप केला पाहिजे. आलोचना केली पाहिजे की, 'माझ्याकडून या या व्यक्तींबरोबर अशा अशा चुका झाल्या आहेत, आता पुन्हा कधी मी असे करणार नाही. वारंवार पश्चात्ताप केला पाहिजे. पुन्हा दोष झाले तर पुन्हा पश्चात्ताप करावा. असे केल्याने दोष कमी होत जातील. तुमची इच्छा नसेल तरी पण तुमच्याकडून अन्याय होईल. तो तुमचा पूर्व जन्माचा प्रकृती दोष आहे, या जन्माचा दोष नाही. आज तर तुम्हाला सुधारायचे आहे, पण तरीही दोष होतात. असे घडते ते तुमचे पूर्वीचे दोष आहेत. ते तुम्हाला त्रास दिल्याशिवाय राहणार नाहीत. म्हणून सतत आलोचना-प्रतिक्रमण-प्रत्याख्यान करावे लागेल.

प्रश्नकर्ता : आम्हाला जे सहन करावे लागते, त्यावर काय उपाय आहे?

दादाश्री : तुम्हाला ते सहन करावेच लागेल, उगाच आरडाओरडा करता कामा नये. सहन करायचे आणि तेही अगदी समतापूर्वक सहन करायचे. समोरच्या व्यक्तीला मनात शिवी देऊन नाही, पण समतापूर्वक, की 'भाऊ, तू मला माझ्या कर्मातून मुक्त केलेस. माझे जे कर्म होते, ते तू मला भोगायला लावलेस, आणि मला मुक्त केलेस, त्यासाठी त्याचे उपकार मानावेत. विनाकारण काहीही सहन करावे लागत नाही. आपल्याच दोषांचा तो परिणाम आहे.

प्रश्नकर्ता : प्रतिक्रमण तर दुसऱ्यांचे दोष पाहतो त्यासाठीच करायचे ना?

दादाश्री : फक्त दुसऱ्यांचे दोषच नाही, तर प्रत्येक गोष्टीसाठी, खोटे बोलला असाल, काही चुकीचे कृत्य झाले असेल, हिंसा झाली असेल, पाच महाव्रतांपैकी कुठल्याही व्रताचा भंग झाला असेल, तर अशा सर्व गोष्टींसाठी प्रतिक्रमण करावे लागेल.

2. प्रत्येक धर्माने सांगितले आहे प्रतिक्रमण

भगवंतानी सांगितले आहे, की 'आलोचना, प्रतिक्रमण आणि प्रत्याख्यान' या शिवाय दुसरा कोणताच व्यवहार धर्म नाही. पण ते कॅश (रोख) असेल तरच, उधार चालणार नाही. जर कोणाला शिवीगाळ केली, तर ते लक्षात (जागृतीत) ठेवा की कोणाबरोबर काय झाले होते? आणि त्यानंतर आलोचना करून, कॅश प्रतिक्रमण, प्रत्याख्यान करा. याला भगवंतांनी व्यवहार आणि निश्चय, दोन्हीही म्हटले आहे. परंतु हे कोण करू शकतो? तर समकित प्राप्त झाल्यानंतर तो करू शकतो, तोपर्यंत करायचे असेल तरी होणार नाही. आणि समकित होतही नाही ना! तरीही कोणी आपल्या येथे आलोचना-प्रतिक्रमण-प्रत्याख्यान शिकून गेला तरी त्याचे काम होऊन जाईल. असेच जरी शिकून गेला तरी हरकत नाही. त्याला मग समकित होऊनच जाईल!!!

ज्याचे आलोचना-प्रतिक्रमण-प्रत्याख्यान खरे असतील त्याला आत्मा प्राप्त झाल्याशिवाय राहतच नाही.

प्रश्नकर्ता : म्हणजे 'पश्चात्ताप करतो' ते प्रतिक्रमण आहे, आणि 'पुन्हा असे करणार नाही', असे म्हटले तर काय ते प्रत्याख्यान आहे?

दादाश्री : हो, पश्चात्तापाला प्रतिक्रमण म्हणतात. आता प्रतिक्रमण केले तर पुन्हा असे अतिक्रमण होणार नाही, 'पुन्हा असे करणार नाही' याला प्रत्याख्यान म्हणतात. मनात असा निश्चय करायचा की, 'मी पुन्हा असे करणार नाही, असे वचन देतो', आणि नंतर पुन्हा असे घडले तर एक थर तरी गेला, त्यानंतर दुसरा थर समोर येईल, तरी घाबरायचे नाही, वारंवार असे करतच राहायचे

प्रश्नकर्ता : आलोचना म्हणजे काय?

दादाश्री : हो, आलोचना म्हणजे 'आपल्याकडून जर काही वाईट काम झाले असेल, तर जे आपले गुरु असतील किंवा ज्ञानी असतील त्यांच्याकडे कबूल करायचे. जसे घडले असेल तसेच कबूल करायचे.

आता आपण प्रतिक्रमण कशाचे करायचे? तर जितके अतिक्रमण केले असेल, जी कृत्ये लोकांना स्वीकार्य नसतील, लोक निंदा करतील अशी कर्मे, आपल्यामुळे समोरच्या व्यक्तीला दु:ख होते, त्याला अतिक्रमण म्हणतात. जर असे झाले असेल तर प्रतिक्रमण करणे आवश्यक आहे.

कर्म कोण बांधतो? हे आपण जाणून घेतले पाहिजे, तुमचे नाव काय आहे?

प्रश्नकर्ता : चंदुलाल.

दादाश्री : तर 'मी चंदुलाल आहे' तोच कर्म बांधणारा आहे. मग तो जरी रात्री झोपला तरीही रात्रभर कर्मे बांधली जातात. 'मी चंदुलाल आहे' यामुळे झोपेतही कर्मे बांधली जातात. याचे काय कारण? कारण हा आरोपित भाव आहे म्हणून गुन्हा लागू होतो. वास्तवात 'स्वत:' चंदुलाल नाही, आणि जिथे तुम्ही नाही तिथे 'मी आहे' असे आरोपण करता. तो कल्पित भाव आहे, आणि म्हणून निरंतर त्याचा गुन्हा लागू होतो. मग 'मी चंदुलाल, याचा सासरा, याचा मामा, काका,'

हे सर्व पण आरोपित भाव आहेत, त्यामुळे निरंतर कर्मबंधन होत राहते. रात्री झोपेतही कर्मबंधन सुरूच राहते. त्यातून तर सुटकाच नाही, पण जर 'मी चंदुलाल आहे' या अहंकाराला जर तुम्ही निर्मळ केले तर तुमची कर्मे कमी बांधली जातील.

अहंकाराला निर्मळ केल्यानंतरही आणखी काही क्रिया कराव्या लागतील. कोणत्या क्रिया? समजा सकाळी तुमच्या सुनेच्या हातून कप-बशी फुटली यावर तुम्ही बोललात, 'तुला अक्कल नाही?' यामुळे तिला दुःख झाले, त्यावेळी तुम्हाला असे वाटले पाहिजे की, असे बोलून 'मी तिला दुखावले.' म्हणून त्याचे प्रतिक्रमण झाले पाहिजे. दुःख दिले म्हणजे अतिक्रमण झाले, मग लगेच प्रतिक्रमण केले तर ते धुतले जाईल. ते कर्म हलके होईल.

कुणालाही दुःख होईल असे आचरण झाले तर त्याला अतिक्रमण झाले असे म्हणतात. आणि अतिक्रमण झाले की प्रतिक्रमण केले पाहिजे, पण ते बारा महिन्यानंतर करतात तसे नाही, तर 'शूट ऑन साइट', केले पाहिजे, तर ही दुःखे काही तरी कमी होतील. वीतरागींच्या मतानुसार चाललो तर दुःखे संपतील. नाही तर दुःखे जात नाहीत.

प्रश्नकर्ता : ते प्रतिक्रमण कसे करावे?

दादाश्री : तुम्ही जर ज्ञान घेतले असेल तर तुम्हाला समोरच्या व्यक्तीचा आत्मा दिसेल. म्हणून त्या आत्म्याला उद्देशून करावे, किंवा भगवंताला उद्देशून करावे, 'हे भगवंत! मी पश्चात्ताप करीत आहे, माफी मागत आहे, आणि पुन्हा कधी असे करणार नाही.' बस, हे झाले प्रतिक्रमण!

प्रश्नकर्ता : असे केल्याने दोष खरेच धुतले जातील का?

दादाश्री : हो, हो, निश्चितच धुतले जातील! प्रतिक्रमण केले की दोष राहणारच नाहीत ना! खूप मोठे (भारी) कर्म असेल तर ते जळलेल्या दोरीसारखे दिसेल, पण जरासा हात लावल्याबरोबर राख विखुरली जाईल.

प्रश्नकर्ता : पश्चात्ताप कसा करू? सर्वांच्या समक्ष करू की मनातल्या मनात करू?

दादाश्री : मनातल्या मनात. मनात दादांना आठवून म्हणायचे 'माझ्याकडून ही चूक झाली, आणि अशी चूक मी पुन्हा करणार नाही', असे मनात आठवून करावे. असे करता करता ही सर्व दु:खे विसरली जातात. ती चूक संपून जाते. परंतु जर असे केले नाही तर मात्र चुका वाढत जातील.

हा एकच मार्ग असा आहे की स्वत:चे दोष दिसू लागतात आणि शूट होत जातात. असे करत करत दोष संपतात.

प्रश्नकर्ता : एका बाजूने पाप करत राहतो आणि दुसऱ्या बाजूने पश्चात्ताप करत राहतो. असे तर चालतच राहते.

दादाश्री : नाही, असे करायचे नाही. जो मनुष्य पाप करतो ना, त्याने जर पश्चात्ताप केला तर तो खोटा पश्चात्ताप करूच शकत नाही. खरा पश्चात्तापच होत असतो. आणि खरा पश्चात्ताप झाला की कांद्याची एक पाकळी दूर होते. तरीही कांदा अख्ख्याचा अख्खाच दिसतो. नंतर दुसरी पाकळी दूर होते. पश्चात्ताप कधीही वाया जात नाही.

प्रश्नकर्ता : परंतु अगदी खऱ्या मनाने माफी मागायची ना?

दादाश्री : अर्थातच, माफी मागणारा खऱ्या मनानेच माफी मागत असतो, आणि जरी खोट्या मनाने माफी मागितली तरी चालवून घेऊ, पण माफी मागा.

प्रश्नकर्ता : मग तर त्याला तशी सवयच लागेल!

दादाश्री : सवय लागली तर खुशाल लागू द्या, पण माफी मागा. माफी मागितली नाही तर मात्र संकटात सापडाल. माफी म्हणजे काय? तर प्रतिक्रमण. दोष म्हणजे काय? तर अतिक्रमण.

कोणी ब्रँडी पितो आणि म्हणतो, 'मी माफी मागतो', तर मी म्हणेन 'तू माफी माग. माफी मागत रहा आणि पीत रहा.' परंतु मनात

ठाम निश्चय कर की 'मला आता ब्रँडी सोडून द्यायची आहे.' अगदी मनापासून निश्चय कर. मग पीत रहा, आणि माफी मागत रहा. अखेर एक दिवस या गोष्टीचा शेवट होईल (ब्रँडीचे व्यसन सुटेल). माझे हे विज्ञान शंभर टक्क्यांचे आहे.

हे तर विज्ञान आहे. परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. त्वरित फळ देणारे आहे. 'दिस इज द कॅश बँक ऑफ डिव्हाइन सोल्यूशन.' हीच आहे 'कॅश बँक!' दहा लाख वर्षात कधी निघालीच नाही! दोन तासात मोक्ष घेऊन जा!! येथे तुम्ही जे मागाल ते द्यायला मी तयार आहे, मागता आले पाहिजे.

एका व्यक्तीला चोरी केल्यावर पश्चात्ताप होतो, त्याला निसर्ग सोडून देतो. पश्चात्ताप केला म्हणून देव त्याला गुन्हेगार मानत नाही, परंतु या जगातील लोक त्याला जी शिक्षा देतात ती मात्र त्याला या जन्मातच भोगावी लागते.

लोक तर हे सर्व चुकीचे आहे, असे करू नये, असे वरवर बोलतात. 'सुपरफ्लुअस' बोलतात. 'हार्टिली' (हृदयपूर्वक) बोलत नाहीत. जर 'हार्टिली' बोलले ना, तर तो दोष काही काळानंतर निघूनच जातो! तुमच्याकडून जरी कितीही वाईट दोष झाला असेल परंतु तुम्हाला त्याचा खूप 'हार्टिली' पश्चात्ताप होत असेल तर तो दोष पुन्हा होणार नाही. आणि जरी पुन्हा झाला तरीही हरकत नाही, पण तुम्ही खूप पश्चात्ताप करत राहा.

प्रश्नकर्ता : मग प्रतिक्रमण आणि पश्चात्ताप यात काय फरक आहे ?

दादाश्री : पश्चात्ताप म्हणजे सामान्यपणे खेद करणे. ख्रिश्चन लोक रविवारी चर्चमध्ये जाऊन पश्चात्ताप करतात. जी पापे झाली त्यासाठी सामूहिक पश्चात्ताप करतात. आणि प्रतिक्रमण तर, ज्याने गोळी मारली, ज्याने अतिक्रमण केले, त्याने करावे. अगदी त्याच क्षणी, 'शूट ऑन साइट' दोष धुऊन टाकावे

'आलोचना-प्रतिक्रमण-प्रत्याख्यान' हे महावीर भगवंतांच्या सिद्धांताचे सार आहे, आणि अक्रममध्ये 'ज्ञानी पुरुष' हेच सार आहे, एवढेच समजायचे आहे. आज्ञा तोच धर्म, आणि आज्ञा तेच तप आहे, पण मनुष्य ढवळाढवळ केल्याशिवाय राहतच नाही ना! अनादि काळापासून वाईट सवय लागली आहे.

3. ती प्रतिक्रमणे महावीरांची नाहीत

प्रश्नकर्ता : अनादि काळापासून प्रतिक्रमण तर करत आलो आहोत, तरी ही सुटका कशी काय झाली नाही?

दादाश्री : कारण खरी प्रतिक्रमणे केली नाहीत. जर खरे 'प्रतिक्रमण आणि खरे प्रत्याख्यान' केले तर त्याची सुटका होतेच. प्रतिक्रमणे 'शूट ऑन साइट' व्हायला हवीत. समजा माझ्याकडून एखादा शब्द जरा चुकीचा बोलला गेला, तर आत माझे प्रतिक्रमण होऊनच जायला हवे, लगेचच, 'ऑन दी मोमेंट.' यात उधारी चालत नाही. शिळे (पेंडिंग) ठेवायचेच नाही. हे प्रतिक्रमण शिळे ठेवायचे नसते. म्हणजे 'शूट ऑन साइट'च प्रतिक्रमण व्हायला हवे. तुम्ही कसे प्रतिक्रमण करता? रोख, 'शूट ऑन साइट' करता की शिळे ठेवता?

प्रतिक्रमण म्हणजे तर पश्चात्ताप करायचा असतो, पश्चात्ताप कशाबद्दल करता?

प्रश्नकर्ता : पश्चात्ताप करायला जमत नाही, सर्व क्रिया करत राहतो.

दादाश्री : प्रतिक्रमण म्हणजे परत फिरणे. जी पापे केली असतील, क्रोध केला असेल, त्याबद्दल पश्चात्ताप करणे याला प्रतिक्रमण म्हणतात.

प्रतिक्रमण कशाला म्हणतात, तर जे केल्याने दोष कमी होतात. जे केल्याने दोष वाढत असतील, त्याला प्रतिक्रमण कसे म्हणता येईल? भगवंतांनी असे (प्रतिक्रमण) सांगितले नव्हते. भगवंत म्हणतात, 'तुम्हाला समजेल अशा भाषेत प्रतिक्रमण करा.' आपापल्या भाषेत प्रतिक्रमण

करा. नाही तर लोकांना प्रतिक्रमण पावणार नाही. हे सर्व मागधी भाषेत ठेवले आहे. आता ज्यांना (स्वत:ची) गुजराती भाषाही नीट समजत नाही, ते जर मागधी भाषेत प्रतिक्रमण करतील तर त्यांना काय फायदा होईल? आणि साधू, आचार्यांनाही हे समजत नाही, त्यांचे दोषही कमी झाले नाहीत. तर ही अशी परिस्थिती आहे.

भगवंतांनी फक्त नवकार मंत्रच मागधी भाषेत बोलण्यास सांगितले होते, आणि तोसुद्धा समजून बोला. कारण ते भगवंतांचे शब्द आहेत. तेव्हा फक्त त्या नवकार मंत्राचा अर्थ समजून घेतला, एवढेच. पण प्रतिक्रमण करण्यासाठी तर प्रथम त्याचा अर्थ समजून घ्यावाच लागेल की 'मी हे प्रतिक्रमण करत आहे, पण कशाचे? चंदुभाईने माझा अपमान केला, किंवा मी कोणाचा अपमान केला, त्यासाठी मी प्रतिक्रमण करत आहे.'

प्रतिक्रमण म्हणजे कषायांना (क्रोध, मान, माया, लोभ) समाप्त करून टाकणे.

हे लोक जेव्हा वर्षातून एकदाच प्रतिक्रमण करतात, तेव्हा नवीन कपडे घालून तिथे जातात. अहो, प्रतिक्रमण म्हणजे काय लग्न समारंभ आहे का? प्रतिक्रमण करायचे म्हणजे तर खूप खूप पश्चात्ताप करायचा! तिथे नव्या कपडयांचे काय काम? हा काय लग्न समारंभ आहे? आणि तेसुद्धा रायशी व देवशी? अहो, सकाळी खाल्लेले संध्याकाळी आठवत नाही, मग प्रतिक्रमण कसे करणार?

वीतराग धर्म कशाला म्हणायचे? तर 'रोज पाचशे-पाचशे प्रतिक्रमण होतात त्याला.' जैन धर्म तर सर्वत्र आहे, पण वीतराग धर्म नाही. वर्षभरातून एकदाच प्रतिक्रमण करणार, त्याला जैन कसे म्हणायचे? तरीही संवत्सरी प्रतिक्रमण करता त्यात काही गैर नाही.

'आम्ही' असे बोलतो, पण बोलण्याआधीच आम्ही प्रतिक्रमण केलेले असते. तुम्ही मात्र असे बोलू नका. आम्ही असे कडक बोलतो, चुका काढतो, तरी पण आम्ही सर्वांना निर्दोषच पाहतो. पण जगाला

समजावावे तर लागेलच ना? यथार्थ, खरी गोष्ट तर समजावावी लागेलच ना?

आत्मज्ञान, हा मोक्ष मार्ग आहे. आत्मज्ञान झाल्यानंतरची प्रतिक्रमणे मोक्षमार्ग देतात, त्यानंतर मग सर्व साधना मोक्षमार्गच देतात.

प्रश्नकर्ता : तर हे प्रतिक्रमण त्यांना आत्मज्ञान प्राप्त होण्याचे कारण बनू शकते का?

दादाश्री : नाही, ते जुन्या दोषांचे प्रतिक्रमण करतात, आणि पुन्हा मोहामुळे नवीन अतिक्रमणे होत राहतात. मोह बंद झालेला नाही ना? मोह अजून चालूच आहे. दर्शनमोह म्हणजे जुने सर्व दोष प्रतिक्रमण केल्याने विलय होतात आणि (दर्शनमोहामुळे) नवीन दोष उत्पन्न होतात. प्रतिक्रमण करतात तेव्हा पुण्य बांधले जाते.

संसारातील लोक प्रतिक्रमण करतात, कोणी जागृत असेल तर तो रायशी-देवशी दोन्ही प्रतिक्रमण करतो, त्यामुळे तेवढे दोष कमी होतात, परंतु जोपर्यंत दर्शन मोहनीय आहे, तोपर्यंत मोक्ष होऊ शकत नाही, दोष उत्पन्न होतच राहतात. जेवढे प्रतिक्रमण कराल तेवढे दोष निघून जातील.

म्हणजे आता या काळात 'शूट ऑन साइट'ची गोष्ट तर बाजूलाच राहिली, पण संध्याकाळी दिवसभराच्या दोषांचे प्रतिक्रमण करण्यास सांगितले होते, ती गोष्ट पण आता कोण पाळतो? आठवड्यातून एकदा करायची गोष्ट पण संपली आणि पाक्षिक पण नाहीशी झाली. आता फक्त बारा महिन्यातून एकदाच करतात. तेसुद्धा समजल्याशिवायच करतात. नवनवीन कपडे घालून मिरवतात. म्हणजे असे रियल (खरे) प्रतिक्रमण कोणी करत नाही, म्हणून तर त्यांचे दोष वाढत चालले आहेत. प्रतिक्रमण तर त्यालाच म्हणावे की ज्यामुळे सर्व दोष कमी होत जातात.

समजा आता या ताईंना जर तुमच्याबद्दल किंचित चुकीचा विचार

आला की, 'हे आता का आले, मला त्रास देण्यासाठी?' असा विचार त्यांच्या मनात येतो, पण त्या तुम्हाला कळू देणार नाहीत, चेहरा हसत ठेवतील, आणि त्याचवेळी मनात प्रतिक्रमण करतील. उलटा विचार आला म्हणजे अतिक्रमण झाले असे म्हणायचे. त्या रोज पाचशे-पाचशे प्रतिक्रमण करत असतात.

प्रश्नकर्ता : ते तर भाव प्रतिक्रमण आहे, क्रिया प्रतिक्रमण तर होतच नाहीत ना?

दादाश्री : नाही, क्रियेत प्रतिक्रमण होतच नाहीत, भाव प्रतिक्रमणाचीच गरज आहे, तेच उपयोगी ठरते. क्रिया प्रतिक्रमण नसते.

प्रश्नकर्ता : द्रव्य प्रतिक्रमण आणि भाव प्रतिक्रमण म्हणजे काय ते जरा सविस्तर समजवा.

दादाश्री : भावपूर्वक बोलावे की 'असे होता कामा नये.' म्हणजे असा भाव असावा की 'असे होत कामा नये.' याला भाव प्रतिक्रमण म्हणतात. आणि द्रव्य प्रतिक्रमणामध्ये तर सर्व शब्दन् शब्द बोलावे लागतात. जितके शब्द लिहिलेले असतात ते सारे बोलावे लागतात, त्याला द्रव्य प्रतिक्रमण म्हणतात.

आज जर येथे भगवंत असते ना, तर हे असे प्रतिक्रमण पाहून त्यांनी या सर्वांना जेलमध्येच टाकले असते. अरे मूर्खा, तू असे कसे केलेस? प्रतिक्रमण म्हणजे एका गुन्ह्याची माफी मागायची, तो स्वच्छ करून टाकायचा. एक डाग पडला असेल तर तो डाग धुऊन स्वच्छ करायचा. जागा जशी होती तशीच्या तशी स्वच्छ करून टाकायची, याला म्हणतात प्रतिक्रमण. पण आता तर नुसती डागाळलेली धोतरेच दिसत आहेत.

एकाही दोषाचे प्रतिक्रमण केलेले नाही आणि निव्वळ दोषांचे भांडारच बनून गेले आहेत.

ह्या नीरू बहन आहेत, त्यांचे सर्व आचार-विचार कशामुळे उच्च

झाले आहेत? तर त्या रोजच पाचशे-पाचशे प्रतिक्रमण करीत होत्या आणि या लोकांनी तर एकसुद्धा केले नाही.

नेहमीच 'केल्याचे' (कर्तेपणाचे) आवरण येते. आणि आवरणामुळे चुका दाबल्या जातात, मग त्या चुका दिसतच नाहीत. चुका तर जेव्हा आवरणे तुटतात तेव्हाच दिसू लागतात, आणि आवरणे फक्त ज्ञानी पुरुषांद्वारेच तुटतात. स्वतः स्वत:ची आवरणे तोडूच शकत नाही. ज्ञानी पुरुष आवरणे फ्रॅक्चर करून ती संपवून टाकतात!

प्रश्नकर्ता : प्रतिक्रमण शुद्ध झाले हे कसे ओळखायचे? खरी-यथार्थ प्रतिक्रमणे कशा प्रकारे होतात?

दादाश्री : समकित झाल्यानंतर यथार्थ प्रतिक्रमण होतात. सम्यक्त्व प्राप्त झाल्यानंतर, दृष्टी सम्यक् झाल्यानंतर, आत्मदृष्टी झाल्यानंतर यथार्थ प्रतिक्रमण होऊ शकतात. परंतु तोपर्यंत जर प्रतिक्रमण कराल आणि पश्चात्ताप कराल तरीसुद्धा दोष कमी होऊन जातील. आत्मदृष्टी प्राप्त न झालेल्या संसारी लोकांनी चूक झाल्यावर पश्चात्ताप केला, प्रतिक्रमण केले, तरी त्यांची पापे कमी होतील. प्रतिक्रमण, पश्चात्ताप केल्याने कर्मे नष्टही होऊ शकतात!

कपड्यावर चहाचा डाग पडल्याबरोबर लगेचच तो धुऊन टाकतात, ते कशासाठी?

प्रश्नकर्ता : डाग निघून जावा म्हणून.

दादाश्री : त्याचप्रमाणे आपल्या आत डाग पडले की लगेचच धुऊन टाकले पाहिजेत. हे लोक (ज्ञानप्राप्त महात्मा) लगेच धुऊन टाकतात. काही कषाय उत्पन्न झाला, काही दोष झाला की त्वरितच धुऊन टाकले तर स्वच्छच स्वच्छ, सुंदरच सुंदर! तुम्ही तर बारा महिन्यांतून एक दिवस करता, त्या दिवशी सर्व कपडे भिजत घालतात.

आमचे प्रतिक्रमण 'शूट ऑन साइट' म्हटले जाते. म्हणजे तुम्ही जे करता त्याला खरे प्रतिक्रमण म्हणता येणार नाही. कारण तुमचा

एकही कपडा (दोष) धुतला जात नाही आणि आमचे तर सर्व कपडे धुऊन स्वच्छ होऊन गेलेत. सर्व कपडे धुऊन स्वच्छ होतात त्यालाच प्रतिक्रमण म्हणायचे.

कपडे दररोज एक-एक करून धुवावे लागतात, पण हे तर बारा महिने झाल्यानंतर बारा महिन्यांचे सर्व कपडे एकत्र धुतात. भगवंतांकडे तर असे चालणारच नाही. हे लोक बारा महिन्यांनंतर कपडे एकदाच उकळतात, नाही का? ते तर एक-एक करून धुवावे लागतात. दररोज पाचशे-पाचशे कपडे (दोष) धुतले जातील, तेव्हा काम होईल.

जेवढे दोष दिसतील, तेवढे कमी होतील. अजूनही दोष दिसत नाहीत याचे कारण काय? तर तेवढे अजून कच्चे आहे. दोष दिसत नाहीत, म्हणून काय बिनदोषांचे थोडेच झाले आहेत?

भगवंतानी दररोज वहीखाते (आपल्या दोषांची नोंद)लिहायला सांगितले होते, आणि हे तर आता बारा महिन्यांनी वहीखाते लिहितात, जेव्हा पर्युषण येते तेव्हा. भगवंतांनी म्हटले होते की जर खरा व्यापारी असशील तर वहीखाते रोजच्या रोज लिहित जा आणि संध्याकाळी हिशोब काढ. बारा महिन्यांनी वहीखाते लिहिले तर काय आठवणार? तेव्हा कोणती रक्कम आठवेल? भगवंत म्हणाले होते की खरा व्यापारी हो, आणि दररोजचे वहीखाते दररोज लिहित जा. आणि त्यात कुठे चूक झाली, अविनय झाला, तर लगेचच त्याचे प्रतिक्रमण करून ती चूक संपवून टाक.

4. धन्य! धन्य! ते जागृत दादा!

या जगात सर्व निर्दोष आहेत, तरी पण बघा ना, अशी (कडक) वाणी निघत आहे ना! आम्ही तर या सर्वांना निर्दोषच पाहिले आहे, कोणीही दोषी नाही. आम्हाला कोणी दोषी दिसतच नाही. फक्त दोषी बोलले जाते, आम्ही असे बोलू शकतो का? असे बोलणे अनिवार्य आहे का? कोणाबद्दलही असे बोलू शकत नाही. असे बोलल्यानंतर त्वरितच त्याची प्रतिक्रमणेही होतच असतात. तेवढी आमची चार डिग्री

कमी आहे, त्याचा हा परिणाम आहे. पण तरी प्रतिक्रमण केल्याशिवाय चालणारच नाही.

आम्ही (समोरच्याचा दोष निघावा म्हणून) मुद्दाम हस्तक्षेप करतो, कडक शब्द बोलतो, परंतु निसर्गाच्या दृष्टीने तर हा आमचा दोषच झाला ना! म्हणून आम्ही त्याचे प्रतिक्रमण (ए. एम पटेलकडून) करवून घेतो. प्रत्येक चुकीसाठी प्रतिक्रमण होत असते. समोरच्या व्यक्तीचे मन दुखावले जाणार नाही अशी आमची सतत भावना असते.

माझ्याने 'आहे' त्याला 'नाही' असे म्हणता येणार नाही आणि 'नाही' त्याला 'आहे' असेही म्हणता येणार नाही. त्यामुळे माझ्याकडून काही लोक दुखावतात. जर 'नाही' त्याला 'आहे' असे मी म्हणालो तर तुमच्या मनात भ्रम निर्माण होईल, आणि असे बोलल्याने त्या (प्रतिपक्षीय) लोकांच्या मनात असे विचार येतील की, हे 'असे का बोलत आहेत?' म्हणून जेव्हा असे बोलले जाते तेव्हा त्या (प्रतिपक्षीय) लोकांचेही प्रतिक्रमण रोज करावे लागते. कारण त्यांना देखील दुःख होता कामा नये. एखादा मानतो की, या पिंपळाच्या झाडावर भूत आहे, आणि मी म्हणतो की या पिंपळाच्या झाडावर भूत-बित वगैरे काहीच नाही. यामुळे त्याला दुःख होते, म्हणून मग मला प्रतिक्रमण करावे लागते. असे तर नेहमीच करावे लागते ना!

प्रश्नकर्ता : दुसऱ्यांना त्यांच्या समजुतीनुसार ते चुकीचे वाटत असेल तर त्यासाठी काय करावे?

दादाश्री : ह्या सगळ्या ज्या सत्य गोष्टी आहेत त्या सर्व प्रत्यक्षात खोट्याच आहेत. व्यवहारापुरत्या सत्य आहेत. मोक्षाला जायचे असेल तर ते सर्व खोटेच आहे. त्या सगळ्या गोष्टींसाठी प्रतिक्रमण करावे लागेल. 'मी आचार्य आहे असे मानले' याचेही प्रतिक्रमण करावे लागेल. कारण 'मी शुद्धात्मा आहे.' म्हणजे हे सर्वच खोटे आहे, सर्व खोटे. हे तुझ्या लक्षात येत आहे की नाही?

प्रश्नकर्ता : येत आहे.

दादाश्री : सगळेच खोटे. लोक न समजल्यामुळे सांगतात की 'मी सत्य बोलत आहे.' अरे, सत्य बोलत असाल तर त्याचा विरोध होणारच नाही

त्याचे असे आहे की, आम्ही ज्याक्षणी बोलतो, त्याचक्षणी आमचे जोरदार प्रतिक्रमण पण सुरूच असते, बोलता बोलताच.

प्रश्नकर्ता : पण जी गोष्ट खरी आहे, तीच तुम्ही सांगत होता, मग त्यासाठी प्रतिक्रमण का करावे?

दादाश्री : नाही, तरीसुद्धा प्रतिक्रमणे तर करावीच लागतात ना! तू कोणाचा दोष का बघितलास? निर्दोष आहे तरी पण दोष का बघितलास? त्याची बदनामी तर झालीच ना? कोणाची बदनामी होईल अशी खरी गोष्टसुद्धा बोलू नये. अशी खरी गोष्ट बोलणे हा सुद्धा गुन्हा आहे. खरी गोष्ट हिंसक असता कामा नये, अशा गोष्टीला हिंसक गोष्ट असेच म्हटले जाईल.

आलोचना, प्रतिक्रमण आणि प्रत्याख्यान हा आहे मोक्षमार्ग. आपले महात्मा काय करतात? पूर्ण दिवस आलोचना, प्रतिक्रमण आणि प्रत्याख्यानच करत असतात. आता त्यांना जर सांगितले, 'तुम्ही आता ह्या बाजूला या, व्रत, नियम, करा.' तर ते म्हणतील, 'आम्हाला व्रत, नियमांची काय गरज? आम्हाला आत शांती आहे, चिंता नाही, कसलीही उपाधी नाही. निरंतर समाधीत राहू शकतो. मग या सर्वांची काय गरज?' ही तर कटकट आहे. उपधान (एक प्रकारचे तप) तप, आणि अमके तप. हे सर्व तर गोंधळलेली माणसे करतात. ज्यांना गरज आहे, शौक आहे, ते करतात. म्हणून आम्ही म्हणतो की, हे तप वगैरे तर शौकीन लोकांचे काम आहे. ज्यांना संसाराचा शौक आहे, त्यांनी ते तप करावे.

प्रश्नकर्ता : परंतु अशी मान्यता आहे की तप केल्याने कर्मांची *निर्जरा* (आत्म प्रदेशापासून कर्मांचे वेगळे होणे) होते.

दादाश्री : असे कधीच होत नाही. कोणत्या तपाने निर्जरा होते? त्यासाठी आंतरिक तप हवे. अदीठ तप, आम्ही म्हणतो ना की आपले

सर्व महात्मा अदीठ तप करतात, ते तप डोळ्यांनी दिसत नाही. डोळ्यांनी दिसणारे तप आणि कळून येणारे तप या सर्वांचे फळ पुण्य आहे आणि अदीठ तप, म्हणजे आतील तप, आंतरिक तप, जे बाहेरून दिसत नाही, त्याचे फळ मोक्ष आहे.

या साध्वीजींनी काय करायला हवे? साध्वीजी जाणतात की त्यांना कषाय होतात, दिवसभर कषाय होत असतात. मग त्यासाठी त्यांनी काय केले पाहिजे? तर त्यांनी संध्याकाळी एकत्र बसून एक पूर्ण *गुंठाणा* (48 मिनिटे, गुणस्थानक) हा कषाय भाव झाला, यांच्याप्रती हा कषाय भाव झाला, यांच्याप्रती हा कषाय झाला, असे सर्व आठवून ज्याच्याप्रती दोष झाला असेल त्याच्याप्रती प्रत्याख्यानही केले पाहिजे की 'पुन्हा असे करणार नाही, पुन्हा असे करणार नाही', असे केले तर त्या मोक्षमार्गावर बरोबर चालल्या आहेत.

त्या बिचाऱ्या तर असे काही करत नाहीत, मग काय होणार? मोक्षमार्ग नीट समजून घेतला तर त्या मार्गाने चालता येईल ना? समजण्याची गरज आहे..

प्रश्नकर्ता : परंतु जोपर्यंत त्या प्रत्यक्ष माफी मागत नाहीत तोपर्यंत त्यांच्यात अढी तर राहणारच ना? म्हणून प्रत्यक्ष माफी मागायलाच हवी ना?

दादाश्री : प्रत्यक्ष माफी मागण्याची गरज नाही. भगवंतांनी मनाई केली आहे. जर एखादी चांगली व्यक्ती असेल तर तुम्ही त्याची माफी मागायला जा. प्रत्यक्ष माफी मागा, आणि जर निर्बल व्यक्ती असेल, तर तुम्ही माफी मागितल्यावर तो टोमणे मारील. आणि तो निर्बल माणूस आणखी निर्बल होईल. म्हणून अशा लोकांची प्रत्यक्ष माफी न मागणेच चांगले. बहुतेक सर्व जग निर्बलच आहे. बदल्यात टोमणे मारणार. म्हणेल 'तरी मी सांगतच होते ना, तेव्हा तुला समजत नव्हते, तू ऐकत नव्हतीस, आता आलीस ना ताळ्यावर.' 'अहो, ती ताळ्यावरच आहे, ती बिघडली नाही. तू बिघडलेली आहेस, ती सुधारली आहे, सुधारत आहे.'

मोक्षमार्गात क्रियाकांड वगैरे काही नसते. क्रियाकांडे फक्त संसार मार्गातच असतात. संसार मार्ग म्हणजे ज्यांना भौतिक सुखे पाहिजेत, दुसरे काही तरी पाहिजे, त्यांच्यासाठी क्रियाकांडे आहेत. मोक्षमार्गात असे काही नसतेच. मोक्षमार्ग म्हणजे काय? तर 'आलोचना-प्रतिक्रमण आणि प्रत्याख्यान.' बस, मग गाडी चालवतच राहायची, तोच हा आपला मोक्ष मार्ग आहे. यात क्रियाकांड वगैरे काहीच नसते ना!

आलोचना-प्रतिक्रमण-प्रत्याख्यान, हाच मोक्ष मार्ग. किती तरी जन्मांपासून आमची हीच लाइन आहे. किती तरी जन्मांपासून 'आलोचना-प्रतिक्रमण-प्रत्याख्यान' करत, करत, करत आम्ही इथपर्यंत आलो आहोत.

कषाय न करणे, आणि प्रतिक्रमण करणे, हे दोनच धर्म आहेत. कषाय न करणे हा धर्म आहे, आणि जर पूर्व कर्मानुसार कषाय झालेच तर त्याचे प्रतिक्रमण करणे हाच धर्म आहे. याशिवाय तिसरा कोणताही धर्म नाही. आणि नेमक्या ह्या दोन गोष्टीच लोकांनी वगळल्या आहेत.

आता जर तुम्ही त्यांना काही उलटे बोललात, तर तुम्हाला त्याचे प्रतिक्रमण करावे लागेल. एवढेच नव्हे तर त्यांनाही तुमच्यासाठी प्रतिक्रमण करावे लागेल. त्यांना का प्रतिक्रमण करावे लागेल? तर 'मी कधी तरी चूक केली असेल म्हणून यांना मला शिवीगाळ करण्याची वेळ आली?' म्हणजे त्यांना त्यांच्या चुकीबद्दल प्रतिक्रमण करावे लागेल. त्यांना त्यांच्या पूर्वजन्माचे प्रतिक्रमण करावे लागेल आणि तुम्हाला तुमच्या या जन्माचे प्रतिक्रमण करावे लागेल! एका दिवसात अशी पाचशे-पाचशे प्रतिक्रमणे कराल तेव्हा मोक्षाला जाऊ शकाल!

तुम्ही जरी एवढेच केले तर मग दुसरा कोणताही धर्म शोधला नाहीत तरी काही हरकत नाही. एवढे पाळलेत तरी पुरे आहे, आणि मी तुम्हाला गॅरंटी देतो, तुमच्या डोक्यावर हात ठेवतो, जा, मोक्षासाठी शेवटपर्यंत मी तुम्हाला मदत करीन! तुमची तयारी पाहिजे. एवढ्या एकाच शब्दाचे पालन केले तरी खूप झाले!

5. अक्रम विज्ञानाची पद्धत

आपले अक्रम विज्ञान आपल्याला काय सांगते? एखाद्याला विचारले की 'तू खूप दिवसांपासून चोरी करत आहेस का?' तर तो म्हणेल 'हो.' प्रेमाने विचारले तर सर्व काही सांगेल. 'किती वर्षांपासून चोरी करत आहेस?' तर तो सांगेल, 'दोन वर्षांपासून करत आहे.' मग आम्ही त्याला सांगू, 'तू चोरी करतोस, काही हरकत नाही. पण तू एवढे प्रतिक्रमण करत जा.' असे म्हणून आम्ही त्याच्या डोक्यावरून हळूवार हात फिरवतो.

प्रतिक्रमण केले म्हणून चोरी पूर्णपणे पुसली गेली. कारण त्याचा अभिप्रायच बदलून गेला. तो जे करत आहे त्यात आता त्याचा अभिप्राय नाही. नॉट हिज ओपिनियन (त्याचा अभ्रिपाय नाही).

'तू दादांचे नाव घे, आणि मग पश्चात्ताप कर. आता पुन्हा मी असे करणार नाही, चोरी केली हे चुकीचे केले, आता पुन्हा असे करणार नाही,' असे म्हण, असे त्याला शिकवतो.

आम्ही असे शिकवल्यानंतर त्याचे आई-वडील काय म्हणतात? 'त्याने पुन्हा चोरी केली.' अहो, पुन्हा चोरी केली तरीही असेच बोलत राहावे (पुन्हा प्रतिक्रमण कर). असे बोलल्याने काय होते ते मी जाणतो. याशिवाय दुसरा उपायच नाही.

म्हणजे हे अक्रम विज्ञान असे शिकवते की हे जे बिघडलेले आहे, ते सहज सुधारणार नाही, पण या पद्धतीने त्याला सुधारा.

सर्व धर्म म्हणतात, तुम्ही तपाचे कर्ता आहात, त्यागाचे कर्ता आहात. तुम्हीच त्याग करता, आणि तुम्ही त्याग 'करत नाही, करत नाही.' असे म्हणणे हेही 'करत आहे' म्हणण्यासारखेच आहे. तसे तर तुम्ही कर्तेपणा स्वीकारत आहात. आणि सांगता माझ्याकडून त्याग होत नाही, तर तोसुद्धा कर्तेपणाच आहे. हो, आणि जे कर्तेपणा स्वीकारतात ते सारे देहाध्यासी मार्ग आहेत. आम्ही कर्तेपणा स्वीकारतच नाही. आपल्या पुस्तकात कोठेही 'असे करा', असे लिहिलेले नसते.

म्हणजे जे करायचे आहे ते तर राहूनच गेले आणि जे करायचे नाही, तेच करायला लावतात. आणि खरे तर 'करायचे नाही' हेही शक्य होत नाही, मग उगाच 'वेस्ट ऑफ टाइम एन्ड एनर्जी', (शक्ती आणि वेळेचा व्यय) कशाला? जे करायचे आहे ते तर वेगळेच आहे. करायचे एवढेच आहे की तुम्हाला शक्ती मागायची आहे. आणि पूर्वी जी शक्ती मागितली होती, त्याप्रमाणे आज होत राहिले आहे.

प्रश्नकर्ता : पूर्वीचे तर आता इफेक्ट (परिणामा)मध्येच आले आहे.

दादाश्री : हो, इफेक्टमध्ये आले आहे, म्हणजे कॉजेसच्या रूपात तुम्हाला शक्ती मागायची आहे. आम्ही 'नऊ कलमांमध्ये' जशी शक्ती मागण्यासाठी सांगितले आहे, तशी मागितली, तर त्यात संपूर्ण शास्त्र सामावते. एवढेच करायचे आहे. दुनियेत करायचे किती? तर एवढेच. शक्ती मागायची, जर कर्ताभावाने करायचेच असेल तर.

प्रश्नकर्ता : म्हणजे शक्ती मागणे हेच ना?

दादाश्री : कारण सगळेच मोक्षाला थोडेच जातात? पण कर्ताभावाने करायचे असेल तर एवढे करा. शक्ती मागा. कर्ताभावाने शक्ती मागा. असे आम्ही म्हणतो.

प्रश्नकर्ता : म्हणजे ज्यांनी ज्ञान घेतले नाही, त्यांच्यासाठी ही गोष्ट आहे?

दादाश्री : हो, ज्यांनी ज्ञान घेतलेले नाही अशा जगातील लोकांसाठी आहे. नाही तर आता ज्या मार्गाने लोक चालत आहेत तो तर बिलकुल उलट मार्ग आहे. त्यामुळे कोणाही व्यक्तीला त्याचा किंचितही फायदा मिळणार नाही.

'करायचे आहे, पण होत नाही', वाकडे कर्म उदयास आले तर काय होईल? भगवंतांनी तर असे सांगितले होते की 'उदय स्वरूपात राहून तुम्ही त्याला जाणा.' करण्यासाठी सांगितले नव्हते. फक्त 'त्याला

जाणा' एवढेच सांगितले होते. त्याऐवजी हे म्हणतात, 'हे केले, पण होत नाही, करत आहोत पण होत नाही. खूप इच्छा आहे पण होत नाही.' अरे, पण विनाकारण असे रडगाणे का गात आहात? 'माझ्याने होत नाही, होत नाही', असे चिंतवन केल्याने आत्मा कसा होऊन जाईल? दगडच होऊन जाईल. आणि हे लोक तर कर्मकांडेच करत राहतात. आणि शिवाय 'होत नाही, होत नाही' असेही बोलत बसतात.

मी त्यांना मनाई करतो की, असे बोलू नये. अरे, 'होत नाही' असे तर बोलूच नये. तू तर अनंत शक्तीवाला आहेस, असे जेव्हा आम्ही समजावतो, तेव्हा मग तो 'मी अनंत शक्तीवाला आहे' असे बोलतो. नाही तर आतापर्यंत 'होत नाही' असेच बोलत होता! अनंत शक्ती काय निघून गेली आहे का?

कारण माणूस काही करू शकेल असे नसतेच. मनुष्य स्वभाव काही करू शकत नाही. करणारी परसत्ता आहे. हे जीव, फक्त जाणणारेच आहेत. म्हणून तुम्ही हे जाणत राहायचे, आणि तुमच्या या जाणण्यामुळे चुकीच्या ठिकाणी जी तुमची श्रद्धा बसली होती, ती नष्ट होईल. आणि मग तुमच्या अभिप्रायामध्ये बदल होईल. काय बदल होईल? तर 'खोटे बोलणे चांगले आहे', हा अभिप्राय नष्ट होईल. आणि हा अभिप्राय बदलला यासारखा दुसरा कोणताच पुरुषार्थ नाही. या जगात ही फार सूक्ष्म गोष्ट आहे, पण खूप खोल विचार करण्याची गरज आहे.

प्रश्नकर्ता : नाही, पण ही गोष्ट तर पूर्णपणे लॉजिकल (तर्कशुद्ध) आहे.

दादाश्री : शौचाला जाणे हेही परसत्तेत आहे, तर मग काही करण्याचे तुमच्या हातात कसे असू शकेल? असा कोणताही मनुष्य जन्माला आला नाही की, ज्याच्या हातात थोडीशीही करण्याची सत्ता आहे. तुम्हाला तर फक्त जाणायचे आहे आणि निश्चय करायचा आहे. बस, फक्त एवढेच करायचे आहे. एवढे जरी समजले, तरी तुमचे काम होऊन जाईल. पण ही सहज समजेल इतकी सोपी गोष्ट नाही. करण्यापेक्षा जाणणे चांगले. हे समजते का तुम्हाला? लगेच करता येते का?

प्रश्नकर्ता : दादाजी, आपण जे सांगत आहात ते समजले. आपले म्हणणे बरोबर आहे, परंतु 'असे करावे', हे समजल्यानंतर सुद्धा करायचे तर बाकीच राहते ना? जशी करण्याची सत्ता नाही, तशी जाणण्याचीही सत्ता नाहीच ना?

दादाश्री : नाही! जाणण्याची सत्ता आहे, करण्याची सत्ता नाही. ही खूप सूक्ष्म गोष्ट आहे. ही एवढी गोष्ट जरी नीट समजली तरी खूप झाले.

एक मुलगा चोर बनून, चोरी करू लागला आहे संधी मिळाल्यावर खिशातून पैसे काढून घेतो. घरी आलेल्या पाहुण्यांनासुद्धा सोडत नाही.

आम्ही त्या मुलाला काय शिकवतो की, 'या जन्मी तू दादा भगवानांपाशी चोरी न करण्याची शक्ती माग.'

आता त्यामुळे त्याचा काय फायदा होईल? कोणी म्हणेल यात तुम्ही काय शिकवले? तो तर शक्ती मागत राहतो, आणि चोरीही करत राहतो. अरे! करू दे ना चोरी. पण तो सतत शक्ती मागत आहे की नाही? हो, शक्ती तर मागतो. आम्ही जाणतो की हे औषध काय काम करत आहे. तुम्हाला कसे समजणार की हे औषध कसे काम करत आहे?

प्रश्नकर्ता : खरेच, त्यांना समजत नाही की हे औषध कसे काम करत आहे? म्हणजे शक्ती मागितल्याने लाभ होतो की नाही, तेही त्यांना समजत नाही.

दादाश्री : याचा भावार्थ काय आहे? एक तर तो मुलगा मागत आहे की 'मला चोरी न करण्याची शक्ती दे', म्हणजे त्याने स्वतःचा अभिप्राय बदलला. 'चोरी करणे चुकीचे आहे, आणि चोरी न करणे हेच बरोबर आहे' अशी शक्ती मागतो, म्हणजे तो 'चोरी करू नये' या अभिप्रायावर आला. सर्वात महत्त्वाचे तर अभिप्राय बदलला हेच आहे!

आणि अभिप्राय बदलला तेव्हापासूनच त्याचे गुन्हेगार होणे थांबले.

आणि दुसरे काय झाले? तर तो देवाकडे शक्ती मागत आहे, म्हणून त्याच्यात परम विनय उत्पन्न झाला. 'हे देवा! मला शक्ती दे.' असे म्हटले की देव ताबडतोब त्याला शक्ती देतो. गत्यंतरच नाही ना! देव सर्वांनाच शक्ती देतो. मागणारा मात्र पाहिजे. म्हणून तर मी सांगतो की तुम्ही मागायला विसरता! काही मागतच नाही, कधीच मागत नाही.

'शक्ती मागणे', हे तुम्हाला समजले का?

दादांकडे माफी मागायची आणि सोबत ज्या कारणासाठी शक्ती मागायची आहे त्याकरता, 'दादा, मला शक्ती द्या, शक्ती द्या असे म्हणायचे. तुम्ही शक्ती मागून घ्या, तुमची स्वत:ची शक्ती वापरू नका, नाही तर तुमची शक्ती संपून जाईल. आणि जर शक्ती मागून वापराल तर ती संपणार नाही, उलट वाढेल. कारण तुमच्या दुकानात किती माल (शक्ती) असेल?'

प्रत्येक बाबतीत 'दादा, मला शक्ती द्या', प्रत्येक बाबतीसाठी सतत शक्ती मागूनच घ्यावी. प्रतिक्रमण करायचे राहिले तर, 'योग्य पद्धतीने प्रतिक्रमण करण्याची मला शक्ती द्या.' असे म्हणून सर्व शक्ती मागून घ्यायच्या. आमच्याकडे तर तुम्ही मागून मागून थकाल एवढी शक्ती आहे.

6. राहतील फुले, जातील काटे...

प्रकृती क्रमणामुळे उत्पन्न झाली आहे आणि अतिक्रमणामुळे ती पसरत जाते. फांद्या-बिंद्या सर्व. आणि प्रतिक्रमणाने तो सारा पसारा कमी होत जातो, तेव्हा त्याला भान येते

मला काय म्हणायचे आहे की, समजा तुम्ही एखाद्या ठिकाणी जर दर्शनासाठी गेलात, तुम्हाला वाटले होते की ते ज्ञानी असतील पण तिथे ते गेल्यावर निघाले ढोंगी! तुम्ही तिथे गेलात तो तर प्रारब्धाचा खेळ होता, आणि तिथे गेल्यावर मनात त्यांच्याबद्दल वाईट भाव आले, की 'अरेरे! अशा नालायकाकडे मी का आलो?' तो नेगेटिव्ह पुरुषार्थ

तुमच्या आत झाला, त्याचे फळ तर तुम्हाला भोगावे लागेल. त्याला नालायक म्हटल्याचे फळ भोगावे लागेल, ते पाप भोगावे लागेल. विचार येणे हे स्वाभाविक आहे, पण लगेच आतमध्ये काय करायला हवे की, 'अरेरे! मी का असा गुन्हा केला?' लगेचच असा चांगला विचार करून आपण तो दोष धुऊन टाकला पाहिजे.

हो, 'महावीर भगवंतांचे' स्मरण करून किंवा कोणत्याही इष्ट देवाचे स्मरण करून, 'दादां'ना आठवून प्रतिक्रमण करावे की, 'अरेरे! तो कसा का असेना, पण माझ्याकडून अशी चूक का झाली?' चांगल्याला चांगले म्हणण्यात दोष नाही, परंतु चांगल्याला वाईट म्हणणे हा दोष आहे. आणि वाईटास वाईट म्हणणे हा पण मोठा दोष आहे, जबरदस्त दोष आहे! कारण तो स्वतः वाईट नाही, त्याच्या प्रारब्धाने त्याला वाईट बनवले आहे. प्रारब्ध म्हणजे काय? तर त्याच्या संयोगांनी त्याला वाईट बनवले आहे, त्यात त्याचा काय गुन्हा

समजा, इथून काही स्त्रिया जात असतील आणि तेव्हा तुम्हाला कोणी सांगितले की, 'पाहा ना, ही वेश्या इथे आली आहे, इथे कशी घुसली?' कोणी तुम्हाला असे म्हटल्यावर तुम्ही ही तिला वेश्या म्हटले, तर हा भयंकर मोठा गुन्हा ठरेल. ती म्हणते 'संयोगामुळे माझी ही परिस्थिती झाली आहे, पण तुम्ही का गुन्हा करत आहात?' मी तर माझे फळ भोगत आहे पण तुम्हीसुद्धा गुन्हा का करत आहात? ती काय स्वतःहून वेश्या बनली आहे? संयोगांनी बनवली आहे. कोणत्याही जीवाला वाईट बनण्याची इच्छा नसते, संयोगच सर्व काही करवितात, आणि नंतर त्याला त्याची सवय होऊन जाते. सुरुवात तर संयोगच करवितात.

प्रश्नकर्ता : ज्यांना ज्ञान नाही, ते काय ठराविक प्रकारचे दोषच पाहू शकतात?

दादाश्री : हो. बस एवढेच. त्यांना दोषांची माफी मागायला शिका असे थोडक्यात सांगायचे. जो दोष तुम्हाला दिसेल त्या दोषाची माफी मागा, आणि 'तो दोष बरोबर आहे', असे कधीही म्हणू नका, नाही तर तो दोष दुप्पट होईल. चूक झाल्यावर क्षमा मागा.

प्रश्नकर्ता : ज्यांनी ज्ञान घेतले नाही, त्यांना स्वत:चे दोष दिसतात, तर त्यांनी कशा प्रकारे प्रतिक्रमण करावे?

दादाश्री : ज्ञान घेतले नसेल, असे थोडे जागृत लोक असतात, की जे प्रतिक्रमण समजू शकतात. ते करू शकतात, पण अन्य लोकांचे हे काम नाही. परंतु प्रतिक्रमण शब्दाचा अर्थ 'पश्चात्ताप करणे', असे त्यांना सांगावे लागेल.

दादाश्री : प्रतिक्रमण केल्याने काय होते की, आत्मा आपल्या 'रिलेटिव्ह' वर स्वत:चा दबाव टाकतो. कारण अतिक्रमणामुळे 'रियल'वर दबाव पडतो. कर्म हे अतिक्रमण आहे, आणि जर त्यातच इंटरेस्ट (रस) वाटू लागला तर पुन्हा पोचा पडेल. म्हणून जोपर्यंत आपण चुकीला 'चूक' म्हणत नाही, तोपर्यंत गुन्हा आहे. म्हणूनच हे प्रतिक्रमण ('चंदुलाल'कडून) करवून घेणे गरजेचे आहे.

प्रश्नकर्ता : माझ्याकडून अतिक्रमण झाले, आणि त्याचे मी प्रतिक्रमण केले पण समोरच्याने मला माफ केले नाही तर?

दादाश्री : समोरच्याचे आपण पाहायचे नाही. तुम्हाला कोणी माफ करो वा न करो, ते पाहण्याची गरज नाही. तुमच्यातील हा अतिक्रमण करण्याचा स्वभाव संपला पाहिजे. तुम्ही अतिक्रमणाच्या विरोधी व्हायला हवे.

प्रश्नकर्ता : आणि जर समोरच्याला दु:ख होत असेल तर?

दादाश्री : समोरच्याचे असे काहीही पाहायचे नाही. तुम्ही अतिक्रमणाच्या विरोधी आहात असे निश्चित व्हायला हवे. तुम्हाला अतिक्रमण करायची इच्छा नाही, जे झाले त्यासाठी पश्चात्ताप होत आहे आणि आता पुन्हा तसे करण्याची तुमची इच्छा पण नाही

प्रतिक्रमण तर आपल्याला अभिप्राय काढून टाकण्यासाठी करायचे आहे. 'आता आपण त्या मताचे राहिलो नाही. आपण त्या मताच्या विरुद्ध आहोत', असे दर्शविण्यासाठी प्रतिक्रमण करायचे आहे. तुम्हाला समजले का?

प्रश्नकर्ता : जर हे निकालीच आहे, तर मग प्रतिक्रमण कशासाठी?

दादाश्री : सर्वच निकाली आहेत, केवळ भावच नाही, तर इतर सर्वही निकालीच आहे. प्रतिक्रमण तर, जेवढे अतिक्रमण केले तेवढेच प्रतिक्रमण करायचे असते, जास्त काही नाही. आणि जर तसे केले नाही तर आपला स्वभाव कधीच बदलणार नाही, जसा आहे तसाच राहील. तुम्हाला समजले की नाही

विरोधी मत जर जाहीर केले नाही, तर मग ते मत तुमच्याजवळच राहील. क्रोध आला तर तुम्ही क्रोधाच्या बाजूने नाही, यासाठी प्रतिक्रमण करावे लागते. नाही तर क्रोधाच्या बाजूने आहात, असे निश्चित होईल. आणि प्रतिक्रमण केले तर तुम्हाला क्रोध आवडत नाही, हे जाहीर झाले असे म्हणता येईल म्हणजेच तुम्ही त्यातून सुटलात. मुक्त झालात, मग तुमची जबाबदारी कमी झाली. 'तुम्ही त्याचे विरोधी आहात', असे जाहीर करण्यासाठी काही साधन तर असले पाहिजे ना! तुम्हाला क्रोध ठेवायचा आहे, की काढून टाकायचा आहे?

प्रश्नकर्ता : तो तर काढूनच टाकायचा आहे.

दादाश्री : जर काढून टाकायचा असेल, तर प्रतिक्रमण करा. मग तुम्ही क्रोधाच्या विरोधात आहात. आणि जर तुम्ही प्रतिक्रमण केले नाही तर तुम्ही क्रोधाशी सहमत आहात असे होईल.

प्रतिक्रमण कशाला म्हणावे, की हलके वाटते, हलकेपण अनुभवास येते. पुन्हा त्याला तसे दोष करताना खूप दुःख होत असते. आणि बाकी ते दोषांचे गुणाकार करतात.

तुम्ही कधी खरे प्रतिक्रमण पाहिले आहे का, एक तरी दोष कमी होईल असे प्रतिक्रमण?

प्रश्नकर्ता : नाही, ते इथेच पाहायला मिळाले.

ज्ञान घेतल्यानंतर आपल्याला आत कळते की 'हा दोष झाला आहे.' दोष कळल्यावरच प्रतिक्रमण होऊ शकते. तोपर्यंत होऊ शकत

नाही ना? ज्ञान घेतल्यानंतर अशी जागृती राहील की अतिक्रमण होताच लगेच तुम्हाला कळेल की 'ही चूक झाली.' आणि चूक कळल्यावर तुम्ही लगेचच प्रतिक्रमण कराल. मग त्याच्या नावाने पद्धतशीर प्रतिक्रमणे होतच राहतील. आणि प्रतिक्रमण केल्याने ते धुतले जाईल. दोष धुतल्यानंतर समोरच्याला वैरभाव राहत नाही. नाही तर आपण जेव्हा त्याला पुन्हा भेटतो तेव्हा त्याच्याबरोबर भेद निर्माण होतो.

प्रश्नकर्ता : आमची पापकर्मे आता आम्ही कशी धुवावीत?

दादाश्री : पाप कर्मांचे जितके डाग लागले आहेत, तितकी प्रतिक्रमणे करावी लागतील. डाग जर चिकट असेल, तर त्याला वारंवार धूत राहायचे. वारंवार धूत राहायचे.

प्रश्नकर्ता : तो डाग निघाला की नाही, हे कसे कळेल?

दादाश्री : ते तर जेव्हा आतून मन स्वच्छ होऊन जाते ना, तेव्हा कळते. चेहऱ्यावर मस्ती येते. तुम्हाला ते कळत नाही का? डाग निघूनच गेला तर कळणार कसे नाही? त्यात काय अडचण आहे? आणि जरी धुतला गेला नाही तरी आपल्याला हरकत नाही. तुम्ही प्रतिक्रमण करत राहा ना! साबण लावत राहा! तुम्ही पाप ओळखता का? खरोखर ओळखता का?

प्रश्नकर्ता : दादांच्या आज्ञेचे पालन न करणे म्हणजे पाप?

दादाश्री : नाही, असे नाही, त्याला पाप म्हणत नाहीत. समोरच्याला दुःख झाले तर ते पाप आहे. मग तो कोणताही जीव असो, मनुष्य असो की जनावर असो, किंवा झाड असो, विनाकारण झाडाची पाने तोडली तर त्यालाही दुःख होते, म्हणजे ते पाप आहे.

आणि आज्ञांचे पालन करता आले नाही तर तुमचे स्वतःचेच नुकसान होईल. आणि पापकर्म म्हणजे तर इतर कोणाला दुःख देणे. म्हणून कोणाला किंचितमात्रही दुःख होणार नाही असे वागावे.

आपण प्रतिक्रमण केले तर ते फार चांगले आहे. आपले कपडे

(दोषरूपी डाग) तर स्वच्छ होतील ना? आपल्या कपड्यांमध्ये मळ का राहू द्यायचा? दादांनी असा उत्तम रस्ता दाखवला आहे, तर का स्वच्छ करू नये?

कोणाला आपल्यामुळे किंचितमात्र दु:ख झाले तर समजावे की ती आपलीच चूक आहे. आपल्या आत परिणाम वर-खाली होतात म्हणून चूक आपलीच आहे, असे कळते. समोरची व्यक्ती भोगत आहे, म्हणून त्याची चूक तर प्रत्यक्षच आहे, परंतु आपण निमित्त बनलो, आपण त्याला रागावलो, म्हणून आपलीही चूक आहे. दादांना का भोगावे लागत नाही? कारण त्यांची एकही चूक उरली नाही. आपल्या चुकीमुळे समोरच्यावर काहीही परिणाम झाला, जर काही उधारी झाली, तर त्वरितच मनातून माफी मागून जमा करून टाकावे. आपली चूक झाली तर उधारी होते पण त्वरितच कॅश-रोख प्रतिक्रमण करून घ्यावे. आणि जर कोणाच्या निमित्ताने आपली चूक झाली तरीही आपण 'आलोचना-प्रतिक्रमण-प्रत्याख्यान' करावे. मन-वचन-कायेने, प्रत्यक्ष दादा भगवानांच्या साक्षीने सतत माफी मागत राहावी.

प्रश्नकर्ता : जेव्हा क्रमिकचे प्रतिक्रमण करत होतो तेव्हा डोक्यात काही शिरत नव्हते, पण आता इथे हे प्रतिक्रमण करतो तेव्हा हलके-फुलके झाल्यासारखे वाटते.

दादाश्री : परंतु ते प्रतिक्रमण तर तुम्ही समजल्याशिवायच करत होता ना! (खरे) प्रतिक्रमण म्हणजे दोष लगेच कमी झाले पाहिजेत, त्याला प्रतिक्रमण म्हणतात. आपण उलट दिशेने गेलो होतो, आणि आता परत फिरलो त्यालाच म्हणतात प्रतिक्रमण. आणि ते तर परत फिरलेच नाहीत, आहेत तिथेच आहेत, उलट आणखी पुढे गेले! मग त्याला प्रतिक्रमण म्हणूच कसे शकतो?

जेव्हा जेव्हा गुंता होत आहे असे वाटेल तेव्हा अवश्य 'दादां'ची आठवण येईल, आणि गुंता होणार नाही. आम्ही तर म्हणतो की तू गुंता करूच नकोस, आणि जर कधी गुंता झालाच तर प्रतिक्रमण कर.

गुंता हा शब्द लोकांना सहज समजेल असा आहे. लोक 'सत्य बोला, दया करा, चोरी करू नका,' हे ऐकून, ऐकून तर थकून गेले आहेत.

आत गुंता झाला असेल तर तसेच झोपून जायचे नाही, तर गुंता सोडवायला हवा. शेवटी काहीच मार्ग सापडला नाही, तर भगवंतांजवळ सतत माफी मागत राहावी की, 'ह्यांचाशी गुंता झाला आहे, त्यासाठी मी माफी मागतो', असे केल्याने गुंता सुटेल. 'माफी' हेच सर्वात मोठे शस्त्र आहे. बाकी, दोष तर निरंतर होतच राहतात.

तुम्ही जेव्हा समोरच्याला रागावता, तेव्हा तुमच्या लक्षात असे येत नाही का की जर तुम्हाला कोणी रागावले तर कसे वाटेल? असे लक्षात ठेवून मगच रागवा.

समोरच्याचाच विचार करून प्रत्येक कार्य करणे, यालाच म्हणतात मानवी अहंकार. आणि फक्त स्वत:चाच विचार करून प्रत्येकांबरोबर वर्तन करणे आणि दुसऱ्यांना त्रास देणे, याला काय म्हणाल?

प्रश्नकर्ता : पाशवी अहंकार?

दादाश्री : कोणी जर असे म्हणाले की, 'चंदुभाई चूक करतात', तर तुम्ही पण चंदुभाईला सांगावे, 'चंदुभाई, तुमच्याकडून चूक झाली असेल म्हणूनच ते असे बोलतात ना? नाही तर विनाकारण कोणी असे बोलेल का?' काही ना काही चूक झालीच असेल, त्याशिवाय कोणी असे बोलत नाही. तर मग आपल्यालाही असे म्हणायला काय हरकत आहे? 'भाऊ, काही तरी चूक असेलच म्हणून ते बोलत आहेत, तर आता त्यासाठी तुम्ही माफी मागा.' आणि जर चंदुभाईने कुणाला दु:ख दिले तर आपण चंदुभाईला सांगावे, 'बाबा रे, प्रतिक्रमण कर!', कारण आपल्याला मोक्षाला जायचे आहे. आता वाटेल तसे वागून चालणार नाही.

दुसऱ्यांचे दोष पाहण्याचा आपल्याला अधिकारच नाही. म्हणून त्या दोषाबद्दल माफी, क्षमा मागावी, आणि प्रतिक्रमण करावे. दुसऱ्यांचे दोष पाहाण्याची सवय तर पूर्वीपासूनच होती ना? त्यात नवीन काय

आहे? ती सवय एकदम सुटणार नाही. ती तर या प्रतिक्रमणानेच सुटेल. जिथे दोष दिसतात तिथे 'शूट ऑन साइट' प्रतिक्रमण करा. 'शूट ऑन साइट!'

प्रश्नकर्ता : अजून जशी प्रतिक्रमणे व्हायला हवीत, तशी होत नाहीत.

दादाश्री : आपल्याला जे काही करायचे असेल त्याचा आधी निश्चय करावा लागतो.

प्रश्नकर्ता : निश्चय करणे म्हणजे त्यात करण्याचा अहंकार तर आलाच ना? मग हे काय आहे, ते जरा समजवा.

दादाश्री : हे फक्त बोलण्यासाठीच आहे, फक्त बोलण्यासाठी.

प्रश्नकर्ता : महात्म्यांमधील काही लोक असे समजतात की आपल्याला काहीच करायचे नाही, निश्चयसुद्धा करायचा नाही.

दादाश्री : पण नाही, मला विचारले तर मी त्यांना सांगेन की निश्चय म्हणजे काय, तर 'डिसायडेड' पूर्वक (ठरवून) करणे. ठरवून म्हणजे काय? तर हे नाही, आणि 'हे', बस. 'तसे नाही, तर असे असायला हवे.'

प्रश्नकर्ता : आतमध्ये उत्पात होतो, तेव्हा त्याचे 'शूट ऑन साइट' निकाल करणे जमत नाही, परंतु संध्याकाळी 10-12 तासानंतर असा विचार येतो, की हे सर्व चुकीचे झाले, तर काय त्याचा निकाल होऊ शकतो? एवढ्या उशिराने केले तरी?

दादाश्री : हो, उशिराने का होईना, त्याचे प्रतिक्रमण करायला हवे. चूक झाल्यावर प्रतिक्रमण करावे, आहे, 'हे दादा भगवान! माझी चूक झाली. आता पुन्हा मी करणार नाही.'

लगेच झाले नाही तर दोन तासांनी करा. अरे, रात्री करा. रात्री आठवून करा. रात्री आठवून करू शकता ना की, 'आज कोणाबरोबर

वाद-विवाद झाला?' असे रात्री करता येत नाही का? अरे, मग आठवड्यानंतर करा. आठवड्यानंतर सर्व एकत्रपणे करा. आठवड्याभरात जेवढी अतिक्रमणे झाली असतील त्या सर्वांचा एकत्रपणे हिशोब करा.

प्रश्नकर्ता : परंतु ते लगेच व्हायला हवे ना?

दादाश्री : लगेच झाले तर त्यासारखी चांगली गोष्टच नाही, आपल्याकडे तर बहुतेक सर्व शूट ऑन साइटच करतात. (दोष) दिसताच शूट करा. दिसताक्षणीच शूट.

प्रश्नकर्ता : मी जेव्हा दादांचे नाव घेतो, किंवा आरती करतो तेव्हा मन इतरत्र भटकत असते. मग आरतीमध्ये काही वेगळेच गात राहतो, काही ओळी वेगळ्या गायल्या जातात. मनात जे विचार येतात त्यात तन्मयाकार होऊन जातो. मग थोड्या वेळाने त्यातून परत फिरतो.

दादाश्री : असे आहे ना, त्या दिवशी तुम्ही प्रतिक्रमण करावे. विचार आले तर हरकत नाही, जेव्हा विचार येतात तेव्हा आपण 'चंदुलाल'ला पाहू शकतो की 'चंदुलाल'ला विचार येत आहेत', जर असे सर्व पाहता आले तर 'आपण' आणि 'ते' दोन्ही वेगळेच आहेत. पण तेव्हा तुम्ही जरा कमी पडता.

प्रश्नकर्ता : तेव्हा तर जागृतीच राहत नाही ना?

दादाश्री : तर त्यासाठी प्रतिक्रमण करावे की, 'ही जागृती राहिली नाही त्याचे मी प्रतिक्रमण करतो. दादा भगवान, मला क्षमा करा.'

प्रश्नकर्ता : प्रतिक्रमण करण्याचे फार उशिरा आठवते की या व्यक्तीचे प्रतिक्रमण करायचे होते.

दादाश्री : पण आठवण तर येते ना? सत्संगात जास्त बसण्याची गरज आहे. सर्व काही बारकाईने विचारून घ्यावे लागते. हे तर विज्ञान आहे. सर्व काही विचारून घेण्याची गरज आहे.

(स्वतःचे) दोष दिसणे ही काही साधी-सोपी गोष्ट नाही. आणि

आम्ही तर पूर्णपणे उघड करून देतो, पण त्याची अशी दृष्टी असेल की, 'मला (दोष) पाहायचे आहेत', तर मग त्याला दिसत राहतील. जसे जेवणाच्या ताटातून जेवण करण्यासाठी स्वत:ला हात तर उचलावा लागतो ना? आपोआपच जेवण माझ्या तोंडात जाईल, असे थोडेच होईल? प्रयत्न तर करावेच लागतील ना?

माणसाकडून दोष होणे स्वाभाविक आहे, त्यापासून मुक्त होण्याचा रस्ता कोणता? तर 'प्रतिक्रमण.' आणि तो फक्त ज्ञानी पुरुषच दाखवू शकतात.

आतमध्ये आपोआप प्रतिक्रमणे होत राहतात. लोक विचारतात, आपोआपच प्रतिक्रमणे होतात का? मी सांगतो, 'हो, बघा मी कसे यंत्र ठेवले आहे? त्यामुळे आपोआपच प्रतिक्रमण सुरू होते.' तुमची नीयत स्वच्छ असेल तर सर्व काही तयार असते.

प्रश्नकर्ता : हे खरे आहे दादा, प्रतिक्रमणे आपोआपच होतात आणि दुसरे म्हणजे हे विज्ञान असे आहे की अजिबात द्वेष होत नाही.

प्रश्नकर्ता : आणि दादा हे भाऊ म्हणतात की, 'माझ्याने प्रतिक्रमण होत नाही', त्याला काय म्हणावे?

दादाश्री : आत तर प्रतिक्रमणे होत असतात पण ते लक्षात येत नाही. पण एकदा असे बोलले, की 'माझ्याने होत नाही' की मग ते बंद होते, ती मशीन बंद होते, 'जशी भजना तशी भक्ती.' ते तर आत होतच राहते. काही काळानंतर होते.

प्रश्नकर्ता : आमच्यामुळे कुणाला दु:ख झाले तर ते आम्हाला आवडत नाही, बस, एवढेच वाटते, त्याहून पुढे जाता येत नाही. प्रतिक्रमण होत नाही.

दादाश्री : हे तर आपण जसे बोलू तशी आत जी मशीन ठेवलेली आहे, ती चालते! जशी भजना तशी भक्ती. तुम्ही म्हटले की, 'माझ्याने हे होत नाही', तर तसे होईल आणि जर तुम्ही म्हटले की, 'माझ्याने

खूप प्रतिक्रमणे होतात, की मी अगदी थकून जातो' तर खरेच तो थकून जातो. म्हणजे प्रतिक्रमण करणारा करीत आहे, तुम्ही तुमची गाडी ढकलत राहा ना, नंतर पुढे पुढे पाचशे-पाचशे प्रतिक्रमणे होऊ लागतील. तुम्ही फक्त बोलत राहा की 'माझ्याने प्रतिक्रमणे होतात.'

असे आहे, की शक्यतोवर 'शूट ऑन साइट' करावे. दोष दिसल्याबरोबर त्वरित प्रतिक्रमण करावे. आणि जर असे करता आले नाही तर संध्याकाळी एकत्र करावे. पण तसे करताना दोन चार (दोष) राहून जातात, ते तरी कशाला शिल्लक ठेवावे? आणि असे कोण ठेवणार? आपले काम तर 'शूट ऑन साइट'चे आहे ना!

जेव्हापासून दोष दिसायला सुरुवात होते, तेव्हापासूनच समजावे की मोक्षाला जाण्याचे तिकीट मिळाले. स्वतःचे दोष कुणालाही दिसत नाहीत, मोठमोठ्या साधू-आचार्यांनाही दिसत नाहीत! स्वतःचे दोष दिसत नाहीत, मुळात हीच सर्वात मोठी उणीव आहे. आणि हे विज्ञान असे आहे की, हे विज्ञानच तुम्हाला निष्पक्षपातीपणे जजमेंट देते. स्वतःचे सर्व दोष उघड करते. दोष झाल्यानंतर का होईना, पण उघड करते ना? आता जे झाले ते झाले, ती वेगळी गोष्ट आहे. गाडीचा वेग जास्त असेल तर अपघात होऊ शकतो ना? मग तेव्हा तरी कळेलच ना?

7. होतो चोख व्यापार

प्रश्नकर्ता : तुम्ही चंदुभाईला असे मोकळे सोडले तर तो वाटेल ते करील?

दादाश्री : नाही, म्हणूनच मी त्याला 'व्यवस्थित' (सायंटिफिक सरकमस्टेन्शियल एविडन्स) म्हटले आहे की, 'या एका जन्मासाठी एका केसाइतकाही फेरफार करण्याचा अधिकार नाही, 'वन लाईफ' - एका जन्मासाठी, बरे का! ज्या जन्मात मी 'व्यवस्थित' देतो, त्या 'व्यवस्थित'मध्ये फेरफार होऊ शकेल असे नाही. म्हणून तर मी तुम्हाला मोकळीक देतो. अर्थात हे सारे मी (ज्ञानात) 'पाहून' सांगत आहे, आणि त्यामुळे मला ओरडावेही लागत नाही की, 'बायको बरोबर का

फिरत होतात? आणि असे का? तसे का? पुढच्या जन्मासाठी नाही, परंतु या जन्मासाठी 'यू आर नॉट रिस्पॉन्सिबल एट ऑल.' (तुम्ही किंचितही जबाबदार नाही) एवढे सारे तर सांगितले आहे.

प्रश्नकर्ता : व्याज घ्यावे की घेऊ नये?

दादाश्री : 'चंदुलाल'ला व्याज घ्यायचे असेल तर घेऊ द्या, पण त्याला सांगावे नंतर प्रतिक्रमण कर.

या प्रतिक्रमणामुळे समोरच्या व्यक्तीवर परिणाम होतो आणि तो पैसे परत करतो. समोरच्या व्यक्तीत अशी सद्‌बुद्धी उत्पन्न होते, प्रतिक्रमणामुळे असा सुलट परिणाम होतो. पण काही लोक तर वसूली करणाऱ्याच्या घरी जाऊन त्याला शिवीगाळ करतात, त्यामुळे मग त्याचा उलट परिणाम होईल की नाही? खरे तर, लोक गुंतागुंत वाढवीतच राहतात. हे सारे जग परिणाम करणारेच आहे.

प्रश्नकर्ता : आम्ही कोणा घेणेदाराचे प्रतिक्रमण केले तरी पण तो पैसे मागतच राहील ना?

दादाश्री : मागण्या न मागण्याचा प्रश्न नाही, राग-द्वेष होता कामा नये. कर्ज तर कदाचित राहीलही!

कोणी म्हणेल, 'मला धर्म नको, मला भौतिक सुखे पाहिजेत', तर मी त्याला सांगेन, 'प्रामाणिक राहा, आणि नीतीचे पालन करा.' मी त्यांना देवळात जायला सांगणार नाही. तुम्ही दुसऱ्यांना देता तोच देवधर्म आहे, पण दुसऱ्यांचे बिन हक्काचे घेत नाही, तो मानव धर्म आहे. प्रामाणिकता हा सर्वात मोठा धर्म आहे. 'डिसऑनेस्टी इज द बेस्ट फूलिशनेस' (अप्रामाणिकता हा सर्वात मोठा मूर्खपणा आहे)!!! मी प्रामाणिक होऊ शकत नाही, मग काय मी समुद्रात उडी टाकू? माझे दादाजी असे शिकवतात की अप्रामाणिक झालास तर त्यासाठी तू प्रतिक्रमण कर. त्याने तुझा पुढचा जन्म उज्ज्वल होईल. अप्रामाणिकतेला अप्रामाणिकता म्हणून ओळख आणि त्यासाठी पश्चात्ताप कर. पश्चात्ताप करणारा माणूस प्रामाणिक आहे, हे नक्की.

जर भागीदाराबरोबर मतभेद झाले, तर लगेच तुम्हाला जाणीव होईल की 'हे गरजेपेक्षा जास्त बोलले गेले.' म्हणून ताबडतोब त्याच्या नावाने प्रतिक्रमण करावे. तुमचे प्रतिक्रमण कॅश पेमेंटवाले (रोख) असायला हवे. आपली ही बँक पण कॅश आणि पेमेंट पण कॅश आहे.

ऑफिसमध्ये परमिट घ्यायला गेला, पण साहेबाने ती दिली नाही, तर मनात वाटते की, 'साहेब नालायक आहे, असा आहे, तसा आहे.' आता त्याचे फळ काय येईल? हे त्याला माहीत नाही. म्हणून प्रतिक्रमण करून मनातील हे भाव बदलून टाकावे. यालाच आम्ही जागृती म्हणतो.

या संसारात अंतराय कसे पडतात ते मी तुम्हाला समजावतो. तुम्ही ज्या ऑफिसमध्ये नोकरी करता, तिथे तुम्ही असिस्टन्ट (सहायक) ला बेअक्कल म्हटले तर तुमच्या अकलेवर अंतराय पडेल. बोला आता, अशा तऱ्हेने संपूर्ण जगाने अंतरायात अडकूनच हा मनुष्य जन्म गमावून टाकला आहे! समोरच्या व्यक्तीला बेअक्कल म्हणण्याचा तुम्हाला अधिकारच नाही. तुम्ही असे बोललात तर समोरचाही उलट बोलेल. त्यामुळे त्यालाही अंतराय पडेल. बोला आता, या अंतरायांपासून जग कसे सुटेल? तुम्ही कुणाला नालायक म्हणता, तेव्हा तुमच्या लायकीवर अंतराय पडतो! तुम्ही जर त्याचे लगेचच प्रतिक्रमण केले तर तो अंतराय पडण्या अगोदरच धुतला जातो.

प्रश्नकर्ता : नोकरीचे कर्तव्य पाळताना मी खूप कठोरपणे लोकांचे अपमान केले होते, त्यांना धुत्कारले होते.

दादाश्री : त्या सर्वांसाठी प्रतिक्रमण करावे. त्यात तुमचा उद्देश खराब नव्हता. तुमच्या स्वत:साठी नव्हता, याला तर सरकारशी सिन्सियारिटी (प्रामाणिकता) म्हणतात.

8. अशी तुटते शृंखला ऋणानुबंधांची

प्रश्नकर्ता : पूर्व जन्माच्या ऋणानुबंधातून सुटण्यासाठी काय करावे?

दादाश्री : ज्याच्याबरोबर आपले पूर्वीचे ऋणानुबंध असतील आणि ती व्यक्ती जर आपल्याला आवडतच नसेल, त्याच्याबरोबर राहणे आवडतच नसेल, पण तरी नाइलाजाने सोबत राहावे लागत असेल, तर अशा प्रसंगी काय करावे? त्याच्याबरोबर बाहेरचा व्यवहार तर ठेवायला हवा पण आतमध्ये सतत त्याच्या नावाने प्रतिक्रमण करावे, कारण आपण मागील जन्मात अतिक्रमण केले होते, त्याचा हा परिणाम आहे. कोणते कॉजेस केले होते? तर मागच्या जन्मी त्याच्याबरोबर अतिक्रमण केले होते. त्या अतिक्रमणाचे ह्या जन्मात फळ आले आहे. म्हणून आता त्यासाठी प्रतिक्रमण केले तर प्लस-मायनस (वजा-बेरीज) होऊन जाईल. म्हणजे आतून तुम्ही त्याची माफी मागा. सतत माफी मागतच राहा की, 'मी जे जे दोष केले त्याबद्दल माफी मागतो' कोणत्याही भगवंताच्या साक्षीने माफी मागून घ्या, तर ते सर्व संपून जाईल.

त्याचा सहवास आवडत नसेल तर काय होईल? त्याच्याकडे खूप दोषी दृष्टीने पाहिल्यामुळे, म्हणजे एखाद्या पुरुषाला स्त्री आवडत नसेल तर तो सतत तिला दोषीच पाहतो, आणि त्यामुळे तिरस्कार निर्माण होतो आणि मग त्याला त्या स्त्रीची भीती वाटत राहते. आपल्याला ज्याच्याबद्दल तिरस्कार असेल ना, त्याची आपल्याला भीती वाटते. त्याला पाहिल्याबरोबरच घाबरायला होते. असे झाले तर समजावे की हा तिरस्कार आहे. म्हणून त्या तिरस्कारातून सुटण्यासाठी सतत माफी मागतच राहा, असे केल्याने दोनच दिवसात तिरस्कार बंद होऊन जाईल. त्या व्यक्तीला समजणार नाही, पण तुम्ही आत त्या व्यक्तीची सतत माफी मागत राहा, ज्यांच्याप्रती जे जे दोष झाले असतील, त्यांच्या नावाने, 'हे भगवंता! मी क्षमा मागत आहे', असे म्हणत राहा. हा दोषांचा परिणाम आहे. तुम्ही कोणत्याही व्यक्तीप्रती जे जे दोष केले असतील, त्यासाठी त्याच्या आत बसलेल्या भगवंताकडे सतत माफी मागत राहा, तर ते सर्व दोष धुतले जातील.

हे सर्व (रिलेटिव्ह) संबंध तर नाटक आहे. नाटकातील बायको-मुलांना कायमसाठी आपले करून घेतले तर चालेल का? हो, नाटकात

बोलतात तसे बोलण्यात हरकत नाही, 'हा माझा मोठा मुलगा, शतायु' पण सर्व वरकरणी, नाटकी. या सर्वांना खरे मानले यासाठीच प्रतिक्रमण करावे लागते. जर खरे मानले नसते तर प्रतिक्रमण करावे लागले नसते. जिथे खरे मानले गेले, तिथे राग-द्वेष सुरू होतात. आणि प्रतिक्रमणानेच मोक्ष आहे. हे 'दादा' दाखवतात त्या 'आलोचना-प्रतिक्रमण-प्रत्याख्यान' यानेच मोक्ष आहे.

कुणाच्या हातात त्रास देण्याचीही सत्ता नाही, आणि कुणाच्या हातात सहन करण्याचीही सत्ता नाही. हे सर्व तर पुतळेच आहेत, तेच सारे काम करत आहेत. आपण प्रतिक्रमण करतो त्यामुळे हे पुतळे आपोआपच सरळ होऊन जातात.

कितीही वेडा माणूस असेल तरी तो आपल्या (दादाश्रींनी सांगितलेल्या) प्रतिक्रमणाने शहाणा होऊ शकतो.

समजा एका माणसाबरोबर तुमचे अजिबात पटत नसेल, तर त्या माणसासाठी तुम्ही दिवसभर प्रतिक्रमण केले, दोन-चार दिवस सतत प्रतिक्रमण केलेत तर पाचव्या दिवशी तो तुम्हाला शोधत शोधत इथे येईल. तुमच्या अतिक्रमणाच्या दोषामुळेच हे सर्व अडलेले आहे.

प्रश्नकर्ता : कित्येक वेळा मला खूप वाईट वाटते, की मी इतके सर्व करतो, तरी पण हा माझा अपमान करतो.

दादाश्री : आपण त्याचे प्रतिक्रमण करावे. हा तर व्यवहार आहे, यात सर्व प्रकारचे लोक असतात. ते आपल्याला मोक्षाला जाऊ देत नाहीत.

प्रश्नकर्ता : त्याचे प्रतिक्रमण आम्ही का करावे?

दादाश्री : प्रतिक्रमण यासाठी करायचे की 'हा माझ्याच कर्माचा उदय होता, आणि त्यामुळे त्याला असे कर्म बांधावे लागले, त्याचे मी प्रतिक्रमण करतो, आणि पुन्हा मी असे करणार नाही की जेणेकरून माझ्या निमित्ताने कोणाला कर्म बांधावे लागेल.'

हे जग कोणाला सहजासहजी मोक्षाला जाऊ देईल असे नाही. सर्व बाजूने आकडे (हुक) परत संसारात खेचूनच आणतात. परंतु जर आपण प्रतिक्रमण केले तर ते आकडे सुटतील. म्हणून महावीर भगवंतांनी 'आलोचना-प्रतिक्रमण आणि प्रत्याख्यान' या तिन्ही गोष्टी, (प्रतिक्रमण) या एकाच शब्दात दिल्या आहेत, दुसरा कोणता मार्गच नाही. पण स्वतः प्रतिक्रमण केव्हा करू शकेल? जेव्हा स्वतःला जागृती असेल तेव्हाच. ज्ञानी पुरुषांकडून ज्ञान प्राप्त झाल्यावर जागृती उत्पन्न होते.

आपण प्रतिक्रमण करून घ्यावे, म्हणजे आपण जबाबदारीतून सुटतो.

प्रश्नकर्ता : एखाद्या माणसावरचा आमचा विश्वास उठला असेल, त्याने आमचा विश्वासघात केला म्हणून त्याच्यावर आमचा विश्वास राहिला नसेल. तर तो विश्वास परत मिळविण्यासाठी काय करावे?

दादाश्री : तुम्ही त्याच्यासाठी जे काही वाईट विचार केले असतील, त्याबद्दल पश्चात्ताप करायला हवा. विश्वास उठल्यावर तुम्ही जे जे वाईट विचार केले त्यासाठी पश्चात्ताप करावा लागतो, त्यानंतर सर्व नीट होईल. अर्थात प्रतिक्रमण करावे लागते.

९. निर्लेपता, अभावापासून फाशीपर्यंत

प्रश्नकर्ता : समोरच्या व्यक्तीला दुःख झाले आहे हे कसे कळेल?

दादाश्री : ते तर त्याचा चेहरा पाहूनच कळते. त्याच्या चेहऱ्यावरचे हास्य गायब होते. चेहरा उतरतो. त्यामुळे लगेच कळते ना, की समोरच्यावर परिणाम झाला आहे. असे लक्षात येत नाही का?

प्रश्नकर्ता : हो, लक्षात येते.

दादाश्री : समोरच्यावर काय परिणाम झाला आहे ते समजण्याऐवढी शक्ती तर माणसात असतेच.

प्रश्नकर्ता : परंतु कित्येक असे हुशार असतात, की ते चेहऱ्यावर काहीच एक्स्प्रेशन (हावभाव) येऊ देत नाहीत.

दादाश्री : तरीही तुम्हाला जाणीव असतेच की माझे शब्द कठोर निघालेत, म्हणून त्याला ते जिव्हारी लागलेच असतील. असे समजून तुम्ही प्रतिक्रमण करून घ्यावे. असे कठोर शब्द निघाले म्हणून त्याला जिव्हारी लागलेच असतील, हे तुम्हाला कळेलच ना?

प्रश्नकर्ता : हो, कळेल.

दादाश्री : आणि तेसुद्धा (प्रतिक्रमण) त्याच्यासाठी करायचे नाही. परंतु आता त्यात तुमचा अभिप्राय नाही, त्या अभिप्रायापासून वेगळे होण्यासाठी आहे. प्रतिक्रमण म्हणजे काय? तर पूर्वीच्या अभिप्रायाशी तुम्ही आता सहमत नाही. आणि प्रतिक्रमण केल्याने तुमच्या बोलण्यामुळे समोरच्यावर होणारा परिणाम होत नाही, अजिबात होत नाही. मनात ठाम ठरवा की मला 'समभावाने निकाल करायचाच आहे.' त्यामुळे समोरच्यावर त्याचा परिणाम होतो आणि त्याचे मन सुधारते. याउलट तुम्ही जर मनात असे ठरवले की 'मी त्याचे असे करीन, तसे करीन', तर त्याच्या मनातही तशीच प्रतिक्रिया होते.

प्रश्नकर्ता : एखाद्या माणसाला आपण झिडकारतो, आणि झिडकारल्यानंतर पश्चात्ताप होतो, तर याला काय म्हणावे?

दादाश्री : पश्चात्ताप झाला म्हणजे झिडकारण्याची सवय काही दिवसांने सुटते. झिडकारल्यावर पश्चात्ताप केला नाही, आणि असे मानले की, 'मी किती चांगले केले', तर ती नरकात जाण्याची निशाणी आहे. चूक केल्यावर पश्चात्ताप व्हायलाच हवा.

प्रश्नकर्ता : समोरच्याचे मन दुखावले असेल, तर त्यातून सुटण्यासाठी काय करावे?

दादाश्री : प्रतिक्रमण करावे, आणि तो जर प्रत्यक्ष भेटला तर त्याला म्हणावे 'भाऊ, मला अक्कलच नाही, मी चुकलो' असे बोलण्याने त्याचे घाव भरून निघतील.

प्रश्नकर्ता : झिडकारण्याचा परिणामच भोगावा लागणार नाही यासाठी कोणता उपाय करावा?

दादाश्री : झिडकारण्यावर दुसरा कोणताच उपाय नाही, फक्त सतत प्रतिक्रमणच करत राहावे. जोपर्यंत समोरच्याच्या मनाचे समाधान होत नाही तोपर्यंत करत राहावे. आणि जर प्रत्यक्ष भेटला तर गोड बोलून क्षमा मागावी, की 'भाऊ, माझ्याकडून तर फार मोठी चूक झाली, मी तर मूर्ख आहे, बेअक्कल आहे.' त्यामुळे समोरच्याचे घाव भरत जातील. आपण स्वत:ची निंदा करतो तेव्हा समोरच्याला बरे वाटते, आणि त्याचे घाव भरून निघतात.

आम्हाला आमच्या मागच्या जन्मीचे झिडकारण्याचे परिणाम दिसतात, म्हणून तर मी सांगतो की, कोणालाही झिडकारू नये. मजुरालाही झिडकारू नये. अरे, शेवटी तो साप होऊन पण बदला घेईल. 'झिडकार' आपल्याला सोडणार नाही. फक्त प्रतिक्रमणच वाचवू शकते.

प्रश्नकर्ता : कुणाला दु:ख दिल्यानंतर आम्ही प्रतिक्रमण करतो, परंतु त्याला जबरदस्त आघात व दु:ख झाले असेल, तर त्यामुळे आम्हाला कर्म बंधन होईल का?

दादाश्री : तुम्ही त्याच्या नावाने सतत प्रतिक्रमण करतच राहा. त्याला जेवढ्या प्रमाणात दु:ख झाले असेल तेवढ्या प्रमाणात प्रतिक्रमणे करावी लागतात.

एक जज (न्यायाधीश) मला म्हणाले 'साहेब, तुम्ही मला ज्ञान तर दिले, पण आता मी कोर्टात फाशीची शिक्षा द्यायची की नाही?' तेव्हा मी त्यांना सांगितले 'फाशीची शिक्षा देणार नाही तर मग काय करणार?' त्यावर ते म्हणाले, 'पण फाशीची शिक्षा दिली तर मला दोष लागेल.' मग मी त्यांना विचारले, 'मी तुम्हाला चंदुलाल' बनविले आहे, की 'शुद्धात्मा' बनविले आहे?' तर ते म्हणाले, 'शुद्धात्मा' बनविले आहे. मग चंदुलाल जे करतो, त्यासाठी तुम्ही जबाबदार नाही. आणि जर जबाबदार आहे असे तुम्हाला वाटत असेल तर मात्र तुम्ही 'चंदुलाल'

आहात. तुम्ही राजीखुशीने भागीदार होत असाल तर त्याला आमची हरकत नाही. पण भागीदार होऊ नका. मग मी त्यांना पद्धत सांगितली की तुम्ही असे म्हणा की 'हे भगवंता, माझ्या वाट्याला हे असे काम का आले?' आणि त्यासाठी प्रतिक्रमण करा, आणि मग सरकारच्या कायद्याप्रमाणे काम करत राहा.

प्रश्नकर्ता : प्रतिक्रमण केल्याने सुटता येते, असे जर आम्ही लक्षात ठेवले तर त्यामुळे सर्व लोकांना स्वच्छंदीपणे वागण्याचे लायसेन्स मिळून जाईल ना?

दादाश्री : नाही, हकीगत तर अशीच आहे, पण तसे समजायचे नाही. तुम्हाला प्रतिक्रमण करायचे. प्रतिक्रमण केले की तुम्ही सुटलात. तुमच्या जबाबदारीतून तुम्ही मुक्त झालात. नंतर ती व्यक्ती चिंता करून, डोके फोडून मेली, तरी त्या गोष्टीचा आणि तुमचा काही संबंध नाही.

आमच्याकडून देखील काही लोकांना दु:ख होत असते, जरी आमची तशी इच्छा नसली तरीही. सामान्यपणे हल्ली असे घडतच नाही, पण क्वचित एखाद्या माणसाबरोबर असे होऊन जाते. गेल्या पंधरा-वीस वर्षात दोन-तीन माणसांशी असे झाले असेल. तेसुद्धा निमित्त असेल म्हणूनच ना? नंतर आम्ही त्यांच्यासाठी प्रतिक्रमण करून त्याच्याबाजूने कुंपणही घालतो जेणेकरून तो पडणार नाही. आम्ही त्याला ज्या उंचीवर नेले आहे तिथून तो पडू नये, त्याचे रक्षण करण्यासाठी आम्ही कुंपण घालतो.

आम्ही सैद्धांतिक असतो की, 'भाऊ, आम्ही हे झाड लावले, आहे, लावल्यानंतर जर ते झाड रोड बनविण्यात मध्ये येत असेल तर तो रोडच वळवायचा पण त्या झाडाला मात्र काही इजा होऊ द्यायची नाही. असा आमचा सिद्धांत आहे. आम्ही कोणाला पडू देत नाही.

प्रश्नकर्ता : एखादा मनुष्य चूक करतो, नंतर आमच्याजवळ माफी मागतो, आम्ही त्याला माफ करतो. त्याने जरी माफी मागितली

नाही तरी पण आम्ही त्याला मनापासून माफ करतो, पण तो मनुष्य परत परत चूक करत असेल तर आम्ही काय करावे?

दादाश्री : त्याला प्रेमाने समजावावे, जेवढे समजावता येईल तेवढे समजावावे, दुसरा काही उपायच नाही, आणि आपल्या हातात काहीच सत्ता नाही. या जगात तुम्हाला माफी देण्याव्यतिरिक्त दुसरा कोणता उपायच नाही. जर माफ केले नाही, तर त्याने मार खाल्यानंतर तुम्ही त्याला माफ कराल. दुसरा उपायच नाही. तुम्ही त्याला समजावावे. तो परत परत चूक करणार नाही, असे त्याने आपले भाव बदलले तरी खूप झाले. त्याने जर आपले भाव बदलले, की 'आता परत अशी चूक करायची नाही', तरीही चूक होतेच पण ती वेगळी गोष्ट आहे.

मुलाला भाजी आणण्यासाठी पाठविले आणि त्याने त्यातले थोडे पैसे काढून घेतले, नंतर ही गोष्ट समजल्यावर काय फायदा? तो जसा आहे तसाच चालवून घ्यावा लागतो, त्याला हाकलून देता येते का? दुसरा मुलगा घ्यायला थोडेच जाणार? दुसरा मिळणार पण नाही ना?

10. संघर्षाच्या विरोधात

प्रश्नकर्ता : काही कर्मांच्या उदयावेळी खूप वादविवाद झाला असेल, तर तेव्हा मोठे कर्मबंधन होत असते. मग त्यासाठी दोन-चार वेळा प्रतिक्रमण करावे लागेल की मग एकदाच केले तरी चालेल?

दादाश्री : जेवढे शक्य असेल तेवढे करावे आणि नंतर सामूहिक प्रतिक्रमण करावे. प्रतिक्रमणे खूप करायची राहिली असतील तर मग सामूहिक प्रतिक्रमण करावे. की, 'हे दादा भगवान, या सर्वांसाठी मी सामूहिक प्रतिक्रमण करीत आहे.' असे म्हटले की मग संपले.

ज्याला संघर्ष होत नाहीत, त्याचा तीन जन्मांनंतर मोक्ष होईल, याची मी गॅरंटी देतो. संघर्ष झालाच तर प्रतिक्रमण करावे. संघर्ष पुद्गलाचा आहे आणि पुद्गलाच्या पुद्गलाशी झालेला संघर्ष प्रतिक्रमण केल्यामुळे नाश होतो.

समोरचा भागाकार करत असेल तर आपण गुणाकार करावा, म्हणजे रक्कम उडून जाईल. समोरच्या व्यक्तीसाठी 'त्याने मला असे म्हटले, तसे म्हटले.' असा विचार करणे हा गुन्हा आहे. रस्त्यावरून चालत असताना जर झाडावर आपटलो तर आपण झाडाला का ओरडत नाही? झाडाला जड कसे म्हणू शकतो? जी आपटतात ती सर्व झाडेच आहेत!

प्रश्नकर्ता : ही जी स्थूल संघर्षाची उदाहरणे दिलीत, पण आता सूक्ष्म, सूक्ष्मतर, सूक्ष्मतम संघर्षाची उदाहरणे पण द्या. सूक्ष्म संघर्ष कसा असतो?

दादाश्री : वडिलांबरोबर तुझे जे होते, ते सर्व सूक्ष्म संघर्ष.

प्रश्नकर्ता : म्हणजे नेमके काय?

दादाश्री : तुम्ही मारामारी करता का?

प्रश्नकर्ता : नाही.

दादाश्री : म्हणून तो सूक्ष्म संघर्ष.

प्रश्नकर्ता : सूक्ष्म म्हणजे मानसिक? वाणीने होतात ते पण सूक्ष्मात धरले जातात का?

दादाश्री : वाणीने होतात ते सर्व स्थूल आहेत. पण जे समोरच्याला कळत नाही, दिसत नाही, असे सर्व सूक्ष्मात येते.

प्रश्नकर्ता : मग सूक्ष्म संघर्ष टाळायचा कसा?

दादाश्री : आधी स्थूल, नंतर सूक्ष्म, नंतर सूक्ष्मतर आणि नंतर सूक्ष्मतम संघर्ष टाळायचे.

प्रश्नकर्ता : सूक्ष्मतर संघर्ष कशाला म्हणतात?

दादाश्री : तू एखाद्याला मारत असशील आणि त्यावेळी तो ज्ञान दृष्टीने पाहतो की 'मी शुद्धात्मा आहे, ही 'व्यवस्थित शक्ती' मारत

आहे' अशा प्रकारे पाहतो, पण मनात थोडासा तुझा दोष पण पाहतो, तर हा झाला सूक्ष्मतर संघर्ष.

प्रश्नकर्ता : परत एकदा सांगा ना? नीट कळले नाही.

दादाश्री : हे जे तू सगळ्यांचे दोष पाहतोस ना, तो सूक्ष्मतर संघर्ष आहे.

प्रश्नकर्ता : म्हणजे दुसऱ्यांचे दोष पाहणे, हा सूक्ष्मतर संघर्ष आहे?

दादाश्री : तसे नाही, स्वतः ठरवले असेल, की दुसऱ्यांच्यात दोष नाहीत, तरी पण दोष दिसतात, तो सूक्ष्मतर संघर्ष आहे. तुझे दोष तुला दिसले पाहिजेत. कारण तो शुद्धात्मा आहे आणि दोष वेगळे आहेत.

प्रश्नकर्ता : तर त्यालाच मानसिक संघर्ष म्हणतात?

दादाश्री : ते (मानसिक) सर्व तर सूक्ष्ममध्ये गेले.

प्रश्नकर्ता : मग या दोन्हीमध्ये नेमका फरक काय आहे?

दादाश्री : ही तर मनाच्याही पलीकडची गोष्ट आहे.

प्रश्नकर्ता : मानसिक संघर्ष आणि जे दोष...

दादाश्री : ते मानसिक नाहीत.

प्रश्नकर्ता : म्हणजे हा सूक्ष्मतर संघर्ष आहे, त्याक्षणी सूक्ष्म संघर्ष पण सोबत असतोच ना?

दादाश्री : ते आपण पाहायचे नाहीत. सूक्ष्म वेगळे आहे आणि सूक्ष्मतर वेगळे आहे. सूक्ष्मतम म्हणजे तर अगदी अंतिम गोष्ट.

प्रश्नकर्ता : एकदा सत्संगामध्ये तुम्ही असे म्हणाला होता की 'चंदुलाल'शी तन्मयाकार होणे, याला सूक्ष्मतम संघर्ष म्हणतात?

दादाश्री : हो, सूक्ष्मतम संघर्ष! तो टाळावा. चुकून तन्मयाकार झालात पण मग लक्षात येते ना की ही चूक झाली?

प्रश्नकर्ता : आता केवळ शुद्धात्मा तत्त्वाशिवाय या जगातील कोणतीही विनाशी वस्तू मला नको आहे, तरी देखील हा 'चंदुभाई' अधूनमधून तन्मयाकार होतो, म्हणजे हा सूक्ष्मतर संघर्ष झाला ना?

दादाश्री : याला तर सूक्ष्मतम म्हणतात.

प्रश्नकर्ता : तर हा संघर्ष टाळण्याचा उपाय केवळ प्रतिक्रमणच आहे की मग दुसरा कोणता उपाय आहे?

दादाश्री : दुसरे कोणतेच हत्यार नाही.

प्रश्नकर्ता : परंतु दादाजी, आपल्याला प्रतिक्रमण करावे लागते, याला आपला अहम्‌च म्हटला जाईल ना?

दादाश्री : नाही. कारण आपल्याला प्रतिक्रमण करायचे नाही, तो गुन्हा 'चंदुभाई'चा आहे, शुद्धात्मा तर केवळ 'जाणतो', शुद्धात्म्याने कोणताच गुन्हा केलेला नाही. म्हणून 'त्याला' प्रतिक्रमण करावे लागत नाही. फक्त ज्याने गुन्हा केला आहे 'त्याला'च, चंदुभाईच्या नावाने गुन्हा केला म्हणून 'चंदुभाई'च प्रतिक्रमण करील. अतिक्रमणामुळेच हा संसार उभा झाला आहे. अतिक्रमण कोण करतो? अहंकार आणि बुद्धी दोन्ही मिळून करतात.

11. पुरुषार्थ, प्राकृत दुर्गुणांच्या समोर

रागाशिवाय तर कुठलाही जन्म गेला नाही. जोपर्यंत ज्ञान मिळत नाही, तोपर्यंत राग व द्वेष हे दोनच होत राहतात, याशिवाय तिसरी वस्तूच नसते.

प्रश्नकर्ता : परंतु दादा, द्वेष हे तर रागाचेच (मोह, आसक्तीचेच) संतान आहे ना?

दादाश्री : हो, रागाचेच संतान आहे, पण तो त्याचा परिणाम आहे, संतान म्हणजे त्याचा परिणाम आहे. जर राग खूप असेल तर ज्याच्याबद्दल राग आहे तो राग जर एक्सेस (प्रमाणाबाहेर) झाला तर

परत त्याच्याबद्दलच द्वेष होऊ लागतो. कोणतीही गोष्ट प्रमाणाबाहेर गेली की मग ती आपल्याला आवडेनाशी होते आणि आवडेनाशी होणे यालाच द्वेष म्हणतात. समजले ना?

प्रश्नकर्ता : हो, समजले.

दादाश्री : आपण हे समजून घ्यायला हवे की ह्या सर्व आपल्याच रिॲक्शन्स आलेल्या आहेत! आपण त्याला मानपूर्वक बोलावतो परंतु जर आपल्याला त्याचे तोंड वाकडे दिसले तर समजावे की ती आपलीच रिॲक्शन आहे. मग अशा वेळी काय करावे? प्रतिक्रमण करावे. याशिवाय दुसरा कोणताच उपाय नाही. पण अशा वेळी लोक काय करतात? तर स्वत:ची तोंडेही वाकडी करतात! म्हणजे तो जसे वागतो तसेच तेही वागतात. आपण आता शुद्धात्मा झालो आहोत, म्हणून त्याला समजावून-उमजावून, स्वत:ची चूक स्वीकारूनही तो विषय संपवून टाकावा. आम्ही तर ज्ञानी पुरुष असूनसुद्धा सर्व चुका स्वीकारून निपटारा करतो.

प्रश्नकर्ता : ईर्षा होत असते, ती होऊ नये यासाठी काय करावे?

दादाश्री : त्याचे दोन उपाय आहेत, ईर्षा झाल्यावर पश्चात्ताप करावा, आणि दुसरा उपाय, तर ही जी ईर्षा होत असते ती तुम्ही करत नाही. ईर्षा, हे तर पूर्व जन्मी भरलेले परमाणू आहेत, त्यांचा स्वीकार केला नाहीत, तन्मयाकार झाला नाहीत, तर ईर्षा संपून जाते. ईर्षा झाल्यावर पश्चात्ताप करणे हेच उत्तम आहे.

प्रश्नकर्ता : मला समोरच्या व्यक्तीची शंका घ्यायची नसते तरी पण शंका आलीच तर ती कशी दूर करावी?

दादाश्री : तेव्हा मग त्याच्या शुद्धात्म्याला स्मरून क्षमा मागावी, आणि त्याचे प्रतिक्रमण करावे. पूर्वी चुका केल्या होत्या, म्हणून शंका येतात.

जंगलात जाताना लौकिक ज्ञानाच्या आधारे दरोडेखोर भेटले तर

काय होईल? किंवा वाटेत वाघ दिसला तर काय होईल? असे विचार आले तर त्याचक्षणी प्रतिक्रमण करावे. शंका आली की बिघडलेच समजा. शंका येऊ द्यायची नाही. कोणत्याही व्यक्तीवर, कुठलीही शंका आली, तर प्रतिक्रमण करावे. शंकाच दु:खदायी आहे.

शंका आल्यावर प्रतिक्रमण करवून घ्यावे. आणि आपण तर ह्या ब्रह्मांडाचे मालक आहोत, आपल्याला शंका का यावी? माणूस म्हटल्यावर शंका तर येईल. पण चूक झाल्यावर रोख प्रतिक्रमण करून घ्यावे.

ज्याच्याबद्दल शंका येत असेल त्याचे प्रतिक्रमण करावे. नाही तर शंका तुम्हाला खाऊन टाकेल.

कोणाबद्दल थोडासुद्धा उलट-सुलट विचार आला तर तो लगेचच धुऊन टाकावा. तो विचार थोडा वेळ जरी टिकला तरी तो समोरच्या व्यक्तीपर्यंत पोहोचतो आणि तो उगवतो चार तासानंतर, बारा तासानंतर, किंवा दोन दिवसानंतरही तो उगवतो, म्हणून स्पंदनाचे वाहणे त्याबाजूला जाता कामा नये.

कोणत्याही कृत्याचा पश्चात्ताप केला तर, त्या कर्माचा बहुतेक हिस्सा नष्ट होऊन जातो. नंतर जळून गेलेल्या सुंभासारखे त्याचे फळ मिळते. पुढच्या जन्मी त्या जळलेल्या दोरीला जरासा स्पर्श करताच ती विस्कटून पडते. (राख होते). कोणतीही क्रिया अशीच व्यर्थ जात नाही. प्रतिक्रमण केल्यामुळे ती दोरी जळून जाते, पण डिजाईन तसेच्या तसेच राहते. मग पुढच्या जन्मी काय करावे लागेल? तर जरासे झटकले की लगेच उडून जाईल.

12. सुटतात व्यसने, ज्ञानींच्या पद्धतीने

प्रश्नकर्ता : मला सिगारेट ओढण्याची वाईट सवय लागली आहे.

दादाश्री : त्यासाठी तू असे मान की, हे चुकीचे आहे, वाईट गोष्ट आहे, आणि जर कोणी विचारले, की सिगारेट का पितोस? तर त्याचे समर्थन करू नकोस, 'वाईट आहे' असे म्हण. किंवा 'भाऊ, हा

माझा कमकुवतपणा आहे', असे म्हण. असे केले तर कधी ना कधी हे व्यसन सुटेल, नाही तर कधीच सुटणार नाही.

आम्हीसुद्धा प्रतिक्रमण करतोच ना. अभिप्रायापासून मुक्त व्हायलाच हवे. प्रतिक्रमण करण्यास हरकत नाही, पण अभिप्राय शिल्लक राहणे, याला मात्र हरकत आहे.

प्रतिक्रमण करणारी व्यक्ती सर्वोच्च वस्तू प्राप्त करते. म्हणजे हे टेक्निकली आहे, सायंटिफिकली पाहिले तर त्याची गरज नाही. पण टेक्निकली मात्र गरजेचे आहे.

प्रश्नकर्ता : सायंटिफिकली म्हणजे कसे?

दादाश्री : सायंटिफिकली तर तो त्याचा 'डिस्चार्ज' आहे, मग त्याला याची गरजच काय? कारण तुम्ही वेगळे आहात आणि ते वेगळे आहेत. पण लोकांमध्ये इतक्या साऱ्या शक्ती नाहीत! प्रतिक्रमण केले नाही, तर तो अभिप्राय तसाच राहतो. आणि प्रतिक्रमण केले म्हणजे तुम्ही त्या अभिप्रायापासून वेगळे झालात, ही गोष्ट तर निश्चितच आहे ना?

जेवढे अभिप्राय राहतील तेवढे हे मन शिल्लक राहील, कारण मन हे अभिप्रायांनी बनत असते.

आम्ही काय म्हटले की, आता व्यसनी झाला आहात त्याला माझी हरकत नाही, पण जे व्यसन झाले असेल त्याबद्दल भगवंताकडे प्रतिक्रमण करावे की, 'हे भगवंता! ही दारू पिऊ नये, तरी पण मी पीत आहे, म्हणून त्यासाठी मी माफी मागतो, पुन्हा कधी पिणार नाही, अशी मला परम शक्ती द्या.' 'एवढे कर रे बाबा!' याउलट लोक तर विरोध करतात की तू दारू का पितोस? अहो, असे करून तर तुम्ही त्याला आणखी जास्त बिघडवत आहात. त्याचे अहित करत आहात. मी काय म्हटले, तू जरी केवढाही मोठा गुन्हा केला असशील तरी पण याप्रमाणे प्रतिक्रमण करत जा.

प्रश्नकर्ता : दादाजी, तुम्ही सकाळी 'चहा' पिताना म्हणालात की, आम्ही प्रत्याख्यान केल्यानंतर चहा प्यायलो.

दादाश्री : ओहोहो! होय.

प्रश्नकर्ता : त्याबद्दल विचारायचे आहे.

दादाश्री : तसे तर मी 'चहा' पीत नाही. तरी पण चहा पिण्याचे संयोग जुळून येतात. आणि जेव्हा अनिवार्यपणे असे घडते तेव्हा काय करावे लागते? जर प्रत्याख्यान केल्याशिवाय प्यायलो तर चहा मला चिकटणार. म्हणून तेल चोपडून मग ते रंगीत पाणी ओतायचे, पण तेल चोपडल्यानंतर. हो, आम्ही प्रथम प्रत्याख्यानरूपी तेल चोपडतो, नंतर हिरव्या रंगाचे पाणी ओततो, पण ते आत चिकटत नाही. म्हणून मी आधी प्रत्याख्यान केले आणि नंतर चहा प्यायलो.

हे एवढे समजण्यासारखे आहे. हे सारे प्रत्याख्यान करून करा. समजले ना? प्रतिक्रमण तर जेव्हा अतिक्रमण होते, तेव्हा करायचे. चहा पिणे याला अतिक्रमण म्हणत नाही. चहा तर अनिवार्यपणे प्यावा लागतो. त्याला अतिक्रमण म्हणत नाहीत. परंतु जर प्रत्याख्यान केले नाही, तेल चोपडले नाही, तर थोडेफार चिकटेल. तेव्हा आता सर्व काही तेल चोपडून (प्रत्याख्यान करून) करा ना!

आम्हाला अशाता कमी असतात. तरी बघा ना, या महिन्यात असे झाले की दादांवर ॲक्सिडेन्टची वेळ आली. मग जेव्हा हे (ॲक्सिडेन्ट) झाले तेव्हा जणू हा दिवा विझूनच जाईल असे झाले होते.

प्रश्नकर्ता : असे काही होणार नाही, दादा.

दादाश्री : नाही, असे नाही, 'हिराबा' (दादांच्या धर्मपत्नी) गेल्या, तर काय यांना (ए. एम. पटेलला) जावे लागणार नाही? हे कोणते वेदनीय कर्म आले?

प्रश्नकर्ता : अशाता वेदनीय.

दादाश्री : लोक समजतात की आम्हाला वेदनीय आहे, परंतु आम्हाला वेदनीय स्पर्श करत नाही. तीर्थंकरांनाही स्पर्श करत नाही. आम्हाला हिराबांच्या जाण्याचा खेद नाही. आमच्यावर त्याचा काहीच

परिणाम होत नाही. पण लोकांना असे वाटते की आम्हाला वेदनीय (कर्म) आले, अशाता वेदनीय आले. परंतु आम्हाला तर या वीस वर्षात एक मिनिट, एक सेकंदसुद्धा अशाता वेदनीयने स्पर्श केला नाही! आणि तेच विज्ञान मी तुम्हाला दिले आहे. तुम्ही जर कच्चे पडलात तर त्यात तुमचे नुकसान आहे, (योग्य) समज असेल तर तुम्ही कधी कच्चे पडणारच नाही ना? एक मिनिटही नाही.

प्रश्नकर्ता : 'दादा भगवान' यांना तर वेदनीय कर्म स्पर्श करत नाही. पण अंबालालभाईंना तर स्पर्श करते ना?

दादाश्री : नाही, कोणालाही स्पर्श करत नाही, असे हे विज्ञान आहे. जर स्पर्शत असेल तर वेडेच होऊन जातील ना? हे तर समज नसल्यामुळे दु:ख आहे. जर समज असेल तर या फाइललाही स्पर्श करणार नाही. कोणालाच स्पर्श करणार नाही. ही जी दु:खे आहेत, ती (योग्य) समज नसल्यामुळेच आहेत. जर या ज्ञानाला समजून घेतले तर दु:ख राहीलच कसे? अशाताही राहणार नाही आणि शाताही राहणार नाही.

13. विमुक्ती, आर्त-रौद्रध्यानापासून

प्रश्नकर्ता : आर्तध्यान आणि रौद्रध्यान क्षणोक्षणी होतच राहतात. तर आर्तध्यान कशाला म्हणावे, आणि रौद्रध्यान कशाला म्हणावे? याचे जरा स्पष्टीकरण करा ना!

दादाश्री : आर्तध्यान म्हणजे स्वत:चे स्वत:लाच होते, कोणालाही मध्ये न आणता, कोणालाही दु:ख होणार नाही अशा प्रकारे सांभाळून स्वत:च दु:ख सहन करत असेल, तर ते आर्तध्यान. आणि जर दुसऱ्या कोणाला दु:ख देत असेल तर ते रौद्रध्यान.

आर्तध्यान म्हणजे तर स्वत:ला ज्ञान नसते आणि 'मी चंदुभाई आहे' असेच त्याला वाटत असते, आणि मग माझे असे झाले, किंवा तसे झाले तर काय होईल? असे वाटते ते आर्तध्यान. मुलींचे लग्न काय तू लावणार होतास? ती जेव्हा चोवीस वर्षांची होईल तेव्हा तिचे

लग्न लावायचे, किंवा तीस वर्षांची होईल तेव्हा. पण हा तर पाच वर्षांची असेल तेव्हापासूनच तिच्या लग्नाची काळजी करत बसतो. याला आर्तध्यान केले असे म्हणतात.

स्वत:बद्दल उलट विचार करणे, उलट वागणे स्वत:ची गाडी चालेल की चालणार नाही? मी आजारी पडलो आणि मेलो तर काय होईल? असा विचार करणे याला आर्तध्यान म्हणातात.

तुम्ही जेव्हा दुसऱ्या कोणाबद्दल अशी कल्पना करता की, ह्याने माझे नुकसान केले, त्याला रौद्रध्यान म्हणतात.

दुसऱ्यांसाठी वाईट विचार आले, दुसऱ्यांना नुकसान करणारे विचार आले, तर ते झाले रौद्रध्यान. मनात विचार आला की ग्राहकांना देताना कापड ताणून मोजावे. आता कापड ताणून मोजण्याचा जो विचार आला तेव्हापासूनच ग्राहकांच्या हातात कमी कापड जाणार आहे. म्हणजेच ग्राहकांकडून जास्त पैसे मिळतील अशी कल्पना केली, याला रौद्रध्यान म्हणतात. दुसऱ्यांचे नुकसान करणारे ध्यान, याला रौद्रध्यान म्हणतात.

जबरदस्त रौद्रध्यान केले असेल, परंतु प्रतिक्रमण केल्याने त्याचे आर्तध्यानामध्ये परिवर्तन होते. दोघा जणांनी एकाच प्रकारचे रौद्रध्यान केले. दोघांनी म्हटले की अमक्याला मी मारून टाकीन. दोघांनी मारून टाकण्याचे भाव केले, त्याला रौद्रध्यान म्हणतात. परंतु त्यातील एकाला घरी गेल्यावर पश्चात्ताप झाला की 'अरेरे! मी असे भाव का केले?', त्यामुळे त्याचे रौद्रध्यान आर्तध्यानात बदलले, आणि त्या दुसऱ्याचे मात्र रौद्रध्यानच राहिले.

म्हणजेच पश्चात्ताप केल्यामुळे रौद्रध्यानाचे रूपांतर आर्तध्यानात होते. पश्चात्ताप केल्याने नरकगती बदलून तिर्यंचगती (पशुयोनी) प्राप्त होते. आणि अधिक पश्चात्ताप केला तर त्याचे रूपांतर धर्मध्यानात होते. एकदा पश्चात्ताप केल्यामुळे आर्तध्यान होते आणि पुन्हा पुन्हा पश्चात्ताप करत राहिल्याने धर्मध्यान होऊन जाते. म्हणजे क्रिया तीच असते पण (ध्यानात) फेरफार होत राहतो.

प्रश्नकर्ता : 'आम्ही' स्वत: वेगळे राहून प्रतिक्रमण करवून घेतले तर त्याला काय म्हणतात?

दादाश्री : असे आहे की, तुम्ही तर शुद्धात्मा झाला आहात, पण या पुद्‌गलाची सुटका झाली पाहिजे ना? म्हणून जोपर्यंत त्याच्याकडून प्रतिक्रमण करवून घेत नाही, तोपर्यंत सुटका होत नाही. अर्थात, जोपर्यंत पुद्‌गलाला धर्मध्यानात ठेवत नाही, तोपर्यंत सुटका होत नाही, कारण पुद्‌गलाला शुक्लध्यान होऊ शकत नाही. म्हणून पुद्‌गलाला धर्मध्यानात ठेवा. म्हणजे सतत प्रतिक्रमण करवून घ्यावे. जितक्या वेळा आर्तध्यान झाले, तितक्या वेळा प्रतिक्रमण करवून घ्यावे.

आर्तध्यान होण्याचे कारण पूर्वीची अज्ञानता आहे. म्हणून आर्तध्यान झाले की 'तुम्ही' त्याच्याकडून प्रतिक्रमण करवून घ्यावे.

प्रश्नकर्ता : दुसऱ्यांचे दोष पाहणे याला आर्तध्यान, रौद्रध्यान म्हणतात का?

दादाश्री : हो, आत तो दुसऱ्यांचे दोष पाहण्याचा माल भरून आला आहे, म्हणून असे पाहतो. तरीसुद्धा त्याचा दोष स्वत:वर येत नाही. त्याने मग प्रतिक्रमण करायला हवे की असे का होत आहे? असे होता कामा नये. बस, एवढेच. माल तर जसा भरला गेला असेल तसाच निघेल. त्याला आम्ही साध्या भाषेत 'भरलेला माल' म्हणतो.

रात्री साडे अकरा वाजता सात-आठ पाहुणे तुमच्याकडे आले, आणि 'चंदुभाई आहेत का'? अशी हाक मारली, तर तुम्ही काय म्हणाल? ते पाहुणे तुमच्या गावाहून आले असतील आणि त्यातले एक, दोन जण तुमच्या ओळखीचे असतील आणि इतर सर्व त्यांच्या ओळखीचे असतील. रात्री साडे अकरा वाजता त्यांनी हाक मारल्यावर तुम्ही त्यांना काय म्हणणार? दरवाजा उघडाल की नाही?

प्रश्नकर्ता : हो, उघडू ना.

दादाश्री : आणि नंतर त्या लोकांना काय म्हणाल? परत जा असे म्हणाल?

प्रश्नकर्ता : नाही, नाही. 'परत जा' असे कसे म्हणता येईल?

दादाश्री : तर काय म्हणाल?

प्रश्नकर्ता : आम्ही त्यांना आत घेऊ, 'या, आत या' असे म्हणू.

दादाश्री : 'या, या, स्वागत आहे!' तुमच्यावर तसे संस्कार आहेत ना, म्हणून 'या, या' असे म्हणणार. सर्वांना सोफ्यावर बसवणार. सोफ्यावर जर लहान बाळ झोपले असेल तर पटकन उठवून त्याला बाजूला करणार आणि पाहुण्यांना सोफ्यावर बसवणार. परंतु मनात मात्र वाटणार, 'अरे! असे अवेळी कुठून आले?'

म्हणजे हे आर्तध्यान नाही, तर रौद्रध्यान आहे, कारण समोरच्या माणसासाठी आपण भाव बिघडविले. आणि आर्तध्यान म्हणजे तर स्वतःचा त्रास स्वतःच भोगणे. इथे तर तुम्ही दुसऱ्यांची उपाधी स्वतःवर घेऊन दुसऱ्यांवर आरोप लावला की, 'अरे! असे अवेळी कुठून आले?'

तरी पण तुम्ही तेव्हा काय म्हणाल? तुम्ही तुमचे संस्कार तर सोडणार नाही ना! हळूच म्हणणार 'थोडा...थोडा...थोडा' अहो, पण काय? तेव्हा म्हणाल थोडा चहा... तेव्हा पाहूणेही असे असतात की ते सरळ म्हणतात, 'चंदुभाई, आता चहाचे राहू द्या ना, आता खिचडी-कढी करून टाका ना, तरी बस झाले.' असे म्हणताच मग बघा तुमच्या बायकोची स्थिती! स्वयंपाक घरात काय होईल?

भगवंताची आज्ञा काय आहे? तर ज्याला मोक्षाला जायचे आहे, त्याने काय करायला हवे? 'अरे, असे अवेळी कुठून आले?' असा भाव तर माणसाला होतोच. सध्या या दूषमकाळाचा दबाव असा आहे वातावरणच असे आहे, की त्याला असा भाव येणारच. मोठा माणूस असेल तरी त्यालाही येणार.

बाहेर तर तू चांगला वागत आहेस आणि आत मात्र उलट चित्रण करत आहेस. अर्थात तुम्ही त्यांना जे चांगल्या प्रकारे स्वागत करून आत बोलावता, त्यांच्याशी गप्पागोष्टी करता ते तर तुम्ही मागच्या जन्माचे

फळ भोगत आहात. आणि आत भाव बिघडवून पुढील जन्मासाठी नवीन कर्म बांधत आहात. 'अरे, असे अवेळी कुठून आले?' असे विचार केल्याने उलट कर्म बांधत आहात.

म्हणून तेव्हा तुम्ही भगवंताजवळ क्षमा मागून म्हणावे, 'हे भगवंता, माझी चूक झाली, वातावरणाच्या दबावामुळे माझ्याकडून असे चुकीचे बोलले गेले पण तशी माझी इच्छा नाही. ते खुशाल येथे राहोत.' अशा प्रकारे तुम्ही जर आतून साफ करून टाकले तर तो तुमचा पुरुषार्थ म्हटला जाईल.

असे तर होतच राहणार. मोठमोठ्या संयमधारींनाही होत असते. हा काळच असा विचित्र आहे. परंतु जर तुम्ही साफ करून टाकले तर मग तुम्हाला तसे फळ मिळेल.

प्रश्नकर्ता : साधारणत: एका तासात पाच-पंचवीस वेळा अतिक्रमण होत असेल तर?

दादाश्री : त्या सर्वांसाठी एकत्रपणे (सामूहिक) प्रतिक्रमण करावे. एकत्र करू शकता, 'त्या सर्वांसाठी एकत्रपणे प्रतिक्रमण करत आहे', असे म्हणावे.

प्रश्नकर्ता : ते कसे करावे? काय म्हणावे?

दादाश्री : एवढी सारी अतिक्रमणे झाली आहेत, म्हणून या सर्वांचे मी एकत्रपणे प्रतिक्रमण करत आहे. विषय बोलावे की या विषयी असे असे (अतिक्रमण झाले आहे), 'या सर्वांचे मी एकत्रपणे प्रतिक्रमण करत आहे', असे म्हटले की काम झाले. आणि तरीसुद्धा काही शिल्लक राहिले तर तेही धुऊन टाकता येईल. ते मग नंतर धुतले जाईल. त्या मागे जास्त वेळ घालवू नका. जर बसून राहिलात तर सर्वच बाकी राहून जाईल. गोंधळात पडण्याची गरज नाही.

14. बाहेर काढते कषायांच्या कोठडीतून

प्रश्नकर्ता : कोणावर खूप रागावलो आणि मग बोलून गप्प

झालो, पण नंतर हे जे बोलले गेले त्यामुळे खूप अस्वस्थता वाटत राहते. तर काय त्यासाठी एकाहून जास्त प्रतिक्रमणे करावी लागतील?

दादाश्री : त्यासाठी दोन-तीन वेळा अगदी मनापासून प्रतिक्रमणे कराल, एकदम योग्य पद्धतीने, म्हणजे झाले. 'हे दादा भगवान, भयंकर भानगड झाली, जबरदस्त क्रोध झाला, समोरच्याला खूप दु:ख झाले, मी जबरदस्त माफी मागतो.'

प्रश्नकर्ता : कोणाबरोबर जास्त वादविवाद झाले असतील, तर त्यामुळे मग मनात अढी वाढत जाते. कधी कधी एक-दोन प्रतिक्रमणे होतात, तर काहींसाठी चार-पाच वेळा किंवा त्याहून जास्त वेळा करावी लागतात, तर काय सगळ्यांसाठी एकदाच प्रतिक्रमण केल्याने सारे काही साफ होऊन जाईल?

दादाश्री : जेवढी जमेल तेवढी करा, आणि मग सामूहिकपणे करून टाका. जास्त प्रतिक्रमणे करायची राहिली तर मग सामूहिक प्रतिक्रमण करावे की, 'या सर्व कर्मांची वेगवेगळी प्रतिक्रमणे माझ्याकडून होत नाहीत, म्हणून मी त्या सर्वांसाठी एकत्रपणे प्रतिक्रमण करत आहे.' अन्य कोणाला नाही, तर तुम्ही दादा भगवानांना असे सांगावे, की 'हे दादा भगवान, या सर्वांचे मी एकत्र प्रतिक्रमण करत आहे.' म्हणजे ते पोहोचेल.

प्रश्नकर्ता : आम्ही समोरच्या व्यक्तीवर क्रोध करतो, आणि नंतर लगेच प्रतिक्रमण पण करून घेतो, तरी पण आमच्या क्रोधाचा समोरच्या व्यक्तीवर झालेला परिणाम त्वरित नष्ट होत नाही ना?

दादाश्री : परिणाम नष्ट झाला की झाला नाही हे तुम्ही पाहायचे नाही. तुम्ही तुमचे कपडे धुऊन स्वच्छ करायचे. तुम्हाला आवडत नसेल तरीही होऊन जातो ना?

प्रश्नकर्ता : क्रोध तर होतोच.

दादाश्री : म्हणून तुम्ही ते पाहायचे नाही, तुम्ही प्रतिक्रमण

करावे. तुम्ही सांगावे की, 'चंदुभाई, प्रतिक्रमण करा', मग तो कपडा खराब झाला की लगेच धुऊन टाकेल! दुविधेत पडायचे नाही. नाही तर परत तुमचे बिघडेल.

प्रश्नकर्ता : निंदा केली त्यावेळी जरी त्याला जागृती राहिली नसेल, परंतु जर निंदा झाली किंवा रागावलो तर त्याला निंदा करणे असे म्हणतात का?

दादाश्री : त्यालाच तर कषाय म्हणतात. कषाय म्हणजे दुसऱ्यांच्या ताब्यात येणे. त्या वेळी तो बोलतो, पण बोलते वेळीच त्याला जाणीव होते की, 'हे चुकीचे होत आहे.' काही वेळा जाणीव होते आणि काही वेळा अजिबात जाणीव होत नाही, असेच शब्द निघून जातात. नंतर थोड्यावेळाने जाणीव होते. याचा अर्थ जेव्हा झाले तेव्हा पण तो 'जाणत' होता.

प्रश्नकर्ता : आमच्या ऑफिसमध्ये तीन-चार सेक्रेटरी आहेत, त्यांना सांगितले की असे काम करायचे आहे. एकवेळा, दोन वेळा, चार-पाच वेळा सांगूनही त्या तीच चूक परत परत करत राहतात, तेव्हा मग मी त्यांच्यावर रागावतो, तर अशा वेळी मी काय करावे?

दादाश्री : तुम्ही तर शुद्धात्मा झाला आहात. आता तुम्हाला कुठे राग येतो? राग तर 'चंदुभाई'ला येतो. म्हणून तुम्ही 'चंदुभाई'ला सांगावे 'आता दादा मिळाले आहेत, आता तरी राग कमी करा ना?'

प्रश्नकर्ता : पण त्या सेक्रेटरींमध्ये अजिबात सुधारणा होत नाही. तर त्यासाठी काय करावे? सेक्रेटरींना काही सांगावे तर लागेलच ना? नाही तर त्या तशाच चुका परत परत करत राहतील! शिवाय त्या कामही बरोबर करत नाहीत.

दादाश्री : मग तुम्ही 'चंदुभाई'ला सांगावे की, 'त्यांना जरा रागवा.' पण समभावाने निकाल करून रागवा. नाटकीय पद्धतीने रागवावे की, 'असे करत राहिलात तर तुमची सर्विस कशी राहणार?', असे सर्व सांगावे.

प्रश्नकर्ता : पण मग असे सांगितल्यावर त्यांना दुःख तर होईलच ना? आणि तुम्ही तर सांगितले आहे की कोणालाही दुःख द्यायचे नाही.

दादाश्री : दुःख होणार नाही, कारण तुम्ही नाटकीय पद्धतीने बोललात तर त्यांना दुःख होणार नाही, फक्त त्यांच्या मनात जागृती येईल, व त्यांचा निश्चय बदलेल. म्हणजे तुम्ही दुःख देत नाही. दुःख केव्हा होईल? तर तुमचा हेतू जर दुःख देण्याचा असेल, की 'मी त्यांना सरळ करायला हवे', तरच त्यांना दुःख होईल.

रागाचे 'ज्ञाता-द्रष्टा' राहिल्याने राग साफ होऊन निघून जाईल. ते परमाणू शुद्ध होऊन निघून जातील. एवढेच तुमचे कर्तव्य.

प्रश्नकर्ता : रागावल्यानंतर प्रतिक्रमण केले, तर त्याला पुरुषार्थ म्हणायचा की पराक्रम म्हणायचे?

दादाश्री : त्याला पुरुषार्थ म्हणतात, पराक्रम नाही.

प्रश्नकर्ता : तर मग पराक्रम कशाला म्हणतात?

दादाश्री : पराक्रम तर पुरुषार्थाच्याही पुढे आहे, आणि हा काही पराक्रम नाही. हे तर आत आग होत आहे त्यावर औषध लावतात. यात पराक्रम कुठे आहे? या सर्वांना जाणणे, आणि जाणणाऱ्यालाही जाणणे त्याला पराक्रम म्हणतात. आणि प्रतिक्रमण करणे याला पुरुषार्थ म्हणतात. शेवटी प्रतिक्रमण करता करता शब्दांचा भडिमार कमी होत जाईल, आपोआपच सर्व कमी होत जाईल. नियमानेच सारे कमी होत जाईल, नैसर्गिकपणे सर्व बंद होईल. प्रथम अहंकार जाईल, आणि नंतर बाकी सर्व जाईल. आपापल्या घरी जातील. आत थंडगार वाटेल! आता आत थंडगार वाटते ना?

प्रतिक्रमण केल्याने सर्व कर्मे नष्ट होतात. कर्त्याच्या गैरहजेरीमुळे पूर्णपणे नष्ट होतात. कर्त्याच्या गैरहजेरीत आपण ही फळे भोगत आहोत. कर्त्याच्या गैरहजेरीत भोक्ता आहोत, म्हणून कर्मे नष्ट होतात आणि जगातील लोक कर्त्याच्या हजेरीत भोक्ता आहेत, म्हणून त्यांनी जरी

प्रतिक्रमण केले तरी कर्मे हलकी होतात पण पूर्णपणे नष्ट होत नाहीत. कर्मे फळ दिल्याशिवाय राहत नाहीत, आणि तुमची कर्मे तर नष्टच होऊन जातात.

कोणाचे दोष दिसेनासे झाले की समजायचे सर्वविरती पद आहे, संसारात राहूनसुद्धा! असे हे अक्रम विज्ञानाचे सर्वविरती पद वेगळ्या प्रकारचे आहे. संसारात राहून, सुगंधी तेल डोक्याला लावूनही, कानात सुगंधी अत्तराचा बोळा घालून फिरत असतो पण त्याला कोणाचाही दोष दिसत नाही.

वीतद्वेष झाला त्याला एकावतारी म्हणतात. वीतद्वेषामध्ये जो कच्चा राहिला, त्याचे दोन-चार जन्म होतील.

15. भाव अहिंसेच्या मार्गावर...

प्रश्नकर्ता : मोक्षाला जाण्यापूर्वी, एखाद्या जीवाशी काही देणेघेणे शिल्लक असेल, आणि आम्ही जर त्याचे प्रतिक्रमण करत राहिलो तर तो आम्हाला सोडून देईल का?

दादाश्री : हो.

प्रश्नकर्ता : पण त्यासाठी काय म्हणायला हवे?

दादाश्री : ज्या ज्या जीवांना माझ्याकडून कुठलेही दुःख दिले गेले असेल, त्या सर्व जीवांनो मला क्षमा करा.

प्रश्नकर्ता : जीवमात्र?

दादाश्री : हो, जीवमात्र.

प्रश्नकर्ता : त्यात मग वायुकाय, तेउकाय असे सर्व जीव येतात का?

दादाश्री : असे सर्व म्हटल्यावर त्यात सर्व येतील.

प्रश्नकर्ता : अजाणता एखाद्या जीवाची हिंसा झाली, तर काय करावे?

दादाश्री : अजाणता हिंसा झाली, पण लक्षात आल्यावर तुम्हाला 'असे होता कामा नये', असा ताबडतोब पश्चात्ताप व्हायला हवा. आणि पुन्हा असे होऊ नये यासाठी जागृती ठेवायची. असा उद्देश तुम्ही बाळगायला हवा. भगवंतानी म्हटले होते, 'कोणालाही मारायचे नाही, अशी ठाम भावना ठेवा.' कोणाही जीवाला किंचितदेखील दुःख द्यायचे नाही, अशी भावना दररोज पाच वेळा करा. मन-वचन-काया या द्वारे कोणाही जीवाला किंचितदेखील दुःख न होवो असे सकाळी पाच वेळा म्हणून प्रापंचिक व्यवहार सुरू करावे. मग तुमची जबाबदारी कमी होते. कारण तुम्हाला भावना करण्याचा अधिकार आहे. क्रिया आपल्या सत्तेत नाही.

प्रश्नकर्ता : चुकून झाले तरी पण पाप तर लागतेच ना?

दादाश्री : चुकून विस्तवावर हात ठेवला तर काय होईल?

प्रश्नकर्ता : हात भाजणार.

दादाश्री : मग लहान बाळाचा हात भाजणार नाही का?

प्रश्नकर्ता : भाजणार.

दादाश्री : त्याचाही भाजणार. म्हणजे कोणी सोडत नाही. अजाणता करा किंवा जाणता करा, कोणी सोडत नाही.

प्रश्नकर्ता : ज्ञान घेतल्यावर एखाद्या महात्म्याला डास चावले, आणि तो उठून रात्री डास मारू लागला, तर याला काय म्हणावे?

दादाश्री : त्याचे भाव बिघडले असे म्हणावे. याला ज्ञानाची जागृती म्हणता येत नाही.

प्रश्नकर्ता : त्याला हिंसक भाव म्हणायचे का?

दादाश्री : हिंसक भाव एवढेच नव्हे, तर तो ज्ञान घेतल्यापूर्वी जसा होता तसा परत झाला. पण नंतर प्रतिक्रमण केले तर ते सर्व धुतले जाईल.

प्रश्नकर्ता : पुन्हा दुसऱ्या दिवशी पण तो तसाच करू लागला तर?

दादाश्री : अरे, अगदी शंभर वेळा केले तरी प्रतिक्रमणाने ते धुतले जाते. मारण्याचा विचारसुद्धा मनात आणू नका. एखादा जीव आवडत नसेल तर त्याला बाहेर नेऊन सोडून या. तीर्थंकर भगवंतांनी 'मार' शब्दच काढून टाकायला सांगितले होते. 'मार' या शब्दाचा उच्चार पण करू नका, असे म्हटले आहे. 'मार' या शब्दात खूप जोखीम आहे. इतके अधिक अहिंसक, परमाणू इतके अधिक अहिंसक असावेत!

प्रश्नकर्ता : भावहिंसा आणि द्रव्यहिंसा याचे फळ एकाच प्रकारचे असते का?

दादाश्री : भावहिंसेचा फोटो दुसरा कोणी पाहू शकत नाही. आणि सिनेमासारखा हा जो सिनेमा चालत आहे, आणि आपण त्याला पाहू शकतो, ती सगळी द्रव्यहिंसा आहे. भावहिंसा सूक्ष्मरूपात असते (ती दिसत नाही). आणि द्रव्यहिंसा तर प्रत्यक्ष दिसते. मन-वचन-काया यांनी जगात जी दिसत आहे ती सर्व द्रव्यहिंसा आहे. तुम्ही असे म्हणा की या जीवांना वाचविले पाहिजे. मग ते वाचतील किंवा न वाचतील, याला तुम्ही जबाबदार नाही. तुम्ही असे म्हणा की, 'या जीवांना वाचविले पाहिजे', तुम्हाला फक्त एवढेच करायचे आहे. मग हिंसा झाली, तरी त्याला तुम्ही जबाबदार नाही! हिंसा झाली तर त्याबद्दल पश्चात्ताप करा, प्रतिक्रमण करा. मग तुमची जबाबदारी संपली.

प्रश्नकर्ता : तुमच्या पुस्तकात वाचले आहे की, 'मन-वचन-काया यांनी कोणत्याही जीवाला किंचितदेखील दु:ख होऊ नये.' पण आम्ही तर शेतकरी आहोत. आम्ही जेव्हा तंबाखूचे पीक घेतो, तेव्हा आम्हाला प्रत्येक रोपट्याचे शेंडे म्हणजे त्याची मान तोडावीच लागते. म्हणजे त्यामुळे त्या रोपट्याला तर दु:ख झालेच ना? त्याचे पाप तर लागेलच ना? आम्ही तर अशी लाखो रोपट्यांची शेंडे तोडून टाकतो. मग या पापाचे निवारण कशा प्रकारे करावे?

दादाश्री : त्यासाठी तर मनात असे वाटायला हवे की 'असा व्यवसाय माझ्या वाट्याला का बरे आला?' बस एवढेच. रोपट्याची शेंडे कापून टाका पण मनात मात्र 'असा व्यवसाय माझ्या वाट्याला का आला?' असा पश्चात्ताप झाला पाहिजे. असे करता कामा नये. मनात असे वाटायला हवे, एवढे पुरे आहे.

प्रश्नकर्ता : पण हे पाप तर आहेच ना?

दादाश्री : ते तर आहेच, पण ते तुम्ही बघू नका. जे पाप होत आहे, त्या पापाला बघत बसू नका. असे व्हायला नको होते असे तुम्ही निश्चित करा. निश्चय केला पाहिजे. हा व्यवसाय का मिळाला? दुसरा चांगला व्यवसाय मिळाला असता तर आपण असे केले नसते. असा पश्चात्ताप तुम्हाला करावा लागला नसता. जोपर्यंत हे माहीत नसते तोपर्यंत पश्चात्ताप होत नाही. पूर्वी खुश होऊन रोपटी उपटून फेकून देत होता. समजले ना तुम्हाला? आता आम्ही सांगितल्याप्रमाणे करा ना, मग तुमची सर्व जबाबदारी आमच्यावर. रोपटे उपटून फेकून देता, त्याला हरकत नाही. पश्चात्ताप मात्र व्हायला हवा की असे काम माझ्या वाट्याला का आले?

शेतीवाडी करताना जीवजंतू मारले जातात, त्याचा दोष तर लागणारच ना? म्हणून शेतीवाडी करणाऱ्यांनी दररोज पाच-दहा मिनिटे देवाजवळ अशी प्रार्थना करायला हवी की, 'हे दोष झाले, त्याबद्दल मी माफी मागत आहे.' याप्रकारे प्रतिक्रमण करत जा.

प्रश्नकर्ता : तुम्ही ते वाक्य सांगितले होते ना की, 'कोणत्याही जीवमात्राला मन-वचन-काया याद्वारे दुःख न होवो.' सकाळी एवढे बोलले की भागेल की नाही भागणार?

दादाश्री : ते वाक्य पाच वेळा म्हणावे, पण ते अशा तऱ्हेने बोलावे, पैसे मोजताना तुमची स्थिती कशी असते, त्याप्रकारे बोलावे. रुपये मोजताना चित्त जसे (एकाग्र) असते, जसे अंतःकरण असते, तसेच हे वाक्य बोलताना असले पाहिजे

16. दुःखदायी वैराची वसूली

प्रश्नकर्ता : समजा, आपण प्रतिक्रमण केले नाही, तर वैराची परतफेड करण्यासाठी तर जावे लागेल ना?

दादाश्री : नाही, परतफेड करण्याची गरज नाही. पण तुम्ही बंधनात अडकून राहता. समोरच्या व्यक्तीशी आपले काहीच देणेघेणे नाही.

प्रश्नकर्ता : पण परतफेड तर करावीच लागेल ना?

दादाश्री : तुम्हीच बंधनात आहात, म्हणून तुम्ही प्रतिक्रमण करायला हवे. प्रतिक्रमणाने (वैर) मिटेल. म्हणून तर तुम्हाला हे हत्यार दिले आहे ना, प्रतिक्रमण!

प्रश्नकर्ता : आपण प्रतिक्रमण करून वैर सोडले, परंतु जर समोरच्याने वैर सोडले नाही तर!

दादाश्री : महावीर भगवंतांवर पुष्कळ लोक राग (मोह, आसक्ती) करत होते आणि पुष्कळ लोक त्यांचा द्वेषही करत होते. पण त्याच्याशी महावीरांना काय देणेघेणे? वीतरागांना काहीच चिकटत नाही. वीतराग तर शरीराला तेल चोपडल्याशिवाय बाहेर वावरत असतात, आणि बाकी सर्व लोक शरीराला तेल चोपडून फिरतात. तर त्या तेल चोपडलेल्यांना सगळीकडून धूळ चिकटणारच.

प्रश्नकर्ता : दोन व्यक्तींमध्ये जे वैरभाव, राग-द्वेष निर्माण होतात, त्यातून मी प्रतिक्रमण करून सुटतो, परंतु जर समोरच्या व्यक्तीने वैर सोडले नाही, तर मग ती व्यक्ती परत पुढच्या जन्मात राग-द्वेषाचा हिशोब पूर्ण करील का? कारण त्याने तर वैर ठेवलेलेच आहे ना?

दादाश्री : प्रतिक्रमणाने त्याचे वैर कमी होऊन जाईल. एका वेळेस कांद्याचा एक थर जाईल. दुसऱ्या वेळी दुसरा, म्हणजे वैराचे जितके थर असतील तितके निघून जातील. समजले ना आता?

प्रश्नकर्ता : प्रतिक्रमण करत असतानाच जर अतिक्रमण झाले तर काय करावे?

दादाश्री : तर मग थोड्या वेळाने करा. आपण फटाके विझवायला गेलो, तेवढ्यातच दुसरा फटाका फुटला, तर आपण थोडा वेळ परत मागे यायला हवे. थोड्या वेळाने आपण विझवू. फटाके तर फुटतच राहतील, त्यालाच संसार म्हणतात.

तो वाकडा वागेल, अपमान करील तरीही आम्ही त्याचे रक्षण करू. एक गृहस्थ माझे विरोधक झाले होते. तेव्हा मी या सर्वांना सांगितले, (त्यांच्याबद्दल) अजिबात वाईट विचार करू नका. जर वाईट विचार आले तर लगेच प्रतिक्रमण करा. ते भाऊ चांगले आहेत, पण असे लोक कशाच्या आधीन आहेत? ते सर्व कषायांच्या आधीन आहेत, आत्म्याच्या आधीन नाहीत. जो आत्म्याच्या आधीन असेल तो असे उलट उत्तर देणारच नाही. म्हणजे कषायांच्या आधीन असलेल्या माणसाने जरी कुठलाही गुन्हा केला तरी त्याला माफ करावे. तो बिचारा स्वत:च्या आधीनच नाही! तो जेव्हा कषाय करतो, तेव्हा आपण शांत राहिले पाहिजे. नाही तर, तो सगळे उलटेच करील. कषायांच्या आधीन म्हणजे उदयकर्माच्या आधीन. जसा उदय येईल तसा तो वागेल.

17. कार्याच्या कारण स्वरूप अभिप्रायाचे वारण

समोरची व्यक्ती तुमच्याकडे चांगल्या भावाने किंवा वाईट भावाने कसाही आला असेल, पण त्याच्याबरोबर कसे वागावे हे आपण ठरवायचे आहे. समोरच्या व्यक्तीचा स्वभाव जर वाकडा असेल तर अशा माणसाबरोबर डोकेफोड करायची नसते. जो प्रकृती स्वभावाने चोर आहे, दहा वर्षे आपण त्याची चोरी पाहत आलो आहोत, आणि तो जर येऊन तुमच्या पाया पडला तर काय आपण त्याच्यावर विश्वास ठेवावा? विश्वास ठेवता कामा नये. त्याने चोरी केली तर आपण त्याला माफ करावे, म्हणावे जा, आता तू मुक्त आहेस. आता आमच्या मनात तुझ्याबद्दल कोणताही अभिप्राय राहणार नाही. पण त्याच्यावर विश्वास ठेवू नये आणि त्याची संगत पण ठेवू नये. हे माहीत असून सुद्धा संगत ठेवली आणि विश्वास ठेवला नाही, तर तो गुन्हा आहे. खरे म्हणजे

सोबत ठेवूच नये, आणि जर ठेवली तर त्याच्याबद्दल पूर्वग्रह असता कामा नये. जे होईल ते बरोबर, असा भाव ठेवावा.

प्रश्नकर्ता : तरी पण वाईट अभिप्राय बनलाच तर काय करावे?

दादाश्री : तसे झाले तर माफी मागायची. ज्या व्यक्तीबद्दल वाईट अभिप्राय झाला आहे, त्या व्यक्तीचीच माफी मागायची.

प्रश्नकर्ता : चांगला अभिप्राय द्यायचा की नाही?

दादाश्री : कोणताच अभिप्राय द्यायचा नाही, आणि जर दिला गेला तर आपण तो पुसून टाकावा. तुमच्याजवळ पुसून टाकायचे साधन आहे, 'अमोघ शस्त्र' आहे. आलोचना-प्रतिक्रमण-प्रत्याख्यान रूपी 'अमोघ शस्त्र.'

प्रश्नकर्ता : गाढ अभिप्राय कसे काढावे?

दादाश्री : जेव्हापासून निश्चित केले की काढायचे आहेत तेव्हापासून ते निघणे सुरू होतात. जास्त गाढ असतील त्यांना जर दररोज दोन-दोन तास खणले तर ते निघून जातील. 'आत्मा' प्राप्त झाल्यावर 'पुरुषार्थ' धर्म प्राप्त झाला आहे, आणि पुरुषार्थ धर्म पराक्रमापर्यंत पोहोचू शकतो, तो कुठलीही *अटकण* असेल (जे बंधन रूप असते) तिला उपटून फेकू शकतो. पण कोणत्या कारणामुळे हे उत्पन्न झाले आहे, ते एकदा समजले पाहिजे. मग त्यासाठी प्रतिक्रमण करावे.

अभिप्राय बनणार नाहीत याकडे लक्ष द्या. त्यासाठी जास्तीत जास्त लक्ष दिले पाहिजे. बाकी काही अडचण नाही. कोणाचे काही पाहण्यापूर्वीच अभिप्राय बनतात, संसार जागृती एवढी जास्त आहे की अभिप्राय बनतातच. म्हणून अभिप्राय बनताच आपण तो सोडून द्यायला हवा. अभिप्रायाच्या बाबतीत खूप सावध राहण्याची आवश्यकता आहे. म्हणजे अभिप्राय तर बनतील, पण बनताक्षणीच आपण ते पुसून टाकावेत. प्रकृती अभिप्राय बनवत राहते आणि प्रज्ञाशक्ती अभिप्रायातून सोडवत राहते. प्रकृती अभिप्राय बनवत राहील. काही काळ बनवतच राहील,

पण आपण ते अभिप्राय सोडत जावे. ही सर्व भानगड अभिप्रायाचीच आहे.

प्रश्नकर्ता : जे अभिप्राय बनतात, ते कसे सोडवावे?

दादाश्री : अभिप्राय सुटण्यासाठी आपण असे करायला हवे की आपण म्हणावे, 'या भाऊसाहेबांबद्दल माझा असा अभिप्राय बनला आहे, तो चुकीचा आहे. मी असे करता कामा नये.' असे म्हटले की तो अभिप्राय सुटतो. आपण जाहीर करायला हवे की 'हा अभिप्राय चुकीचा आहे, या भाऊंसाहेबांबद्दल, असा अभिप्राय कसा बनवू शकतो? हे तू काय करत आहेस?' अशा प्रकारे त्या अभिप्रायाला चुकीचा म्हटल्यावर तो सुटेल.

प्रतिक्रमण केले नाही तर तुमचा अभिप्राय कायम राहतो, आणि त्यामुळे तुम्ही बंधनात अडकता. जो दोष झाला त्यात तुमचा अभिप्राय कायम राहिला. प्रतिक्रमण केले की तुमचा तो अभिप्राय दूर झाला. अभिप्रायांपासून 'मन' उत्पन्न झाले आहे. माझा कोणत्याही व्यक्तीबाबत किंचितदेखील अभिप्राय नाही. कारण एकदा पाहिल्यानंतर पुन्हा मी अभिप्राय बदलत नाही. एखाद्या व्यक्तीने संयोगवश चोरी केली, आणि मी ती स्वत: बघितली तरी मी त्याला चोर म्हणणार नाही. कारण ती संयोगांमुळे झाली आहे. आणि जगातील लोक जो पकडला जातो त्यालाच चोर म्हणतात. हे संयोगांमुळे झाले की कसे? का कायमच चोर होता? जगातील लोक असा विचार करत नाहीत. मी तर जो कायमच चोर आहे त्यालाच चोर म्हणतो. संयोगवशात चोरी केलेल्याला मी चोर म्हणत नाही. म्हणजेच मी एक अभिप्राय दिल्यानंतर दुसरा अभिप्राय देतच नाही. कोणाही व्यक्तीबद्दलचा अभिप्राय मी आजपर्यंत बदललेला नाही.

तुम्ही शुद्ध झाला आहात आणि आता चंदुभाईला शुद्ध करणे हे तुमचे कर्तव्य आहे. ते पुद्‌गल काय म्हणते, 'भाऊ, आम्ही तर शुद्धच होतो. भाव करून तुम्हीच आम्हाला बिघडविले आणि या स्थितीपर्यंत

आम्हाला पोहोचवले, नाही तर आमच्यात पू, हाडे असे काहीही नव्हते. आम्ही शुद्धच होतो. तुम्ही आम्हाला बिघडविले. म्हणून तुम्हाला आमच्यापासून मुक्ती हवी असेल, मोक्ष हवा असेल, तर फक्त स्वतःला शुद्ध करून काहीही निष्पन्न होणार नाही. जेव्हा तुम्ही आम्हाला शुद्ध कराल तेव्हाच तुमची सुटका होईल.'

18. विषय विकार जिंकतो तो राजांचा राजा

प्रश्नकर्ता : एकदा 'बी' पडले की मग ते रूपकात तर येणारच ना?

दादाश्री : 'बी' तर पडणारच! ते रूपकात येईल पण जोपर्यंत ते घट्ट रुजत नाही, तोपर्यंत थोडे कमी-जास्त होऊ शकते. म्हणजे मरण्यापूर्वी तो साफ होऊ शकतो.

म्हणूनच आम्ही विषयविकारी दोष असलेल्याला सांगत असतो की विषयसंबंधी दोष झाले असतील, अन्य दोष झाले असतील, तर तू रविवारी उपास कर आणि दिवसभर विचार करून करून त्या दोषांना धूत रहा. जर त्याने असे आज्ञापूर्वक केले तर कमी होत जाईल.

सध्या फक्त डोळ्यांना सांभाळावे. पूर्वी तर लोक खूपच कडक होते, डोळे फोडून घेत असत. आपल्याला डोळे फोडायचे नाहीत. तो मूर्खपणा आहे, आपल्याला नजर दुसरीकडे न्यायची आहे. तरी पण नजर गेलीच तर प्रतिक्रमण करावे. एक मिनिट देखील प्रतिक्रमण चुकवायचे नाही. खाण्या-पिण्यात चूक झाली तर चालेल. या जगात सर्वात मोठा रोग हाच आहे. यामुळेच जग उभे आहे. याच्याच मुळावर संसार उभे आहे. हेच मूळ आहे.

हक्काचे खाल्ले तर मनुष्यजातीत येतो. बिनहक्काचे खाल्ले तर पशुयोनीत जातो.

प्रश्नकर्ता : आम्ही तर बिनहक्काचे खाल्ले आहे.

दादाश्री : खाल्ले आहे तर प्रतिक्रमण करा, अजूनही देव

वाचवेल. अजूनही देवळात जाऊन पश्चात्ताप करा. बिनहक्काचे खाल्ले असेल तर पश्चात्ताप करा, अजून जिवंत आहात. जोपर्यंत या देहात आहात तोपर्यंत पश्चात्ताप करा.

प्रश्नकर्ता : मला तर भीती वाटते, आपण आत्ताच म्हणालात की सत्तर टक्के लोकांना चार पायवाले व्हायचे आहे, तर मग आमच्यासाठी काही अवकाश आहे की नाही?

दादाश्री : नाही, नाही, आता अवकाश नाही. म्हणून आता तरी सावध व्हा जरा...

प्रश्नकर्ता : महात्म्यांविषयी बोलत आहे.

दादाश्री : महात्मे जर का आमच्या आज्ञेत राहतील, तर कोणी त्यांचे नावही घेऊ शकणार नाही, या जगात.

म्हणून तर मी लोकांना सांगतो, अजूनही सावध व्हायचे असेल तर व्हा. अजूनही माफी मागू शकता, माफी मागण्याचा मार्ग आहे.

एखाद्या नातेवाईकाला आपण मोठे पत्र लिहिले, आणि त्यात शिव्या लिहिल्या असतील, खूप शिव्या दिल्या असतील, पूर्ण पत्र शिव्यांनीच भरले असेल, आणि मग खाली असे लिहिले की आज बायकोशी भांडण झाले आहे, त्यामुळे तुमच्या बद्दल बरे-वाईट लिहिले गेले आहे पण मला माफ करावे. तर मग तो सर्व शिव्या खोडून टाकील की नाही? म्हणजे तो शिव्या वाचील, शिव्यांचा स्वीकार करील पण नंतर माफ पण करील! जग हे असे आहे. म्हणून तर आम्ही सांगतो की माफी मागा, आपल्या इष्टदेवतेची माफी मागा आणि अशी कुणाची माफी मागत नसाल तर माझ्याकडे मागा. मी तुम्हाला माफ करीन. पण अतिशय विचित्र काळ येत आहे आणि त्यात चंदुभाई पण वाटेल तसा वागत आहे. याला काहीच अर्थ नाही ना! जबाबदाऱ्यांनी भरलेले जीवन! अजूनही सावध व्हायचे असेल तर व्हा. ही शेवटची हमी देत आहोत. भयंकर दु:खे! अजूनही प्रतिक्रमणरूपी हत्यार देत आहोत. प्रतिक्रमण

कराल तर वाचण्याचा काही तरी उपाय आहे. आणि आमच्या आज्ञेनुसार कराल तर तुमचे कल्याण झपाट्याने होईल. पापे तर भोगावीच लागतील पण इतकी जास्त नाहीत.

हजारो लोकांच्या हजेरीत जर कोणी म्हटले 'चंदुभाईंना अजिबात अक्कल नाही' तर त्याला आशीर्वाद द्यावेसे वाटायला हवेत की, अहोहो! मला तर हे माहीतच होते की चंदुभाईला अक्कल नाही, पण हे तर त्यांनाही माहीत आहे, तेव्हा वेगळेपण राहील!

या चंदुभाईंना आम्ही रोज हाक मारतो की, 'या चंदुभाई, या' मग एखाद्या दिवशी हाक मारत नाही, त्याचे कारण काय? तर तेव्हा त्यांच्या मनात विचार येईल की आज मला पुढे बोलावले नाही. आम्ही त्यांना चढवतो, पाडतो, चढवतो, पाडतो, असे करत करत ते ज्ञान प्राप्त करतात. आमच्या या सर्व कृती ज्ञान प्राप्तीसाठी असतात. आमची प्रत्येक कृती ज्ञान प्राप्त करण्यासाठी असते. प्रत्येकासाठी वेगवेगळ्या कृती असतात, हे सर्व ज्याची त्याची प्रकृती बघून केले जाते. असे करावे लागते. प्रकृती निघून जायला हवी ना. प्रकृती तर काढावीच लागेल. परकी वस्तू किती वेळ आपल्याजवळ ठेवायची?

प्रश्नकर्ता : खरी गोष्ट आहे, प्रकृती निघाल्या शिवाय सुटकाचनाही.

प्रश्नकर्ता : बरोबर आहे, प्रकृती निघून गेल्याशिवाय गत्यंतरच नाही.

दादाश्री : हो. आमची तर निसर्गाने काढली, ज्ञानाने काढली आणि तुमची आम्ही काढू तेव्हाच जाईल ना, आम्ही निमित्त आहोत ना!

19. खोटे बोलण्याची सवय असणाऱ्यांना

प्रश्नकर्ता : समजा आम्ही खोटे बोललो असू, तर त्याला पण कर्म बांधले असेच म्हटले जाईल ना?

दादाश्री : निश्चितच! पण खोटे बोलण्यापेक्षा खोटे बोलण्याचा भाव करता, याला भारी कर्मे म्हटले जाते. खोटे बोलणे हे तर कर्मफळ आहे. खोटे बोलण्याचे भाव, खोटे बोलण्याचा निश्चय, तोच कर्मबंधन घडवितो. समजले का तुम्हाला? हे वाक्य तुम्हाला मदत करील का? काय मदत करील?

प्रश्नकर्ता : खोटे बोलणे बंद व्हायला हवे.

दादाश्री : नाही. खोटे बोलण्याचा अभिप्रायच सोडून द्यायला हवा. आणि जर खोटे बोलले गेले तर असा पश्चात्ताप करायला हवा. की 'काय करू? असे खोटे बोलता कामा नये.' पण यामुळे खोटे बोलणे बंद होणार नाही, पण खोटे बोलण्याचा अभिप्राय मात्र बंद होईल. 'आजपासून खोटे बोलणार नाही, खोटे बोलणे हे महापाप आहे, भयंकर दुःख देणारे आहे, आणि खोटे बोलणे हेच बंधन आहे.' असा अभिप्राय तुमच्याकडून झाला की मग खोटे बोलण्याचे पाप तुमच्याकडून बंद होईल.

'रिलेटिव्ह धर्म' कसा असला पाहिजे की खोटे बोलले गेले तर बोलले गेले पण नंतर प्रतिक्रमण करायला हवे.

20. जागृती, वाणी बोलताना

मनाचा इतका त्रास नाही, पण वाणीचा त्रास आहे. कारण मन गुप्तपणे चालत असते, पण वाणीमुळे समोरच्याच्या हृदयावर थेट आघात होतो. म्हणून या वाणीमुळे ज्या ज्या व्यक्तींना दुःख झाले आहे, त्या सर्वांची मी क्षमा मागतो, या प्रमाणे प्रतिक्रमण करू शकता.

प्रश्नकर्ता : प्रतिक्रमण केल्यामुळे वाणीमुळे झालेले सर्व दोष माफ होतील ना?

दादाश्री : दोष राहतील, पण जळलेल्या सुंभासारखे दोष राहतील. म्हणजे प्रतिक्रमण केल्यामुळे पुढील जन्मी तुम्ही जरा 'असे' झटकल्यावर सर्व गळून पडेल. त्यातील सर्व सत्वच उडून जाईल.

कर्त्याचा आधार असेल तरच कर्मबंधन होते. आता तुम्ही 'कर्ता' राहिले नाहीत. म्हणून जी मागील कर्मे आहेत, ती फळ देऊन जातील. नवीन कर्मबंधने होणार नाहीत.

प्रश्नकर्ता : जर एखादी व्यक्ती रागावून बोलली तर ते अतिक्रमण नाही का?

दादाश्री : त्याला अतिक्रमणच म्हणणार ना?

प्रश्नकर्ता : कोणाला दुःख होईल असे शब्द तोंडून निघाले आणि त्याबद्दल प्रतिक्रमण केले नाही, तर काय होईल?

दादाश्री : असे शब्द त्याच्या जिव्हारी लागतील, त्याला दुःख होईल. समोरचा दुःखी झाला तर ते तुम्हाला आवडेल काय?

प्रश्नकर्ता : त्याने कर्मबंधन होते का?

दादाश्री : ते नियमाविरुद्धच आहे ना? त्याला नियमाविरुद्धच म्हणणार ना? नियमाविरुद्ध काही होताच कामा नये. आमच्या आज्ञा पाळल्यात तर त्याला धर्म बोलले जाईल. आणि प्रतिक्रमण करण्यात नुकसान तरी काय आहे? माफी मागा आणि 'पुन्हा असे करणार नाही' असा भाव पण मनात ठेवा, बस एवढेच थोडक्यात करायचे आहे. यात भगवंत काय करणार? यात कशाला न्याय शोधत बसता? जर व्यवहाराला व्यवहार समजाल, तर न्याय समजून जाईल! शेजारी 'वाकडे' का बोलला? कारण तुमचा व्यवहार तसा होता. आणि तुम्ही उलट बोलला ते समोरच्याच्या व्यवहाराच्या आधीन होते. पण तुम्हाला तर मोक्ष हवा आहे, म्हणून तुम्ही त्यासाठी प्रतिक्रमण करावे.

प्रश्नकर्ता : जेव्हा समोरचा वेडेवाकडे बोलतो, तेव्हा आपल्या ज्ञानामुळे समाधान तर वाटत राहते, पण मुख्य प्रश्न असा आहे की जेव्हा माझ्याकडून काही कडू शब्द बोलले जातात, तेव्हा जर मी ह्या वाक्याचा आधार घेतला तर मला चुकीचे लाइसन्स मिळते ना?

दादाश्री : या वाक्याचा आधार तुम्ही घेऊच शकत नाही

ना! त्यासाठी तर तुम्हाला प्रतिक्रमणाचा आधार दिला आहे. समोरच्या व्यक्तीला दु:ख वाटेल असे बोलले गेले असेल तर प्रतिक्रमण करावे.

समोरचा माणूस जरी वाटेल ते बोलला, पण त्या वेळी जर 'वाणी ही पर आहे आणि पराधीन आहे' ही गोष्ट स्वीकारली तर तुम्हाला समोरच्या व्यक्तीमुळे दु:ख होणारच नाही ना!

प्रश्नकर्ता : परमार्थासाठी जर थोडे खोटे बोलले तर त्यामुळे दोष लागतो का?

दादाश्री : परमार्थ म्हणजे आत्म्यासाठी जे काही करावे लागते, त्यामुळे दोष लागत नाही. देहासाठी जे काही करता, चांगले केले तर गुण लागेल आणि वाईट केले तर दोष लागेल. आत्म्यासाठी जे काही करता, त्याला काहीच हरकत नाही. तुम्ही आत्म्याला परमार्थ म्हणता ना? हो, मग आत्महेतू असेल, त्यासाठी जी जी कार्ये असतील, त्यात दोष लागत नाही. आपल्या निमित्ताने समोरच्या व्यक्तीला दु:ख झाले तर मात्र दोष लागतो!

प्रश्नकर्ता : जर प्रतिक्रमणाचा परिणाम होत नसेल तर त्याचा अर्थ आम्ही पूर्ण भावपूर्वक प्रतिक्रमण केले नाही असा आहे, की समोरच्या व्यक्तीची आवरणे जास्त आहेत असा आहे.

दादाश्री : तुम्ही समोरच्या व्यक्तीचा विचार करायचाच नाही. तो तर वेडासुद्धा असेल. आपल्या निमित्ताने त्याला दु:ख होता कामा नये. बस!

प्रश्नकर्ता : म्हणेजच कोणत्याही कारणाने त्याला दु:ख झाले तर त्याचे दु:ख दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

दादाश्री : त्याला दु:ख झाले तर निश्चितच समाधान करायला हवे. ती आपली रिस्पॉन्सिबिलिटी (जबाबदारी) आहे. कोणालाही दु:ख होऊ नये यासाठीच तर आपले सर्व आयुष्य आहे.

प्रश्नकर्ता : समजा, तसे करूनही त्याचे समाधान झाले नाही तर मग आपली जबाबदारी किती?

दादाश्री : प्रत्यक्ष जाऊन जर शक्य असेल तर डोळ्यांनी नम्रता दाखवावी. माफी मागून देखील जर त्याने टपली मारली तर समजावे की तो माफी मागण्यालायक नाही. तरीही निकाल तर करायचाच आहे. माफी मागून देखील जर त्याने टपली मारली तर समजावे की आपली चूक तर झालीच आहे पण ही व्यक्ती माफी मागण्याच्या लायकीची नाही, म्हणून त्याच्यासमोर झुकणे बंद करावे.

प्रश्नकर्ता : हेतू चांगला आहे, तरी प्रतिक्रमण का करायला हवे?

दादाश्री : प्रतिक्रमण तर करायलाच हवे, त्याला दुःख होतेच ना, आणि व्यवहारात लोक काय म्हणतील, बघा, ही बाई नवऱ्याला कशी उठसूट रागावते! म्हणून नंतर प्रतिक्रमण करावे लागते. (जे दोष) डोळ्यांनी दिसतात त्यासाठी प्रतिक्रमण करायला हवे. आतमध्ये तुमचा हेतू जरी शुद्ध सोन्यासारखा असो, पण त्याचा काय उपयोग? अशा हेतूने काही होत नाही. हेतू जरी सोन्यासारखा असला तरी आम्हालाही प्रतिक्रमण करावे लागते. चूक झाली की प्रतिक्रमण करायलाच हवे. आता सगळ्या महात्म्यांची जगत् कल्याण करण्याची भावना आहे, त्यांचा हेतू चांगलाच आहे. पण एवढ्याने भागत नाही. प्रतिक्रमण तर अवश्य करावेच लागते. कपड्यावर डाग पडला तर तुम्ही तो धुऊन काढता ना? तसेच हे कपड्यावरचे डाग आहेत.

प्रश्नकर्ता : व्यवहारात जर कोणी चुकीचे वागत असेल तर टोकावे लागते. त्यामुळे त्याला दुःख होते, मग त्याचा 'निकाल' कसा करावा?

दादाश्री : व्यवहारात टोकावे लागते, पण ते अहंकारपूर्वक घडते. म्हणून त्याचे प्रतिक्रमण करावे.

प्रश्नकर्ता : जर टोकले नाही तर ते डोक्यावर बसतील?

दादाश्री : टोकावे तर लागतेच, पण टोकता यायला हवे. नीट बोलता येत नाही, नीट व्यवहार जमत नाही म्हणून अहंकारपूर्वक टोकले जाते. म्हणून नंतर प्रतिक्रमण करावे. तुम्ही समोरच्याला रागावलात, तर त्याला वाईट तर वाटणारच, पण त्यासाठी प्रतिक्रमण करत राहिलात तर सहा महिन्यांनी, बारा महिन्यांनी तुमची वाणी अशी निघेल की समोरच्याला ती गोड वाटेल.

जर आम्हीसुद्धा कोणाची गंमत केली तर आम्हाला त्यासाठी प्रतिक्रमण करावे लागते. आमचे पण असे काही चालत नाही.

प्रश्नकर्ता : ती तर गंमत असते. असे तर करू शकतो ना!

दादाश्री : नाही, पण त्यासाठी देखील आम्हाला प्रतिक्रमणे करावी लागतात. तुम्ही केली नाहीत तर एकवेळ चालेल पण आम्हाला करावीच लागतात. नाही तर आमचे हे ज्ञान, ही जी टेपरेकॉर्ड (वाणी) निघत असते ना, तिचा प्रभाव कमी होईल.

तशी मी सर्व प्रकारची थट्टा-मस्करी केली होती. सर्व प्रकारची थट्टा-मस्करी कोण करू शकतो? ज्याचा ब्रेन (मेंदू) खूप तेज असतो, तोच करतो. मी तर मजेत सगळ्यांची चेष्टा करत असे, चांगल्या चांगल्या लोकांची, मोठ्या-मोठ्या वकिलांची, डॉक्टरांची चेष्टा करत असे. आता असा हा 'अहंकार' चुकीचाच आहे ना? म्हणजे आपण आपल्या बुद्धीचा दुरुपयोगच केला ना! 'मस्करी करणे' म्हणजे 'बुद्धी'चीच खूण आहे ना?

प्रश्नकर्ता : थट्टा करण्यात कसली जोखीम आहे? कोणत्या प्रकारची जोखीम आहे.

दादाश्री : असे आहे, कोणाला थोबाडीत मारण्यात जेवढी जोखीम आहे, त्याच्या अनंत पटीने जोखीम थट्टा करण्यात आहे. त्याची बुद्धी कमी पडते म्हणून तुम्ही तुमच्या बुद्धीने त्याच्यावर कुरघोडी करता.

प्रश्नकर्ता : ज्याला टेप करायचे नसेल त्याच्यासाठी काय उपाय आहे?

दादाश्री : कुठलेही स्पंदन होऊ द्यायचे नाही. फक्त पाहतच राहायचे आहे. पण असे शक्य नाही ना! हे सुद्धा मशीन आहे आणि पराधीन आहे. म्हणून आम्ही दुसरा उपाय सांगतो की टेप होताक्षणीच लगेच ती पुसून टाकली तर चालेल. प्रतिक्रमण हे पुसून टाकण्याचे साधन आहे. यामुळे एक-दोन जन्मांत बदल होऊन बोलणे सर्व बंद होऊन जाईल.

प्रश्नकर्ता : शुद्धात्म्याचे 'लक्ष' बसल्यानंतर सतत प्रतिक्रमणे होतच राहतात.

दादाश्री : त्यामुळे तुमची जबाबदारी संपते. काही बोलल्यावर लगेच प्रतिक्रमण केल्यामुळे जोखीमच राहत नाही ना! कडक बोलावे पण ते राग-द्वेषरहित बोलावे. कडक बोलले गेले की लगेच प्रतिक्रमण विधी करावा.

मन-वचन-काया यांचे योग, भावकर्म, द्रव्यकर्म, नोकर्म, चंदुभाई व चंदुभाईच्या नावाच्या सर्व मायेपासून पूर्णपणे भिन्न अशा 'शुद्धात्म्या'चे स्मरण करून म्हणावे, 'हे शुद्धात्मा भगवान, मी आवाज चढवून बोललो ती चूक झाली. त्यासाठी मी माफी मागत आहे, आणि अशी चूक पुन्हा करणार नाही असा निश्चय करत आहे. अशी चूक पुन्हा कधी होता कामा नये, यासाठी मला शक्ती द्या.' 'शुद्धात्म्या'ची किंवा 'दादां'ची आठवण काढून म्हणणे की, 'ही चूक झाली आहे' म्हणजे आलोचना, आणि ती चूक धुणे म्हणजे प्रतिक्रमण, आणि अशी चूक पुन्हा करणार नाही असा निश्चय करणे म्हणजे प्रत्याख्यान.

प्रश्नकर्ता : प्रतिक्रमण केल्यावर आमची वाणी याच जन्मात चांगली होईल का?

दादाश्री : त्यानंतर काही वेगळ्याच प्रकारे घडून येईल! आमची वाणी उच्चतम प्रकारची निघत आहे याचे कारण प्रतिक्रमण हेच आहे. आणि निर्विवाद वाणी आहे याचेही कारण प्रतिक्रमण हेच आहे. नाही तर वाद-विवादच झाले असते. सगळीकडे विवादवाली वाणीच असते.

व्यवहार शुद्धीशिवाय स्याद्‌वाद वाणी (शब्द) बाहेर पडणारच नाही. प्रथम व्यवहार शुद्धी व्हायला हवी.

21. अशा प्रकारे प्रकृती दोष सुटतात

या सत्संगाचे विष पिणे चांगले आहे, पण बाहेरचे अमृत पिणे वाईट आहे. कारण हे विष प्रतिक्रमणयुक्त आहे. आम्ही सर्व विषाचे पेले पिऊन महादेव झालो आहोत.

प्रश्नकर्ता : तुमच्याकडे यायचा खूप वेळा विचार करतो पण येणे होत नाही.

दादाश्री : तुमच्या हातात कुठे सत्ता आहे? तरीही यावेसे वाटते पण येणे होत नाही यासाठी मनात खंत वाटत राहायला हवी. आपण चंदुभाईंना सांगावे, 'चंदुभाई प्रतिक्रमण करा ना, लवकर मार्ग निघेल. जाता येत नाही यासाठी प्रतिक्रमण करा, प्रत्याख्यान करा.' अशी चूक घडली आहे, पण आता पुन्हा चूक करणार नाही.

आता जे भाव मनात येत आहेत, ते जास्त वेळा का येत आहेत आणि तरी (त्याप्रमाणे) कृती का होत नाही? भाव अशामुळे येत आहेत की 'कमिंग इव्हेन्ट्स कास्ट देअर शॅडोज बिफोर!' (ज्या घटना घडणार आहेत त्याची स्पंदने अगोदरच पोहोचतात.

प्रश्नकर्ता : ही जी सारखी काळजी वाटते, तिचे प्रतिक्रमण कसे करावे?

दादाश्री : काळजी वाटते ती आपल्या अहंकारामुळे. मी काही याचा कर्ता नाही. म्हणून 'दादा भगवान क्षमा करा.' काही तरी तर करावेच लागेल ना? आपले काही चालते का?

प्रश्नकर्ता : जर खूप थंडी आहे, खूप थंडी आहे असे आम्ही म्हटले, म्हणजे आम्ही निसर्गाच्या विरुद्ध बोललो, तर त्यासाठी प्रतिक्रमण करायला हवे का?

दादाश्री : नाही, प्रतिक्रमण जिथे राग-द्वेष होत असेल, फाइल असेल तिथेच करावे. कढी खारट असेल तर कढीचे प्रतिक्रमण करायचे नाही पण ज्याच्याकडून मीठ जास्त पडले त्याच्यासाठी प्रतिक्रमण करावे. प्रतिक्रमणामुळे समोरच्या व्यक्तीची परिणती बदलते.

लघवी करायला गेलो, तेव्हा एक मुंगी वाहून गेली तर आम्ही प्रतिक्रमण करतो. आम्ही उपयोग चुकत नाही. ती वाहून गेली, हे 'डिस्चार्ज' आहे पण त्यावेळी अतिक्रमणाचा दोष का झाला? जागृती मंद का झाली? त्याचा दोष लागतो.

वाचताना पुस्तकाला नमस्कार करून म्हणावे, 'दादा, मला पुस्तक वाचण्याची शक्ती द्या.' आणि जर कधी चूक झाली तर लगेच उपाय करावा. दोन वेळा नमस्कार करून म्हणावे, 'दादा भगवान माझी इच्छा नव्हती तरी पण माझ्या हातून चूक झाली त्यासाठी मी माफी मागतो आणि आता पुन्हा असे करणार नाही.'

वेळेवर विधी करणे विसरलो आणि नंतर आठवण झाली तर प्रतिक्रमण करून मग विधी करावा.

'डिस्चार्ज'मध्ये जी अतिक्रमणे झाली, त्यासाठी आपण प्रतिक्रमण करतो. समोरच्या व्यक्तीला दुःख झाले असेल अशा डिस्चार्जचे प्रतिक्रमण करावे. येथील महात्म्यांसाठी किंवा दादांसाठी काही चांगले केले तर त्यासाठी प्रतिक्रमण करण्याची गरज नाही. पण बाहेर कोणाचे काही चांगले केले तर त्याचे प्रतिक्रमण करावे लागते, कारण उपयोग चुकलात यासाठी प्रतिक्रमण करावे लागेत.

प्रश्नकर्ता : प्रतिक्रमण केले तर ते समोरच्या व्यक्तीपर्यंत पोहोचते का?

दादाश्री : समोरच्या व्यक्तीपर्यंत पोहोचते. ती व्यक्ती थोडी नरम होत जाते. त्याला कळो ना कळो, त्याचा आपल्याबद्दल असलेला भाव नरम होत जातो. आपल्या प्रतिक्रमणांचा तर खूपच परिणाम होतो. तासभर जर केले तर समोरच्या व्यक्तीत पूर्ण बदल होऊन जातो, जर नीट

प्रतिक्रमणे झाली असतील तर. आपण ज्यांच्यासाठी प्रतिक्रमण करतो ते आपले दोष तर बघत नाहीत उलट त्यांना आपल्याबद्दल मान उत्पन्न होतो.

प्रश्नकर्ता : प्रतिक्रमणे केली तर नवीन (कर्म) 'चार्ज' होणार नाही का?

दादाश्री : जर आत्मा कर्ता बनला तर कर्मबंधन होते. आत्मा प्रतिक्रमण करत नाही. चंदुभाई प्रतिक्रमण करतील आणि तुम्ही त्याचे 'ज्ञाता-द्रष्टा' राहावे.

निज स्वरूपाची प्राप्ती झाल्यानंतर खरी प्रतिक्रमणे होतात. प्रतिक्रमण करणारा हवा आणि प्रतिक्रमण करविणारा पण हवा.

आपले प्रतिक्रमण म्हणजे काय? रहाट उघडल्यावर दोरखंडाचे जेवढे तुकडे झाले असतील त्यांना जोडून स्वच्छ करणे हेच आपले प्रतिक्रमण!

प्रश्नकर्ता : झोपेतून उठताच लगेच प्रतिक्रमण सुरू होते.

दादाश्री : म्हणजे हा प्रतिक्रमण आत्मा झाला. शुद्धात्मा तर आहेच पण हा प्रतिष्ठित आत्मा तो आता प्रतिक्रमण आत्मा होऊन गेला. लोकांना कषायी आत्मा आहे. जगात असे कोणीच नाही की जे एक सुद्धा प्रतिक्रमण करू शकतील.

जसजसे नगद प्रतिक्रमण होऊ लागते तसतसे सगळे स्वच्छ होऊ लागते. अतिक्रमण होताच आपण नगद प्रतिक्रमण करतो त्यामुळे मन आणि वाणी शुद्ध होऊ लागतात.

प्रतिक्रमण म्हणजे 'बी' भाजून पेरणे.

आलोचना, प्रतिक्रमण आणि प्रत्याख्यान म्हणजे रोजचा ताळेबंद (हिशोब) काढणे.

जितके दोष दिसले तितकी कमाई झाली. तितकी प्रतिक्रमणे करावीत.

प्रश्नकर्ता : प्रतिक्रमण होऊ शकत नाही हा प्राकृतिक दोष आहे की अंतराय कर्म आहे?

दादाश्री : हा प्राकृतिक दोष आहे. आणि तो प्रत्येक वेळी होत नाही. काही वेळा दोष होतो आणि काही वेळा होत नाही. प्राकृतिक दोषांच्या बाबतीत प्रतिक्रमण होत नसेल तर हरकत नाही. आपण फक्त एवढेच पाहायचे की आपले भाव काय आहेत? दुसरे काहीच पाहण्याची गरज नाही. तुमची प्रतिक्रमण करण्याची इच्छा आहे ना?

प्रश्नकर्ता : हो, अगदी पूर्णपणे.

दादाश्री : असे असूनही प्रतिक्रमणे होऊ शकत नसतील तर तो प्रकृतीदोष आहे. प्रकृती दोषाला तुम्ही जबाबदार नाही. प्रकृती कधी कधी बोलते आणि कधी कधी बोलत नाही. ती बाजासारखी आहे. वाजेल तर वाजेल, नाही तर नाही पण वाजणार! याला अंतराय म्हणत नाहीत.

प्रश्नकर्ता : समभावाने निकाल करण्याचा दृढ निश्चय असूनही खूप वेळा वाद उभे राहतात, ते कशामुळे?

दादाश्री : किती बाबतीत असे होते? शंभरएक ठिकाणी?

प्रश्नकर्ता : नाही, एका ठिकाणीच असे होत असते.

दादाश्री : तर मग ते निकाचित कर्म आहे. ते निकाचित कर्म कसे धुता येईल? तर आलोचना, प्रतिक्रमण आणि प्रत्याख्यान यांनी. त्यामुळे कर्मबंधन सैल होते. त्यानंतर 'ज्ञाता-द्रष्टा' पदात राहू शकता. मात्र त्यासाठी निरंतर प्रतिक्रमण करावे लागेल. जितक्या 'फोर्स' ने कर्म निकाचित झाले असेल, तितक्याच 'फोर्सने' प्रतिक्रमण केले तर ते धुतले जाईल.

प्रश्नकर्ता : आम्ही जर ठाम ठरवले की भविष्यात असे करायचे नाही, पुन्हा अशी चूक करायचीच नाही. 100 टक्के असा भाव ठेवला, तरी पण अशी चूक होऊ शकते का? ते आपल्या हातात आहे का?

दादाश्री : चूक तर पुन्हा पुन्हा होते. तुम्ही आता इथे एक चेंडू आणला आणि माझ्या हातात दिला, मी तो इथून फेकला. मी तर एकच काम केले, एकदाच तो चेंडू फेकला. म्हणून जर मी म्हटले की आता माझी इच्छा नाही. (चेंडू) तू थांब तर तो थांबेल का?

प्रश्नकर्ता : नाही.

दादाश्री : मग काय होईल?

प्रश्नकर्ता : तो चार-पाच वेळा उड्या मारीलच.

दादाश्री : म्हणजे आपल्या हातातून सुटले आणि निसर्गाच्या हातात गेले. मग निसर्ग जेव्हा थांबवेल तेव्हा ते थांबेल, म्हणजे हे सर्व असे आहे. आपल्या ज्या चुका आहेत, त्या मग निसर्गाच्या हातात जातात.

प्रश्नकर्ता : जर निसर्गाच्या हातात जात असतील तर मग प्रतिक्रमण करून कसा फायदा होतो?

दादाश्री : खूप फायदा होतो. प्रतिक्रमणामुळे समोरच्या व्यक्तीवर खूप परिणाम होतो, इतका परिणाम होतो की जर आपण त्या व्यक्तीसाठी एक तास प्रतिक्रमण केले तर त्या व्यक्तीमध्ये एक नव्याच प्रकारचा बदल होतो. खूप मोठा बदल होतो. मात्र प्रतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीने हे ज्ञान घेतलेले असले पाहिजे. शुद्ध झालेल्या, 'मी शुद्धात्मा आहे' याचे भान असलेल्या व्यक्तीच्या प्रतिक्रमणाचा खूप परिणाम होतो. प्रतिक्रमण तर आपले सर्वात मोठे शस्त्र आहे!

'ज्ञान' घेतलेले नसेल तर प्रकृतीचे दिवसभर उलटेच चालू असते आणि आता तर सर्व सुरळीत चालते. तुम्ही समोरच्याला सुनावता, पण आतमध्ये म्हणता, 'नाही, नाही, असे करता कामा नये. सुनावण्याचा विचार आला त्यासाठी प्रतिक्रमण करा.' आणि ज्ञान घेण्यापूर्वी तर तुम्ही चार गोष्टी सुनावतही होता आणि वर असेही म्हणत की अजून थोडे सुनवायला हवे.

मनुष्याचा स्वभाव असा आहे की जशी प्रकृती तसा तो बनतो. जेव्हा प्रकृती सुधारत नाही तेव्हा तो म्हणतो, 'सोड आता ही झंझट', अरे, प्रकृती सुधारत नाही तर काही हरकत नाही, तू आपल्या आतमध्ये सुधारणा कर ना! मग आपली 'रिस्पोन्सिबिलिटी' (जबाबदारी) राहत नाही! असे हे 'सायन्स' आहे! बाहेर काहीही होवो, त्याची 'रिस्पोन्सिबिलिटी' नाही. एवढे समजून जाल तर उलगडा होईल.

22. चिकट फाइलींचा निकाल

पुष्कळ जण मला म्हणतात, 'दादा, समभावाने निकाल करण्याचा प्रयत्न करतो, पण तसे होतच नाही!' अशांना मी म्हणतो, 'अरे बाबा, समभावाने निकाल करायचा आहे असे नाही! तुला समभावाने निकाल करण्याचा भावच बाळगायचा आहे. समभावाने निकाल होईल की नाही हे तुझ्या आधीन नाही. तू फक्त माझी आज्ञा पाळ ना! त्यामुळे तुझी बहुतेक सर्व कामे होऊन जातील, आणि जर झाली नाही तर ते निसर्गाच्या आधीन आहे.'

जेव्हा (दुसऱ्यांचे) दोष दिसणे बंद होते, तेव्हा संसार सुटतो. आपल्याला कोणी शिव्या दिल्या, कोणी नुकसान केले, मारले तरी त्याचा दोष दिसत नाही, तेव्हा संसार सुटतो. नाही तर संसार सुटत नाही.

दुसऱ्यांचे दोष दिसणे आता बंद झाले आहे का?

प्रश्नकर्ता : हो दादा. कधी तरी दोष दिसले तर मी लगेच प्रतिक्रमण करतो.

दादाश्री : मार्ग हा आहे की 'दादांच्या आज्ञेत राहायचे आहे', असा निश्चय करून दुसऱ्या दिवसापासून सुरू करा. आणि जिथे जिथे आज्ञेत राहता आले नसेल त्यासाठी प्रतिक्रमण करा. समभावाने निकाल करून घरातील प्रत्येक सदस्याला संतुष्ट करा. तरी पण जर घरातील लोक आरडाओरडा करत असतील (असंतुष्ट असतील) तर ते तुम्ही पाहत राहा. तुमचा मागील हिशोब आहे. म्हणून ते असंतुष्ट आहेत.

आणि हा निश्चय तर तुम्ही आजच केला आहे. अत: घरच्या सर्व लोकांना प्रेमाने जिंका. मग तुमचे तुम्हालाच कळेल की आता सर्व ठीक चालले आहे. तरी पण जेव्हा घरातील लोक स्वत: असे म्हणतील, तेव्हाच मानता येईल. शेवटी तर घरातील लोक त्याच बाजूने असतात.

प्रश्नकर्ता : आम्ही जे प्रतिक्रमण करतो, त्या प्रतिक्रमणाच्या परिणामामागे हाच मूळ सिद्धांत आहे ना, की आपण समोरच्या व्यक्तीच्या शुद्धात्म्याला पाहतो आणि म्हणून त्याच्याबद्दल आपले जे वाईट भाव आहेत ते कमी होतात?

दादाश्री : आपले वाईट भाव संपतात. हे सर्व आपल्यासाठीच आहे. समोरच्याशी काही देणेघेणे नाही. समोरच्याला शुद्धात्मा स्वरूपात पाहण्यामागे हाच हेतू आहे की आपण शुद्ध दशेत, जागृत दशेत आहोत.

प्रश्नकर्ता : मग त्याच्या मनात आपल्याबद्दल जे वाईट भाव आहेत ते कमी होतात ना?

दादाश्री : नाही, कमी होत नाहीत. तुम्ही प्रतिक्रमणे केलीत तर होतात. नुसते 'शुद्धात्मा' पाहून होत नाहीत तर प्रतिक्रमण केलीत तर होतात.

प्रश्नकर्ता : आम्ही प्रतिक्रमण करतो तेव्हा समोरच्याच्या आत्म्यावर त्याचा परिणाम होतो का?

दादाश्री : होतो ना, परिणाम होतो. (शुद्धात्मा) पाहूनसुद्धा फायदा होतो, पण लगेच होत नाही. मग हळूहळू होतो! कारण शुद्धात्म्याच्या रूपात कोणी पाहिलेलेच नाही. केवळ चांगली व्यक्ती किंवा वाईट व्यक्ती अशा प्रकारेच पाहिले आहे.

जर वाघासाठी प्रतिक्रमण केले तर वाघ पण आपल्या म्हणण्यानुसार काम करील. वाघात आणि माणसात काहीच फरक नाही. फरक तुमच्या स्पंदनांचा आहे. त्या स्पंदनांचा त्याच्यावर परिणाम होतो. जोपर्यंत तुमच्या मनात 'वाघ हिंसक आहे' हा भाव राहील तोपर्यंत तो हिंसकच राहील.

आणि जर तुमच्या मनात 'वाघ हा शुद्धात्मा आहे' असा भाव राहील, तर तो शुद्धात्माच आहे आणि तो अहिंसक होईल. सर्व काही घडू शकते.

एकदा जर आंब्यांच्या झाडावर माकडे आली आणि त्यांनी आंबे तोडले तर आपले परिणाम कुठपर्यंत बिघडतात? असे वाटते की त्यापेक्षा तर आंब्याचे झाड कापून टाकलेलेच बरे. इतके टोकाला आपण पोहोचतो. तर आता भगवंतांच्या साक्षीने निघालेली ही वाणी कधी वाया जाईल का? म्हणजे हे सर्व असे आहे. जर परिणाम बिघडले नाहीत तर मग काहीच होत नाही. सगळे शांत होते, बंद होते. हे सर्व आपलेच परिणाम आहेत. तुम्ही आजपासून कोणाबद्दल स्पंदन करणे, कोणाबद्दल किंचितही विचार करणे बंद करा. जर कोणाबद्दल विचार आले तर लगेच प्रतिक्रमण करून धुऊन टाका, म्हणजे पूर्ण दिवस कोणाच्याही स्पंदनाशिवाय गेला! अशा प्रकारे दिवस गेला तरी खूप झाले, हाच पुरुषार्थ आहे.

हे ज्ञान मिळाल्यावर नवीन पर्याय अशुद्ध होत नाहीत, जुन्या पर्यायांना मात्र शुद्ध करावे, आणि समता राखावी. समता म्हणजे वीतरागता. नवीन पर्याय बिघडणार नाहीत, नवीन पर्याय शुद्धच राहतील. जुने पर्याय अशुद्ध होतात, त्यांचे शुद्धीकरण करावे. आमच्या आज्ञेत राहिल्यामुळे जुन्या पर्यायांचे शुद्धीकरण होते, आणि समतेत राहावे.

प्रश्नकर्ता : दादाजी, ज्ञान घेण्यापूर्वी या जन्माचे जे पर्याय बांधले गेले आहेत, त्यांचे निराकरण कसे करावे?

दादाश्री : जोपर्यंत तुम्ही जिवंत आहात तोपर्यंत पश्चात्ताप करून त्यांना धुऊन टाकावे. परंतु त्यातील थोडेच धुतले जातील, पूर्णपणे निराकरण होणार नाही. पण सैल तर निश्चितच होतील. सैल झाली म्हणजे पुढच्या जन्मी जरा असा हात लावल्याबरोबर लगेच गाठ सुटेल!

प्रश्नकर्ता : दादाजी, आपले ज्ञान मिळण्यापूर्वी जर नरकाची कर्मबंधने झाली असतील तर नरकात जावे लागेल ना?

दादाश्री : हे ज्ञानच असे आहे की सर्व पापे भस्मीभूत होतात,

कर्मबंधने संपतात. नरकात जाण्यायोग्य व्यक्तींनी पण जिवंत असतानाच सर्व प्रतिक्रमणे करून घेतली तर त्यांची कर्मे धुतली जातील. पोस्टात पत्र टाकण्यापूर्वी जर तुम्ही असे लिहिले की वरचे वाक्य लिहिताना जरा माझे डोके ठिकाणावर नव्हते, तर त्याचा परिणाम होत नाही.

प्रश्नकर्ता : प्रायश्चित्त केल्यामुळे कर्मबंध सुटतात का?

दादाश्री : हो, सुटतात. काही ठराविक प्रकारचे कर्मबंध असे आहेत की त्या कर्मांचे प्रायश्चित्त केल्याने त्याच्या घट्ट गाठी सैल होतात. आपल्या प्रतिक्रमणात खूप शक्ती आहे. दादांना हजर ठेवून केलेत तर तुमचे काम होऊन जाईल.

कर्मांच्या धक्क्यांमुळे जितके जन्म व्हायचे असतील तितके होतील, कदाचित एक-दोन जन्म, पण त्यानंतर मात्र सीमंधर स्वामींपाशीच जावे लागेल. इथे पूर्वीचा जो हिशोब बांधला गेला आहे, थोडा चिकट (गाढ) झालेला हिशोब, तो आता संपून जाईल. त्याला तर गत्यंतरच नाही ना! हा तर रघा सोनाराचा तराजू (धर्मकाटा) आहे. न्याय, जबरदस्त न्याय, चोख न्याय, शुद्ध न्याय, प्युअर न्याय! त्यात पोलंपोल चालतच नाही.

प्रश्नकर्ता : प्रतिक्रमण केल्यामुळे कर्मांचे धक्के कमी होतात का?

दादाश्री : हो कमी होतात ना! लवकर सुटका होते.

प्रश्नकर्ता : एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झालेला आहे, अशा व्यक्तीकडून क्षमा मागायची असेल तर ती कशी मागता येईल?

दादाश्री : त्याचा मृत्यू झाला असेल, परंतु जर त्याचा फोटो तुमच्याजवळ असेल, त्याचा चेहरा आठवत असेल तर करू शकता. चेहरा आठवत नसेल, पण नाव माहीत असेल तर नाव घेऊन सुद्धा करू शकता, तरी देखील ते त्याच्यापर्यंत पोहोचेल.

23. मन शोक करते तेव्हा..

महात्म्यांना भाव-अभाव होतात, पण ती सर्व निकाली कर्मे

आहेत. भावकर्मे नाहीत. क्रोध-मान-माया-लोभ-राग-द्वेष आणि भाव-अभाव, ही सर्व निकाली कर्मे आहेत. त्यांचा समभावाने निकाल करायचा आहे. या कर्मांचा निकाल प्रतिक्रमणामुळे होईल. असाच निकाल होणार नाही.

प्रश्नकर्ता : जेव्हा कोणी आमचा अपमान करतो, तेव्हा कदाचित वाणीने प्रतिकार होत नसेलही, पण मनाने तर प्रतिकार चालूच असतो.

दादाश्री : त्या वेळी काय घडते त्याची हरकत नाही. अरे, शरीराने ही प्रतिकार झाला तरी हरकत नाही. कारण जितकी शक्ती असेल त्यानुसार व्यवहार होत असतो. ज्याच्यात संपूर्ण शक्ती उत्पन्न झालेली असते, त्याच्या मनाचा प्रतिकारसुद्धा बंद होऊन जातो. तरी आम्ही काय म्हणतो? जर मनाने प्रतिकार झाला, वाणीने प्रतिकार झाला आणि शरीरानेसुद्धा प्रतिकार झाला तर अशावेळी तिन्ही प्रकारचा कमकुवतपणा उत्पन्न होतो. म्हणून तेव्हा तिन्ही प्रकारचे प्रतिक्रमण करावे लागेल.

प्रश्नकर्ता : विचारांचे प्रतिक्रमण केले पाहिजे का?

दादाश्री : नाही, विचारांना पाहावे. त्यासाठी प्रतिक्रमणे करायची नसतात. जर कोणाबद्दल खूपच वाईट विचार आले, तर त्यासाठी मात्र प्रतिक्रमण करायला हवे. म्हणजे जेव्हा कोणाचे नुकसान करण्याचे विचार आले तरच करावे. असे सहज विचार आले, गायीचे, म्हशीचे वगैरे सर्व विचार आले तर ते आपल्या ज्ञानाने संपून जातील. ज्ञानपूर्वक पाहिले तर संपून जातील. त्या विचारांना फक्त पाहावे, त्यासाठी प्रतिक्रमणे करायची नसतात. परंतु जर तुमचा बाण कोणाला लागला असेल (कोणाला दु:ख झाले असेल) तरच प्रतिक्रमण करावे.

तुम्ही इथे सत्संगाला येता आणि इथे जर काही लोक असे उभे असतील, तेव्हा जर तुमच्या मनात असा विचार आला की हे सगळे इथे का उभे आहेत? म्हणजेच जर तुमचे मनोभाव बिघडले तर त्या चुकीसाठी ताबडतोब प्रतिक्रमण करायला हवे.

प्रश्नकर्ता : प्रतिक्रमणे कर्मफळाची करायची आहेत की सूक्ष्माची?

दादाश्री : सूक्ष्माची करायची आहेत.

प्रश्नकर्ता : विचारांची की भावांची?

दादाश्री : भावांची. विचारांच्या मागे भाव असतातच. अतिक्रमण झाले तर प्रतिक्रमण केलेच पाहिजे. मनात वाईट विचार आला, या ताईंबद्दल वाईट विचार आला तर लगेच 'विचार चांगला असायला हवा' असे म्हणून तो विचार बदलला पाहिजे. मनात विचार आला की हा नालायक आहे, तर लगेच असा विचार का आला? त्याची लायकी-नालायकी पाहण्याचा अधिकार तुम्हाला नाही. सरसकट म्हणायचे असेल तर 'सगळे चांगले आहेत' असे म्हणावे. 'चांगले आहेत' असे म्हटले की मग कर्म दोष लागत नाही, मात्र नालायक आहे असे म्हटले तर त्याला अतिक्रमण म्हणावे लागेल, आणि त्यासाठी निश्चितच प्रतिक्रमण करावे लागेल.

जेव्हा नावडत्या गोष्टी स्वच्छ मनाने सहन करू शकाल, तेव्हा वीतराग व्हाल.

प्रश्नकर्ता : स्वच्छ मन म्हणजे काय?

दादाश्री : स्वच्छ मन म्हणजे समोरच्या व्यक्तीबद्दल वाईट विचार न येणे. म्हणजे काय? तर निमित्तालाच दोषी मानून त्याच्याबरोबर भांडण करायला न जाणे. आणि समजा त्याच्याबद्दल जरा वाईट विचार आला तरी लगेच प्रतिक्रमण करून दोष धुऊन टाकणे.

प्रश्नकर्ता : मन स्वच्छ होणे ही तर अगदी शेवटच्या पायरीची गोष्ट झाली ना? आणि जोपर्यंत मन पूर्णपणे स्वच्छ होत नाही तोपर्यंत सतत प्रतिक्रमण करत राहावे लागेल ना?

दादाश्री : हो. हे बरोबर आहे, पण मन काही बाबतीत स्वच्छ झालेले असते आणि काही बाबतीत स्वच्छ झालेले नसते, या साऱ्या पायऱ्या आहेत. ज्या बाबतीत स्वच्छ झालेले नसेल, अशा बाबतीत प्रतिक्रमण करावे लागते.

तुम्हाला शुद्धात्म्याचे वहीखाते स्वच्छ ठेवायचे आहे. म्हणून रात्री चंदुभाईला सांगावे की (दिवसभर) ज्यांचे ज्यांचे दोष पाहिले त्यांच्याबरोबरचे वहीखाते स्वच्छ करून टाका. मनातील भाव बिघडले तरी प्रतिक्रमणाने सर्व शुद्ध होऊन जाईल. दुसरा कोणताच उपाय नाही. इन्कमटॅक्सवाला पण दोषी वाटणार नाही, असे प्रतिक्रमण केल्यानंतरच रात्री झोपावे. संपूर्ण जगाला निर्दोष पाहून मगच चंदुभाईला झोपी जायला सांगावे.

प्रश्नकर्ता : प्रतिक्रमण समोरासमोर व्हायला हवे ना?

दादाश्री : नंतर प्रतिक्रमण झाले तरी हरकत नाही.

प्रश्नकर्ता : मी तुमची अवहेलना केली असेल, अशातना केली असेल, तर मला प्रत्यक्ष तुमच्या समोर येऊन प्रतिक्रमण केले पाहिजे ना?

दादाश्री : समोर येऊन केलेत तर चांगलीच गोष्ट आहे. पण जर ते शक्य झाले नाही, आणि नंतर केले तरी पण तेवढेच फळ मिळेल.

आम्ही त्यांना काय म्हणालो, 'तुमच्या मनात दादांच्याबद्दल वाईट विचार येतात म्हणून तुम्ही त्याचे प्रतिक्रमण करत राहा.' कारण त्यात त्या बिचाऱ्याचा काय दोष? स्वभावच विराधक आहे. आजकाल सगळ्यांचाच स्वभाव विराधक असतो. दूषमकाळात विराधक जीवच असतात. आराधक जीव सर्व निघून गेले. आणि हे जे उरले आहेत, त्यात पण सुधारणा होऊ शकतील असे बरेच जीव आहेत, अजूनही यात खूप उत्तम आत्मे आहेत!

आमच्याबद्दल वाईट विचार आला तर प्रतिक्रमण करा. मन तर 'ज्ञानी पुरुषां'चे देखील मूळ उपटू शकते. मन काय करू शकत नाही? पोळलेले मन समोरच्याला पण पोळून काढते. पोळलेले मन तर महावीर भगवंतांना पण पोळून काढते.

प्रश्नकर्ता : 'जे (मोक्षाला) निघून गेले ते तर कुणाचे भले करू

शकत नाहीत.' (असे बोलले) तर महावीरांबद्दल केलेला अवर्णवाद त्यांच्यापर्यंत पोहोचतो का?

दादाश्री : नाही, ते स्वीकारत नाहीत. म्हणून रिटर्न विद थॅन्कस्, दुप्पट होऊन परत येईल. म्हणून स्वत:च स्वत:साठी वारंवार माफी मागत राहावी. जोपर्यंत तुम्हाला तुमचे शब्द आठवत राहतील तोपर्यंत माफी मागत राहा. महावीरांचा अवर्णवाद केला असेल तर वारंवार माफी मागत राहा, तर लगेच (दोष) मिटून जाईल. सोडलेला बाण त्यांच्यापर्यंत पोहोचतो पण ते त्याचा स्वीकार करत नाहीत.

24. जीवनप्रवाहात बुडणाऱ्यांना तारते हे ज्ञान

प्रश्नकर्ता : आठवण करून मागचे दोष पाहता येतात का?

दादाश्री : खरे म्हणजे मागील दोष उपयोगानेच पाहिले जाऊ शकतात, आठवण करून पाहता येत नाहीत. आठवण करण्यासाठी तर डोके खाजवावे लागते. आवरण आलेले असते म्हणून तर मुद्दाम आठवावे लागते ना! या मगनभाईशी तुमचे भांडण झाले तर मगनभाईचे प्रतिक्रमण करताना मगनभाई लगेच हजर होतील. फक्त तसा 'उपयोग'च ठेवायचा आहे. आपल्या मार्गात आठवण करणे हा प्रकारच नाही. आठवण करणे हे तर मेमरी (स्मृती)च्या आधीन आहे. जे काही आठवते ते प्रतिक्रमण करविण्यासाठी, स्वच्छ करविण्यासाठी.

'या जगातील कोणतीही विनाशी वस्तू मला नको आहे' असे तुम्ही ठरविले आहे ना? तरी पण आठवण का येते? म्हणून प्रतिक्रमण करा. प्रतिक्रमण केल्यावरही परत आठवण झाली तर समजावे की तक्रार अजून चालूच आहे! म्हणून त्यासाठी पुन्हा प्रतिक्रमण करावे.

राग-द्वेष यामुळे आठवण येते. जर आठवण आली नसती, तर पडलेली गाठ आपण विसरून गेलो असतो. तुम्हाला कोणा फॉरीनच्या (परदेशी) लोकांची आठवण येत नाही पण मृत व्यक्तींची आठवण का येते? हा हिशोब आहे आणि तो राग-द्वेषामुळे आहे. त्यासाठी प्रतिक्रमण केले तर आसक्ती संपून जाईल. इच्छा होतात याचे कारण

प्रत्याख्यान केले नाहीत. आणि आठवणी येतात त्याचे कारण प्रतिक्रमणे केली नाहीत.

प्रश्नकर्ता : प्रतिक्रमण तर मालकीभावाचे करायचे असतात ना?

दादाश्री : मालकीभावाचे प्रत्याख्यान करावे आणि दोषांसाठी प्रतिक्रमण करावे.

प्रश्नकर्ता : प्रतिक्रमण करून सुद्धा तो गुन्हा पुन्हा पुन्हा आठवत राहिला तर त्याचा अर्थ असा आहे का की अजून आम्ही त्यातून मुक्त झालेलो नाही.

दादाश्री : कांद्याची एक पाकळी निघाली तर दुसरी आपोआपच पुढे येते. याचप्रमाणे या गुन्ह्यांचेही खूप थर असतात. म्हणजे एकदा प्रतिक्रमण केलेत तर एक थर दूर होईल असे करत करत शंभर प्रतिक्रमणे केलीत तर तो संपूर्ण नष्ट होईल. काही दोष पाच प्रतिक्रमणे केल्यावर नष्ट होतात. काही दहा प्रतिक्रमणे केल्यावर आणि काही शंभर केल्यावर नष्ट होतात. ज्याचे जितके थर असतील तितकी प्रतिक्रमणे होतील. खूप जास्त वेळा प्रतिक्रमणे करावी लागत असतील तर याचा अर्थ गुन्हा पण तेवढा मोठा आहे.

प्रश्नकर्ता : आठवण येते त्याचे प्रतिक्रमण करायला हवे आणि इच्छा झाली तर त्याचे प्रत्याख्यान करायला हवे. हे जरा समजवा ना.

दादाश्री : आठवण येते म्हणजे समजावे की ह्या इथे जरा जास्त चिकटपणा आहे. तर अशा वेळी वारंवार प्रतिक्रमण करत राहिल्याने सर्व सुटून जाईल.

प्रश्नकर्ता : जितक्या वेळा आठवण येईल, तितक्या वेळा प्रतिक्रमण करायला हवे का?

दादाश्री : हो, तितक्या वेळा करायला हवे. तुम्ही करण्याचे भाव ठेवा. असे आहे की आठवण येण्यासाठी वेळ तर हवा ना! तर यासाठी वेळ मिळेल. रात्री आठवणी येत नाहीत का?

प्रश्नकर्ता : ते तर काही संयोग असतील तर.

दादाश्री : हो, संयोगांमुळेच.

प्रश्नकर्ता : आणि इच्छा असतील तर?

दादाश्री : इच्छा होणे, म्हणजे स्थूल वृत्ती होणे. पूर्वी आपण जे भाव केले होते, ते भाव आता पुन्हा उत्पन्न होतात तर अशा वेळी प्रत्याख्यान करायला हवे.

प्रश्नकर्ता : दादा त्या वेळी तुम्ही म्हटले होते की, 'आता ही वस्तू मला नको आहे' असे प्रत्येक वेळी म्हणावे.

दादाश्री : ही वस्तू माझी नाही, मी ती समर्पित करत आहे. अज्ञानतेमुळे मी या सर्वांना बोलावले होते पण आज या माझ्या नाहीत. म्हणजेच मी मन-वचन-कायेने हे सर्व समर्पित करीत आहे. आता मला काहीच नको आहे. अज्ञानदशेत मी या सुखाला बोलावले होते पण आज हे सुख माझे नाही. म्हणून ते मन-वचन-कायेने समर्पित करीत आहे.

या अक्रम विज्ञानाचा हेतूच शूट ऑन साइट (पाहताक्षणीच संपविणे) प्रतिक्रमणाचा आहे. याच पायावर हे विज्ञान उभे आहे. चूक कोणाचीच होत नाही. तुमच्या निमित्ताने जर समोरच्या व्यक्तीचे नुकसान झाले तर द्रव्यकर्म-भावकर्म-नोकर्म यापासून मुक्त अशा त्याच्या शुद्धात्म्याला आठवून प्रतिक्रमण करावे.

प्रश्नकर्ता : पण प्रत्येक वेळी इतके सारे बोलायला हवे का?

दादाश्री : नाही, असे काही नाही. शॉर्ट (थोडक्यात) करू शकता. समोरच्याच्या शुद्धात्म्याला हजर करून त्याला फोन लावावा की 'अशी चूक झाली आहे, मला क्षमा करा.'

दुसरी गोष्ट, म्हणजे घरच्या लोकांसाठी रोज प्रतिक्रमण करायला हवे. तुमची आई, वडील, भाऊ, बहीण, कुटुंबीय सर्वांचे रोजच प्रतिक्रमण करायला हवे. कारण त्या तुमच्या खूप चिकट फाइल्स आहेत.

जर एक तास कुटुंबीयांसाठी प्रतिक्रमण कराल, तुमच्या कुटुंबातील सर्वांना आठवून जवळच्यांपासून ते दूरचे सर्व भाऊ, त्यांच्या पत्नी, काका, काकांची मुले, वगैरे सर्व, एक कुटुंब असेल, तर दोन-चार पिढ्यांपर्यंतच्या सर्वांना आठवून प्रत्येकासाठी जर एक एक तास प्रतिक्रमण कराल ना, तर आतील भयंकर पापे जळून भस्मीभूत होतील, आणि त्या लोकांची मने तुमच्याबद्दल साफ होऊन जातील. म्हणून आपल्या जवळच्यांना, सर्वांनाच आठवून आठवून प्रतिक्रमण करायला हवे. आणि जर रात्री झोप येत नसेल तर या प्रकारे सेट करून ठेवले तर ते चालू होईल. अशी सेटिंग तुम्ही करता की नाही? अशी ही व्यवस्था, ही फिल्म सुरू झाली तर त्यावेळी खूप आनंद वाटेल. तो आनंद कशातच सामावणार नाही!

कारण आपण जेव्हा प्रतिक्रमण करत असतो ना, तेव्हा आत्म्याचा संपूर्ण शुद्ध उपयोग असतो. म्हणून मध्ये कोणाचाच हस्तक्षेप नसतो.

प्रतिक्रमण कोण करतो? चंदुभाई करतात. कोणाचे प्रतिक्रमण करतात? तर नातेवाईकांना आठवून आठवून प्रतिक्रमण करतात. आत्मा पाहणारा आहे, तो फक्त पाहत राहतो. आणि इतर कसलाही हस्तक्षेप नसल्यामुळे खूप शुद्ध उपयोग राहतो.

प्रतिक्रमण पूर्वी एकदा करविले होते, माझ्या उपस्थितीतच केले होते, मी स्वतःच करवून घेतले होते. पुष्कळ वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. 'विषयविकार' संबंधीचेच प्रतिक्रमण करविले होते. ते करता करता सर्व इतके खोल उतरत गेले की नंतर घरी गेल्यावरही त्यांचे प्रतिक्रमण बंद होत नव्हते. झोपताना बंद होत नव्हते, खातानाही बंद होत नव्हते, मग नंतर मला ते बंद करावे लागले!!! सगळे त्यात इतके अडकले होते की त्यांचे प्रतिक्रमण झोपेतही बंद होईना. आणि खाता-पिताना पण बंद होईना! निरंतर प्रतिक्रमण, रात्रं-दिवस आपोआपच चालू होते. प्रतिक्रमण केल्यावर 'बंद करा, आता दोन तास झाले', असे म्हणून देखील ते प्रतिक्रमण चालूच राहत होते. बंद करायला सांगूनही ते बंद होत नव्हते. कारण मशिनरी सगळी सुरू झाली होती. आतमध्ये ते चालूच राहत होते.

'तुम्हाला' चंदुभाईला इतके सांगावे लागेल की प्रतिक्रमण करत राहा. तुमच्या घरातील लोकांना तुमच्याकडून पूर्वी काही ना काही दुःख झाले असेल, त्यासाठी तुम्ही प्रतिक्रमण करा. संख्यात किंवा असंख्यात जन्मात राग-द्वेष, विषय, कषाय यामुळे जे दोष झाले असतील त्यासाठी क्षमा मागतो. अशा तऱ्हेने घरच्या एक-एक व्यक्तीचे रोजच प्रतिक्रमण करा. नंतर उपयोगपूर्वक आसपासच्या, शेजारी-पाजारी यांच्यासाठी, सर्वांसाठी उपयोग ठेवून हेच करत राहायला हवे. तुम्ही असे केल्यानंतर हा बोजा हलका होत जाईल. असाच हलका होणार नाही. आम्ही संपूर्ण जगाशी अशा प्रकारे निवारण केले होते. प्रथम असे निवारण केले म्हणून तर सुटका झाली. जोपर्यंत तुमच्या मनात आमचा दोष आहे तोपर्यंत तो आम्हाला चैन पडू देणार नाही! म्हणून आम्ही जेव्हा अशा प्रकारे प्रतिक्रमण करतो तेव्हा तुमच्यातील दोष पण मिटतो.

प्रतिक्रमण तर तुम्हाला खूप करायला हवे. तुमच्या सर्कलमध्ये जी पन्नास-शंभर माणसे असतील, ज्यांना ज्यांना तुम्ही दुखावले असेल, त्या सगळ्यांसाठी सवड मिळाल्यावर एक-एक तास एकेकाला आठवून आठवून प्रतिक्रमण करा. जेवढ्यांना दुखावले आहेत त्यांच्या बाबतीत सर्व धुवावे तर लागेलच ना? त्यानंतरच ज्ञान प्रकट होईल.

मग हा जन्म, मागील जन्म, मागील संख्यात जन्म, मागील असंख्यात जन्म, पूर्वीचे अनंत जन्म, या सर्व जन्मात दिगंबर धर्माची, साधूंची, आचार्यांची जी काही अशातना, विराधना केली किंवा करविली असेल तर त्याबद्दल मी दादा भगवान यांच्या साक्षीने क्षमा मागतो. माझ्याकडून किंचितही अपराध होऊ नये यासाठी शक्ती द्या. अशा प्रकारे सर्व धर्मांसाठी प्रतिक्रमण करावे.

अहो, अज्ञान दशेत आमचा अहंकार खूप भारी होता. 'हा असा, तो तसा' म्हणजे तिरस्कार, तिरस्कार, तिरस्कार, तिरस्कार... आणि काहींची प्रशंसाही करत असे. एकाची प्रशंसा आणि दुसऱ्याचा तिरस्कार करत असे. मग जेव्हा 1958 साली ज्ञानप्राप्ती झाली तेव्हापासून या 'ए.एम.पटेल'ला सांगितले की हे जे सगळे तिरस्कार केले आहेत, ते

सर्व आता साबण लावून धुऊन टाका. सगळ्यांना शोधून-शोधून सर्व दोष धुऊन टाकले. या बाजूचे शेजारी, त्या बाजूचे शेजारी, इकडचे नातेवाईक, मामा, काका, अरे, सगळ्यांचाच तिरस्कार केला गेलेला असतो! ते सर्व (तिरस्कार) धुऊन टाकले.

प्रश्नकर्ता : ही सर्व प्रतिक्रमणे मनाने केली? समोर जाऊन नाही?

दादाश्री : मी अंबालाल पटेलला सांगितले की तुम्ही जे सर्व चुकीचे केले आहे, ते सर्व मला दिसत आहे. आता तरी ते सर्व धुऊन टाका! मग त्यांनी काय करायला सुरुवात केली? कसे धुवायचे? तेव्हा मी समजावून सांगितले की त्याला आठवा. मगनभाईला तुम्ही शिव्या दिल्या आहेत, आयुष्यभर रागराग केला आहे, तिरस्कार केला आहे, त्या सगळ्यांचे वर्णन करून असे म्हणा, 'मगनभाईचे मन-वचन-काया यांचे योग, भावकर्म-द्रव्यकर्म-नोकर्म, यापासून भिन्न असे हे प्रकट शुद्धात्मा भगवान! मी या मगनभाईची वारंवार माफी मागत आहे. दादा भगवान यांच्या साक्षीने माफी मागत आहे. पुन्हा अशा चुका करणार नाही.' तुम्ही असे प्रतिक्रमण केल्यावर तुम्हाला समोरच्या व्यक्तीच्या चेहऱ्यात फरक दिसेल. त्याचा चेहरा बदललेला दिसेल. तुम्ही इथे प्रतिक्रमण करता आणि तिथे फरक पडतो.

आम्ही कितीतरी धुतले, तेव्हा कुठे आमचे वहीखाते स्वच्छ झाले. आम्ही खूप काळापासून धूत आलो होतो, तेव्हा कुठे वहीखाते स्वच्छ झाले! आणि तुम्हाला तर मी मार्ग दाखविला आहे, म्हणून तुम्ही लवकर सुटाल. आम्ही तर बऱ्याच काळापासून स्वतःच धूत होतो.

तुम्ही फक्त प्रतिक्रमण करावे. म्हणजे तुम्ही जबाबदारीतून मोकळे व्हाल. सुरुवातीला सर्व लोक माझ्यावर 'ॲटॅक (हल्ला) करीत असत ना? मागाहून सगळे थकले. जर आपणही त्यांच्यावर ॲटॅक केला तर समोरचे थकणार नाहीत. हे जग कुणालाही मोक्षाला जाऊ देईल असे नाही. असे बुद्धीवाले हे जग आहे. यात सावध राहिलो, सलोख्याने राहिलो तर मोक्ष मिळेल.

हे प्रतिक्रमण करून तर पाहा! मग तुमच्या घरातील सर्व माणसांमध्ये बदल होईल. जादूसारखा बदल! जादूसारखा परिणाम!

जोपर्यंत समोरच्याचा दोष आपल्या मनात आहे, तोपर्यंत तो आपल्याला चैन पडू देत नाही. जेव्हा आपण प्रतिक्रमण करतो, तेव्हा सर्व पुसले जाते. 'राग-द्वेष' असलेल्या प्रत्येक चिकट 'फाइलला' 'उपयोग' ठेवून, प्रतिक्रमण करून स्वच्छ करावे. रागाच्या (आसक्तीच्या) फाइलचे तर निश्चितच प्रतिक्रमण करायला हवे.

तुम्ही गादीवर झोपले असाल, आणि तुम्हाला तिथे खडे टोचत असतील तर तुम्ही ते खडे काढून टाकाल की नाही? हे प्रतिक्रमण पण जिथे जिथे टोचत असते तिथेच करायचे आहे. तुम्हाला जिथे टोचत असेल तिथून तुम्ही काढून टाका आणि त्यांना जिथे टोचते, तिथून ते काढतील! प्रत्येक व्यक्तीची प्रतिक्रमणे वेगवेगळी असतात.

कोणाच्याही बाबतीत अतिक्रमण झाले असेल तर दिवसभर त्यासाठी प्रतिक्रमण करावे लागते, तेव्हाच सुटू शकतो. जर दोघांनी समोरासमोर प्रतिक्रमण केले तर दोघेही लवकर सुटू शकतात. पाच हजार वेळा तुम्ही प्रतिक्रमण करा आणि पाच हजार वेळा ते प्रतिक्रमण करतील तर लवकर संपुष्टात येईल. परंतु जर समोरचा प्रतिक्रमण करत नसेल, आणि तुम्हाला मात्र सुटायचे असेल तर तुम्हाला दहा हजार वेळा प्रतिक्रमण करावे लागते.

प्रश्नकर्ता : जेव्हा असे काही राहून जाते, तेव्हा मनात सारखे वाटत राहते की हे राहिले आहे, राहिले आहे.

दादाश्री : त्यासाठी ओझे वाटू देऊ नये. नंतर एखाद्या दिवशी बसून सर्व प्रतिक्रमणे एकदम करून घ्यावी. ज्यांची ज्यांची करायची असतील, ओळखीच्या लोकांची, ज्यांच्याबरोबर जास्त अतिक्रमण होत असते त्यांची नावे घेऊन तासभर जरी प्रतिक्रमण केले तरी हे सर्व संपून जाईल. पण आपण असे ओझे शिल्लक ठेवू नये.

ह्या अपूर्व गोष्टी आहेत, पूर्वी कधीच ऐकलेल्या नसतील,

वाचलेल्या नसतील, जाणल्या नसतील, अशा अपूर्व गोष्टी जाणण्यासाठी ही मेहनत आहे.

आम्ही येथे प्रतिक्रमण करवून घेण्यासाठी बसवतो, तर तेव्हा काय होते? आत दोन तास प्रतिक्रमण करवितो ना, की लहानपणापासून ते आजपर्यंत जे जे दोष झाले आहेत, ते सगळे आठवून आठवून प्रतिक्रमण करा, समोरच्या व्यक्तीच्या शुद्धात्म्याला पाहून प्रतिक्रमण करा. तेव्हा तो लहान वयात जेव्हापासून समज येऊ लागते तेव्हापासूनच्या दोषांसाठी प्रतिक्रमणांची सुरुवात करतो ती अगदी आजपर्यंतच्या दोषांसाठी प्रतिक्रमणे करतो. जेव्हा असे प्रतिक्रमण करतो तेव्हा त्याला प्रथम मोठे मोठे दोष आठवतात. नंतर पुन्हा प्रतिक्रमण करतो तेव्हा छोटे छोटे दोष दिसतात. त्यानंतर पुन्हा प्रतिक्रमण करतो तेव्हा त्याहून छोटे छोटे दोष पण आठवू लागतात. असे करत करत तो सर्व दोष संपवून टाकतो.

दोन तासाच्या प्रतिक्रमणात आयुष्यातील सर्व मागील दोष धुऊन काढावे. आणि पुन्हा कधीही असे दोष करणार नाही असा निश्चय करावा, म्हणजे प्रत्याख्यान झाले.

जेव्हा तुम्ही असे प्रतिक्रमण करायला बसता ना, तेव्हा एकीकडे अमृताचे थेंब टपटपतात आणि तुम्हाला हलके वाटू लागते. भाऊ, तुम्ही करता ना प्रतिक्रमण? हलके झाले असे वाटते का? तुमची प्रतिक्रमणे जोरात चालू आहेत ना? सगळे शोधून शोधून प्रतिक्रमणे करा. शोधून काढण्याच्या मागे लागा. मग ते सगळे आठवू पण लागेल. तो रस्तासुद्धा दिसेल. आठव्या वर्षी कोणाला लाथ मारली होती ते पण आठवेल. तो रस्ताही दिसेल, ती लाथही दिसेल. हे सर्व कसे आठवले? असेच आठवायला बसलो तर काहीच आठवणार नाही, पण प्रतिक्रमण करायला बसलो की सगळे क्रमवार आठवते. तुम्ही कधी आयुष्यभराचे प्रतिक्रमण केले होते का?

प्रश्नकर्ता : हो, केले होते.

दादाश्री : प्रतिक्रमण केल्यावर जेव्हा मूळ चूक लक्षात येईल

ना, तेव्हा खूप आनंद होईल. जर आनंद वाटत नसेल, तर त्याचा अर्थ प्रतिक्रमण नीट करता आले नाही. अतिक्रमण केल्यावर जर (स्वत:ला) दु:ख होत नसेल, तर तो माणूस, माणूसच राहिला नाही.

प्रश्नकर्ता : मूळ चूक कोणती, दादा?

दादाश्री : पूर्वी तर चूकच दिसत नव्हती ना! आता दिसतात, पण त्या स्थूल दिसतात. या पुढे अजून दिसतील.

प्रश्नकर्ता : सूक्ष्म, सूक्ष्मतर...

दादाश्री : चुका दिसू लागतील.

जेव्हा तुम्ही पूर्ण आयुष्याचे प्रतिक्रमण करता तेव्हा तुम्ही मोक्षातही नसतात आणि संसारातही नसतात. तसे तर प्रतिक्रमण करते वेळी तुम्ही मागील सर्व दोषांचे विवरण करत असता. तेव्हा मन-बुद्धी-चित्त आणि अहंकार या सगळ्यांचे फोन-बिन सर्व बंद असतात. अंत:करण बंद असते. त्यावेळी फक्त प्रज्ञेचेच काम चालू असते. आत्मा पण यात काहीच करत नाही. दोष झाला तर परत तो झाकला जातो. नंतर पुन्हा दुसरा थर येतो. याप्रकारे थरावर थर येत जातात. मग मृत्यूच्या वेळी शेवटच्या एका तासात या सगळ्यांचा सारांश येतो.

भूतकाळातील सर्व दोष वर्तमानात दिसतात, तो ज्ञानप्रकाश आहे. ती मेमरी (स्मृती) नाही.

प्रश्नकर्ता : प्रतिक्रमणाने आत्म्यावर काही इफेक्ट (परिणाम) होतो का?

दादाश्री : आत्म्याला तर कोणताच इफेक्ट स्पर्श करू शकत नाही. जर तसे झाले तर त्याला संज्ञी म्हणावे लागेल. आत्मा आहे हे तर 100 टक्के निश्चितच आहे. जिथे स्मृती पोहोचत नाही, तिथे आत्म्याच्या प्रभावाने सर्व होत असते. आत्मा अनंत शक्तीवाला आहे. त्याची प्रज्ञाशक्ती 'पाताळ' फोडून दाखवीत असते. या प्रतिक्रमणामुळे तर 'स्वत:'ला समजते की आता हलके वाटत आहे, आणि सर्व वैर

संपून जाते, नियमानुसारच संपून जाते. आणि प्रतिक्रमण करण्यासाठी समोरची व्यक्ती हजर नसली तरी हरकत नाही. यात समक्ष सह्या करण्याची गरज नाही. जशी कोर्टात समक्ष सह्यांची गरज असते तशी इथे नसते. कारण हे गुन्हे कोणाच्या हजेरीत झालेले नाहीत. हे गुन्हे तर लोकांच्या गैरहजेरीत झालेले आहेत. तसे तर लोकांच्या हजेरीत झाले आहेत पण हजेरीत सह्या केलेल्या नाहीत. सह्या आतील राग-द्वेषांच्या आहेत.

एखाद्या दिवशी एकांतात बसलेले असता आणि प्रतिक्रमण किंवा असे काही करता-करता-करता आत्म्याचा थोडा अनुभव येतो, त्याचा स्वाद येतो, त्याला अनुभव म्हणतात.

जेव्हा घरातील माणसे निर्दोष दिसू लागतील, तेव्हा समजा की तुमचे प्रतिक्रमण खरे आहे. प्रत्यक्षात तर ते निर्दोषच आहेत, पूर्ण जगच निर्दोष आहे. तुम्ही तुमच्या दोषांमुळे बांधले गेलेला आहात. त्यांच्या दोषांमुळे नाही. तुमच्या स्वत:च्या दोषांमुळेच बांधलेले आहात. आता, असे जेव्हा समजेल, तेव्हा सुटका होईल!

प्रश्नकर्ता : निश्चयात तर खात्री आहे की सर्व जग निर्दोष आहे

दादाश्री : याला प्रतीतीत आले आहे असे म्हणता येईल. अनुभवात किती आले? ही गोष्ट एवढी सोपी नाही. जेव्हा ढेकणांनी घेरलेले असेल, मच्छरांनी घेरलेले असेल, सापांनी घेरलेले असेल, त्यावेळी निर्दोष दिसले तरच खरे. पण तुमच्या प्रतीतीत तरी ते निर्दोष आहेत असे राहिले पाहिजे. तुम्हाला दोषी दिसतात, ती तुमची चूक आहे. त्यासाठी प्रतिक्रमण केले पाहिजे. आमच्या प्रतीतीत पण निर्दोष आहे आणि आमच्या वर्तनात पण निर्दोष आहे. तुला तर अजून प्रतीतीत पण निर्दोष आहे असे आलेले नाही. तुला अजून ते दोषी वाटतात. कोणी काही केले तर नंतर तू त्यासाठी प्रतिक्रमण करतोस, म्हणजेच सुरुवातीला तर दोषी वाटतात ना?

प्रश्नकर्ता : शुद्ध उपयोग असेल तर अतिक्रमण होऊ शकते का?

दादाश्री : होऊ शकते, अतिक्रमणही होऊ शकते आणि प्रतिक्रमणही होऊ शकते.

तुम्हाला जर कधी असे वाटले की आपण उपयोग सोडून चुकीच्या रस्त्याने चाललो आहोत. तर तेव्हा तुम्हाला उपयोग चुकल्याबद्दलचे प्रतिक्रमण करावे लागेल. चुकीचा रस्ता म्हणजे वेस्ट ऑफ टाइम ॲन्ड एनर्जी (वेळ आणि शक्ती यांचा अपव्यय). तरी पण त्यासाठी प्रतिक्रमण केले नाही तरी चालेल. त्यात फार नुकसान नाही. एक जन्म अजून शिल्लक आहे म्हणून 'लेट गो' केले (चालवून घेतले) आहे. पण ज्यांना अधिक उपयोगपूर्वक राहायचे आहे, त्यांना उपयोग चुकल्यासाठी प्रतिक्रमण करणे आवश्यक आहे. प्रतिक्रमण म्हणजे परत येणे. कधी परत आलेलाच नाही ना!

आम्ही इतर कुठेही असा विधी करत नाही. औरंगाबादला आम्ही असा विधी करतो की अनंत जन्मांचे दोष धुतले जातात. एक तासाच्या प्रतिक्रमण विधीत तर सर्वांचा अहंकार भस्मीभूत होऊन जातो! आम्ही तिथे औरंगाबादला वर्षातून एकदा प्रतिक्रमण करवून घेत असतो, तेव्हा दोन-तीनशे माणसे अक्षरशः रडतात पण त्यांचे सगळे रोग निघून जातात. कारण तिथे नवरा आपल्या बायकोच्या पाया पडून माफी मागतो. कितीतरी जन्मांचे हे बंधन, माफी मागितल्यावर किती स्वच्छ होऊन जाते!

तिथे आम्हाला दर वर्षी खूप मोठा विधी करावा लागतो. सर्वांची मने शुद्ध करण्यासाठी, आत्मा (व्यवहार आत्मा) शुद्ध करण्यासाठी. खूप मोठा विधी करतो जेणेकरून सर्वांची मने स्वच्छ होतात, कम्प्लीट क्लिअर. त्याला स्वतःलाच पत्ता नसतो की मी काय लिहित आहे, पण सर्व काही स्पष्ट लिहून आणतात. मग सर्व 'क्लिअर' होऊन जाते. कारण अभेदभाव उत्पन्न झाला ना! एका मिनिटासाठी माझ्याकडे सोपवले ना की 'साहेब, मी असा आहे', म्हणजे अभेदभाव उत्पन्न झाला. तेवढी त्याची शक्ती वाढली.

आणि मग मला तुझे दोष समजल्यावर त्या दोषांसाठी मी विधी

करतो. हे कलियुग आहे. कलियुगात कोणता दोष होत नसेल? कोणाचे दोष पाहाणे हीच चूक आहे. कलियुगात कोणाचे दोष पाहणे ही स्वत:ची चूक आहे. कोणाचेच दोष पाहायचे नाहीत. कोणते गुण आहेत ते पाहणे आवश्यक आहे. त्याच्याजवळ काय शिल्लक आहे? किती पुंजी शिल्लक आहे, तेच पाहण्याची गरज आहे, या काळात लोकांकडे पुंजीच नसते ना? ज्यांच्याकडे पुंजी शिल्लक आहे ते महात्माच पुढे आहेत ना!

जे आता आपल्याबरोबर आहेत, पूर्वीही होते आणि आजही आहेत, त्यांना आपले धर्मबंधू म्हणतात आणि आपल्या धर्मबंधूशीच अनेक जन्मांचे वैर बांधले गेलेले असते. जर असे काही वैर बांधले गेले असेल तर एकमेकांनी समोरासमोर प्रतिक्रमण करून घ्या, तर सर्व हिशोब संपून जाईल. एकाही व्यक्तीला विसरू नका, सगळ्यांबरोबर समोरासमोर प्रतिक्रमण करा. सहाध्यायींबरोबरच जास्त वैर असते, आणि त्यांचे समोरासमोर प्रतिक्रमण केल्याने ते धुतले जाते. औरंगाबादला जे प्रतिक्रमण आम्ही करवून घेतो तसे प्रतिक्रमण तर जगात कुठेच होत नाही.

प्रश्नकर्ता : तिथे सगळे रडत होते ना? मोठे-मोठे शेठ पण रडत होते.

दादाश्री : हो, औरंगाबादचेच पाहा ना! सगळे किती रडत होते? असे प्रतिक्रमण पूर्ण आयुष्यात एकदा जरी केले असेल तरी पुष्कळ झाले.

प्रश्नकर्ता : मोठ्या माणसांना रडायला जागा आहे तरी कुठे? अशा ठिकाणीच फक्त असू शकते.

दादाश्री : हो, खरे आहे. तिथे तर सर्वच जण खूप रडले होते.

प्रश्नकर्ता : मी तर असे प्रथमच पाहिले, समाजात ज्यांना प्रतिष्ठित व्यक्ती म्हटले जाते अशा व्यक्ती तिथे उघडउघड रडत होत्या!

दादाश्री : हो, अगदी उघडउघड रडत होत्या आणि स्वत:च्या बायकोच्या पाया पडून माफी मागत होत्या. तुम्ही औरंगाबादला आला होता ना, तिथे तुम्ही पाहिले नव्हते का?

प्रश्नकर्ता : होय. तसे दृश्य अन्य कोणत्याही ठिकाणी पाहिले नाही!

प्रश्नकर्ता : हो, आणि इतर कुठेच असे दृश्य पाहिले नव्हते!

दादाश्री : असे होऊच शकत नाही ना! असे अक्रम विज्ञान नसते, असे प्रतिक्रमण नसते, असे काहीच नसते.

प्रश्नकर्ता : असे 'दादाजी' पण नसतात!

दादाश्री : हो, असे 'दादाजी' पण नसतात.

माणसांनी खरी आलोचना केलीच नाही. हीच गोष्ट मोक्षाला जाण्याचा रस्ता अडवते. गुन्हा झाला तरी हरकत नाही. खरी आलोचना झाली की मग काहीच हरकत नाही. आलोचना अशा विलक्षण पुरुषांसमोरच केली पाहिजे. स्वतःच्या दोषांची अशी आलोचना आयुष्यात कधी केली आहे का? कोणासमक्ष आलोचना करणार? आणि आलोचना केल्याशिवाय गत्यंतरच नाही. जोपर्यंत तुम्ही आलोचना करत नाही तोपर्यंत तुम्हाला माफ कोण करविणार? ज्ञानी पुरुष हवे ते करू शकतात. कारण ते कर्ता नसतात. जर ते कर्ता असते तर त्यांना पण कर्मबंधन झाले असते, पण ते कर्ता नाहीत म्हणून हवे ते करू शकतात.

तिथे तुम्हाला गुरुंसमोर आलोचना करावी लागते. पण अंतिम गुरु हे 'दादा भगवान' आहेत. आम्ही तर तुम्हाला मार्ग दाखविला आहे. आता अंतिम गुरु पण दाखवून दिले आहेत. ते तुम्हाला उत्तरे देत राहतील, आणि म्हणून तर ते 'दादा भगवान' आहेत. जोपर्यंत ते तुमच्यात प्रत्यक्ष प्रकट होत नाहीत तोपर्यंत तुम्हाला 'या' दादा भगवानांची भजना करावी लागेल. ते प्रकट झाल्यावर होता होता आपोआपच ते मशीन सुरू होईल. मग तो स्वतःच 'दादा भगवान' होईल.

ज्ञानी पुरुषांसमोर (दोष) झाकून ठेवले म्हणजे संपलेच समजा. लोक उघड करून सांगण्यासाठीच तर प्रतिक्रमण करतात. तो भाऊ सगळे काही घेऊन आला होता ना? ज्ञानींसमोर तर उलट सगळे उघड

करून सांगायला हवे. तिथेच जर झाकून ठेवलेत (लपवलेत) तर काय होणार? झाकल्यामुळे दोष दुप्पट होतात.

पत्नीशी जेवढी ओळख आहे तेवढी ओळख प्रतिक्रमणाशी व्हायला हवी. जसे पत्नीला विसरू शकत नाही तसेच प्रतिक्रमण पण विसरता कामा नये. दिवसभर माफी मागतच राहिले पाहिजे. माफी मागायची सवयच लागली पाहिजे. मात्र इथे तर दुसऱ्यांचे दोष पाहायची सवय लागली आहे.

ज्यांच्या बाबतीत खूप जास्त अतिक्रमण झाले असेल त्यांच्यासाठी तर प्रतिक्रमणाचा यज्ञच केला पाहिजे. अतिक्रमण खूप केले पण प्रतिक्रमण केलेले नाही. म्हणून हे सर्व आहे.

प्रतिक्रमण हा तर आमचा सूक्ष्मातिसूक्ष्म शोध आहे. जर हा शोध समजून घेतला तर कोणाचेच कोणाशी भांडण राहणार नाही.

प्रश्नकर्ता : दोषांची यादी तर खूप मोठी होत जाते.

दादाश्री : यादी खूप मोठी झाली, म्हणजे समजा एका व्यक्तीबरोबर शंभर प्रकारचे दोष झाले आहेत, तर त्याचे असे सामूहिक प्रतिक्रमण करावे की या सर्व दोषांबद्दल मी तुमची माफी मागत आहे.

प्रश्नकर्ता : आता हे आयुष्याचे नाटक लवकर संपेल तर बरे, असे वाटते.

दादाश्री : असे का म्हणता?

प्रश्नकर्ता : दादा, तुम्ही वीस दिवस इथे होता, पण मी एकाही ठिकाणी येऊ शकले नाही.

दादाश्री : म्हणून काय देह संपवून टाकायचा का?

दादाश्री : या देहाचे तर एवढे सारे उपकार आहेत की त्यासाठी कोणताही औषधोपचार करावा लागला तरी करा. या देहानेच आपल्याला 'दादा भगवान' यांची ओळख झाली. यापूर्वी अनंत देह गमावले, सगळे वाया गेले. या देहाच्या माध्यमातून (ज्ञानींची) ओळख झाली, म्हणून

हा देह मित्रासमान झाला आहे. तर आता ह्या देहाला सांभाळत राहायला हवे. म्हणून आज प्रतिक्रमण करा की 'हा देह लवकर संपेल तर बरे, असे म्हटले त्याबद्दल मी माफी मागते.'

25. प्रतिक्रमणाची सैद्धांतिक समज

प्रश्नकर्ता : तन्मयाकार होतो म्हणून जागृतीपूर्वक पूर्णपणे निकाल होत नाही. आता तन्मयाकार झाल्यानंतर समजते, तर मग त्यासाठी प्रतिक्रमण करून निकाल करायचा काही मार्ग आहे का?

दादाश्री : प्रतिक्रमण केल्यामुळे (कर्मे) हलकी होऊन जातील. पुढच्या वेळी हलकी होऊन येतील आणि जर प्रतिक्रमण केले नाही तर जसेच्या तसे ओझे परत येईल. किंबहुना परत सटकेल, चार्ज न होता, म्हणजेच प्रतिक्रमण करून (कर्मे) हलकी करत राहिल्याने त्याचा निकाल होत राहील.

प्रश्नकर्ता : अतिक्रमण न्यूट्रल आहे असे तुम्ही म्हणता, मग प्रतिक्रमण करण्यासारखे राहिलेच काय?

दादाश्री : अतिक्रमण न्यूट्रलच आहे, पण त्यात तो तन्मयाकार होतो. म्हणून (कर्म) बीज पडते. अतिक्रमणात जर तन्मयाकार झाला नाही तर बीज पडणार नाही. अतिक्रमण काहीच करू शकत नाही. आणि प्रतिक्रमण तर आपण तन्मयाकार झालो नाही तरीही 'करतो'. चंदुभाई तन्मयाकार झाला हे पण तुम्ही जाणता आणि झाला नाही ते पण तुम्ही जाणता. तुम्ही तर तन्मयाकार होतच नाही. 'मन-बुद्धी-चित्त-अहंकार' हे तन्मयाकार होतात, ते तुम्ही जाणता.

प्रश्नकर्ता : चंदुभाई तन्मयाकार झाला तर चंदुभाईला प्रतिक्रमण करायला सांगावे लागेल ना?

दादाश्री : हो, चंदुभाईला सांगावे लागेल.

प्रश्नकर्ता : स्वप्नात प्रतिक्रमणे होऊ शकतात?

दादाश्री : हो, खूप चांगल्या प्रकारे होऊ शकतात. स्वप्नात जी

प्रतिक्रमणे होतात, ती आता होतात त्याहीपेक्षा चांगली होतात. आता तर तुम्ही घाईघाईत करता. स्वप्नात जे काम होते ते सर्व पद्धतीशीर होते. स्वप्नात जे 'दादा' दिसतात तसे 'दादा' तर पूर्वी कधीही पाहिले नसतील असे 'दादा' दिसतात. जागृत अवस्थेत असे दादा कोणालाही दिसत नाहीत, स्वप्नात खूप चांगले दिसतात. कारण स्वप्न ही सहज अवस्था आहे. आणि जागृत अवस्था ही असहज अवस्था आहे.

क्रमिकमार्गमध्ये आत्मा प्राप्त झाल्यानंतर प्रतिक्रमण (करायचे) नसतात. प्रतिक्रमण विष मानले जाते. आपल्या येथे पण प्रतिक्रमण नसतात. आपण प्रतिक्रमण चंदुभाईच्याकडून करवून घेत असतो. कारण की हे तर अक्रम, येथे तर सगळाच माल भरलेला आहे.

आपण समोरच्याच्या कोणत्या आत्म्याबद्दल बोलत आहोत? आपण कोणाचे प्रतिक्रमण करतो हे तुम्हाला माहीत आहे का? प्रतिष्ठित आत्म्याचे (प्रतिक्रमण) करत नाही, तर त्याच्या मूळ शुद्धात्म्याचे प्रतिक्रमण करतो. त्याच्या शुद्धात्म्याच्या उपस्थितीत, त्याच्याबरोबर जो दोष घडला त्यासाठी आपण प्रतिक्रमण करतो. म्हणजे आपण त्याच्या शुद्धात्म्याची क्षमा मागतो. त्याच्या प्रतिष्ठित आत्म्याशी आपले काहीच देणेघेणे नाही.

प्रतिक्रमण पण अहंकारानेच करायचे. पण सावध कोण करते? प्रज्ञा करते. प्रज्ञा म्हणते, 'अतिक्रमण का केलेत? तर मग आता प्रतिक्रमण करा.'

सूक्ष्माहून सूक्ष्म दोषसुद्धा आमच्या दृष्टीबाहेर जात नाहीत. सूक्ष्माहून सूक्ष्म, अति-अति सूक्ष्म दोषसुद्धा आम्हाला लगेच कळतात. तुमच्यापैकी कोणालाच हे कळणार नाही की माझ्याकडून हा दोष झाला. कारण हे दोष स्थूल नसतात.

प्रश्नकर्ता : तुम्हाला आमचे दोष पण दिसतात का?

दादाश्री : सगळे दोष दिसतात, पण आमची दृष्टी दोषांकडे नसते. आम्हाला लगेच कळते पण आमची दृष्टी तुमच्या शुद्धात्म्याकडे

असते, तुमच्या उदयकर्मांकडे नसते. सगळ्यांचे दोष आम्हाला समजतात. दोष दिसतात पण आमच्यावर त्याचा परिणाम होत नाही.

आमच्याकडे शिक्षेला योग्य अशा व्यक्तींना पण माफी मिळते आणि ती पण अगदी सहज! समोरच्याला माफी मागायची गरज पडत नाही. जिथे सहज माफ केले जाते, तिथे ते लोक शुद्ध होऊन जातात आणि जिथे 'साहेब, माफ करा.' असे म्हटले जाते, तिथे उलट ते मळके होतात. जिथे सहज माफी असेल तिथे तर खूप शुद्धी होऊन जाते.

जोपर्यंत आमच्यात सहजपणा आहे तोपर्यंत आम्हाला प्रतिक्रमणे करावी लागत नाहीत. सहजतेत तुम्हालाही प्रतिक्रमण करावे लागत नाही. सहजतेत फरक पडला तर प्रतिक्रमण करावे लागते. तुम्ही जेव्हाही आम्हाला पाहाल तेव्हा सहजतेतच पाहाल, जेव्हाही पाहाल तेव्हा त्याच स्वभावात पाहाल. आमच्या सहजतेत फरक पडत नाही.

आम्ही तुम्हाला पाच आज्ञा देतो. जर या पाच आज्ञा पाळाल तर मोक्षाला जाल, आणि सहावे काय सांगितले आहे? तर जर अतिक्रमण झाले तर प्रतिक्रमण करा. आज्ञा पालन करण्याचे विसरलात तर प्रतिक्रमण करा. माणूस आहे चूक तर होणार पण विसरलात त्यासाठी प्रतिक्रमण करा, की 'हे दादा भगवान, हे दोन तास मी तुमची आज्ञा विसरलो पण मला तर आज्ञा पाळायच्याच आहेत. मला माफ करा.' मग मागचे सगळे पास. शंभरापैकी शंभर मार्क्स!

हे 'अक्रम विज्ञान' आहे. विज्ञान म्हणजेच त्वरित फळ देणारे आहे. जिथे कर्तापण नसते त्याला 'विज्ञान' म्हणतात आणि जिथे कर्तापण असते त्याला 'ज्ञान' म्हणतात.

विचारशील व्यक्ती असेल तर त्याला वाटेल की अरे, आपण तर काहीच केले नाही, आणि हे आहे तरी काय? ही अक्रम विज्ञानाची बलिहारी आहे! 'अक्रम', क्रम-बिम काही नाही.

जय सच्चिदानंद

नमस्कार विधी

- प्रत्यक्ष 'दादा भगवान' यांच्या साक्षीने, वर्तमानात महाविदेह क्षेत्रात विचरत असणारे तीर्थंकर भगवान श्री सीमंधर स्वामींना अत्यंत भक्तीपूर्वक नमस्कार करीत आहे. (40)
- प्रत्यक्ष 'दादा भगवान'यांच्या साक्षीने, वर्तमानात महाविदेह क्षेत्रात तसेच अन्य क्षेत्रात विचरत असणारे ॐ परमेष्टी भगवंतांना अत्यंत भक्तीपूर्वक नमस्कार करीत आहे. (5)
- प्रत्यक्ष 'दादा भगवान' यांच्या साक्षीने, वर्तमानात महाविदेह क्षेत्रात तसेच अन्य क्षेत्रात विचरत असणारे पंच परमेष्टी भगवंतांना अत्यंत भक्तीपूर्वक नमस्कार करीत आहे. (5)
- प्रत्यक्ष 'दादा भगवान' यांच्या साक्षीने, वर्तमानात महाविदेह क्षेत्रात तसेच अन्य क्षेत्रात विहरमान तीर्थंकर साहेबांना अत्यंत भक्तीपूर्वक नमस्कार करीत आहे. (5)
- वीतराग शासन देवी-देवतांना अत्यंत भक्तीपूर्वक नमस्कार करीत आहे. (5)
- निष्पक्षपाती शासन देवी-देवतांना अत्यंत भक्तीपूर्वक नमस्कार करीत आहे. (5)
- चोवीस तीर्थंकर भगवंतांना अत्यंत भक्तीपूर्वक नमस्कार करीत आहे. (5)
- श्रीकृष्ण भगवंतांना अत्यंत भक्तीपूर्वक नमस्कार करीत आहे.(5)
- भरतक्षेत्रात सध्या विचरत असणारे सर्वज्ञ श्री दादा भगवानांना निश्चयाने अत्यंत भक्तीपूर्वक नमस्कार करीत आहे. (5)
- दादा भगवानांच्या सर्व समकितधारी महात्म्यांना अत्यंत भक्तीपूर्वक नमस्कार करीत आहे. (5)
- संपूर्ण ब्रह्मांडातील जीवमात्रांच्या रियल स्वरूपाला अत्यंत भक्तीपूर्वक नमस्कार करीत आहे. (5)

- रियल स्वरूप हे भगवत् स्वरूप आहे, म्हणून संपूर्ण जगाचे भगवत् स्वरूपात दर्शन करीत आहे. (5)
- रियल स्वरूप हे शुद्धात्मा स्वरूप आहे, म्हणून संपूर्ण जगाचे शुद्धात्मा स्वरूपात दर्शन करीत आहे. (5)
- रियल स्वरूप हे तत्व स्वरूप आहे, म्हणून संपूर्ण जगाचे तत्वज्ञानाने दर्शन करीत आहे. (5)

(वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामींना परम पूज्य श्री दादा भगवानांच्या माध्यमातून प्रत्यक्ष नमस्कार पोहोचतात. कंसात लिहिलेल्या संख्येनुसार तेवढ्या वेळा दररोज बोलावे.)

नऊ कलमे

1. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याचा किंचितमात्रही अहम् दुभावणार (दुखावणार) नाही, दुभवविला जाणार नाही किंवा दुभविण्याप्रती अनुमोदन दिले जाणार नाही, अशी परम शक्ती द्या.

   मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याचा किंचितमात्रही अहम् दुभावणार नाही अशी स्याद्वाद वाणी, स्याद्वाद वर्तन आणि स्याद्वाद मनन करण्याची परम शक्ती द्या.

2. हे दादा भगवान! मला, कोणत्याही धर्माचे किंचितमात्रही प्रमाण दुभावणार नाही, दुभवविले जाणार नाही किंवा दुभविण्याप्रती अनुमोदन दिले जाणार नाही, अशी परम शक्ती द्या.

   मला, कोणत्याही धर्माचे किंचितमात्रही प्रमाण दुभावले जाणार नाही, अशी स्याद्वाद वाणी, स्याद्वाद वर्तन आणि स्याद्वाद मनन करण्याची परम शक्ती द्या.

3. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी उपदेशक, साधू, साध्वी किंवा आचार्य, यांचा अवर्णवाद, अपराध, अविनय न करण्याची परम शक्ती द्या.

4. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याप्रती

किंचितमात्रही अभाव, तिरस्कार कधीही केला जाणार नाही, करविला जाणार नाही किंवा कर्त्याप्रती अनुमोदन दिले जाणार नाही, अशी परम शक्ती द्या.

5. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याशी कधीही कठोर भाषा, तंतीली (टोचणारी) भाषा न बोलण्याची, न बोलवविण्याची किंवा बोलण्याप्रती अनुमोदन न देण्याची परम शक्ती द्या.

   कोणी कठोर भाषा, तंतीली भाषा बोलले तरी मला मृदु-ऋजु भाषा बोलण्याची परम शक्ती द्या.

6. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याप्रती, स्त्री-पुरुष किंवा नपुंसक, कोणताही लिंगधारी असो, तर त्यांच्या संबंधी किंचितमात्र पण विषयविकार संबंधी दोष, इच्छा, चेष्टा-चाळे किंवा विचार संबंधी दोष न करण्याची, न करविण्याची किंवा कर्त्याप्रती अनुमोदन न देण्याची परम शक्ती द्या.

   मला निरंतर निर्विकार राहण्याची परम शक्ती द्या.

7. हे दादा भगवान! मला, कोणत्याही रसात लुब्ध न होण्याची शक्ती द्या. समरसी आहार घेण्याची परम शक्ती द्या.

8. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याचा प्रत्यक्ष किंवा परोक्ष, जिवंत किंवा मृत्यू पावलेल्या, कोणाचाही किंचितमात्रही अवर्णवाद, अपराध, अविनय केला जाणार नाही, करविला जाणार नाही किंवा कर्त्याप्रती अनुमोदन दिले जाणार नाही, अशी परम शक्ती द्या.

9. हे दादा भगवान! मला जगत् कल्याण करण्याचे निमित्त बनण्याची परम शक्ती द्या, शक्ती द्या, शक्ती द्या.

(एवढेच तुम्ही 'दादा भगवान' यांच्याजवळ मागायचे. ही दररोज यंत्रवत् वाचण्याची वस्तू नाही, हृदयात ठेवण्याची वस्तू आहे. ही दररोज उपयोगपूर्वक भावना करण्याची वस्तू आहे. एवढ्या पाठात सर्व शास्त्रांचे सार येऊन जाते.)

दादा भगवान फाउन्डेशनची प्रकाशित मराठी पुस्तके

1. भोगतो त्याची चूक
2. एडजस्ट एवरीव्हेर
3. जे घडले तोच न्याय
4. संघर्ष टाळा
5. मी कोण आहे ?
6. क्रोध
7. चिंता
8. प्रतिक्रमण (सं, ग्रंथ)
10. भावना सुधारे जन्मोजन्म
11. कर्माचे विज्ञान
12. पाप-पुण्य
13. आई-वडील आणि मुलांचा व्यवहार (सं)
14. पति-पत्नीचा दिव्य व्यवहार (सं)
15. समजपूर्वक प्राप्त ब्रह्मचर्य (सं)
16. मानव धर्म
17. मृत्युवेळी, आधी आणि नंतर
18. सेवा-परोपकार
19. दान
20. त्रिमंत्र
21. वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी
22. चमत्कार
23. सत्य-असत्याचे रहस्य
24. वाणी, व्यवहारात (सं)
25. पैशांचा व्यवहार (सं)
26. क्लेश रहित जीवन
27. निजदोष दर्शनाने... निर्दोष!
28. प्रेम
29. गुरू-शिष्य
30. अहिंसा
31. आप्तवाणी - 1 ते 5
36. आत्मसाक्षात्कार
37. जगत् कर्ता कोण ?
38. कर्माचा सिद्धांत

हिन्दी

1. आत्मसाक्षात्कार
2. ज्ञानी पुरुष की पहचान
3. सर्व दु:खों से मुक्ति
4. कर्म का सिद्धांत
5. आत्मबोध
6. मैं कौन हूँ ?
7. पाप-पुण्य
8. भुगते उसी की भूल
9. एडजस्ट एवरीव्हेयर
10. टकराव टालिए
11. हुआ सो न्याय
12. चिंता
13. क्रोध
14. प्रतिक्रमण (सं, ग्रं)
16. दादा भगवान कौन ?
17. पैसों का व्यवहार (सं, ग्रं)
19. अंत:करण का स्वरूप
20. जगत कर्ता कौन ?
21. त्रिमंत्र
22. भावना से सुधरे जन्मोंजन्म
23. चमत्कार
24. प्रेम
25. समझ से प्राप्त ब्रह्मचर्य (सं, पू, उ)
28. दान
29. मानव धर्म
30. सेवा-परोपकार
31. मृत्यु समय, पहले और पश्चात्
32. निजदोष दर्शन से... निर्दोष
33. पति-पत्नी का दिव्य व्यवहार (सं)
34. क्लेश रहित जीवन
35. गुरु-शिष्य
36. अहिंसा
37. सत्य-असत्य के रहस्य
38. वर्तमान तीर्थकर श्री सीमंधर स्वामी
39. माता-पिता और बच्चों का व्यवहार (सं)
40. वाणी, व्यवहार में... (सं)
41. कर्म का विज्ञान
42. सहजता
43. आप्तवाणी - 1 से 9
52. आप्तवाणी - 13 (पूर्वार्ध व उत्तरार्ध)
54. आप्तवाणी - 14 (भाग-1 से 3)
56. ज्ञानी पुरुष (भाग-1)

(सं - संक्षिप्त, ग्रं - ग्रंथ, पू - पूर्वार्ध, उ - उत्तरार्ध)

★ दादा भगवान फाउन्डेशनद्वारे गुजराती आणि इंग्रजी भाषेत सुद्धा बरीच पुस्तके प्रकाशित झाली आहेत. वेबसाइट www.dadabhagwan.org वर सुद्धा आपण ही सगळी पुस्तके प्राप्त करू शकता.

★ प्रत्येक महिन्यात हिन्दी, गुजराती आणि इंग्रजी भाषेत दादावाणी मेगेझीन प्रकाशित होत आहे.

संपर्क सूत्र

दादा भगवान परिवार

अडालज : **त्रिमंदिर**, सीमंधर सिटी, अहमदाबाद-कलोल हाईवे,
पोस्ट : अडालज, जि.-गांधीनगर, गुजरात - 382421
फोन : +91 79 3500 2100, +91 9328661166/77
E-mail : info@dadabhagwan.org

मुंबई : **त्रिमंदिर,** ऋषिवन, काजुपाडा, बोरिवली (E)
फोन : 9323528901

दिल्ली	9810098564	**बेंगलूर**	9590979099
कोलकता	9830093230	**हैदराबाद**	9885058771
चेन्नई	7200740000	**पूणे**	7218473468
जयपुर	8890357990	**जलंधर**	9814063043
भोपाल	6354602399	**चंडीगढ**	9780732237
इन्दौर	6354602400	**कानपुर**	9452525981
रायपुर	9329644433	**सांगली**	9423870798
पटना	7352723132	**भुवनेश्वर**	8763073111
अमरावती	9422915064	**वाराणसी**	9795228541

U.S.A. : **DBVI Tel. :** +1 877-505-DADA (3232),
Email : info@us.dadabhagwan.org

U.K. : +44 330-111-DADA (3232)

Kenya : +254 759-92-DADA (3232)

UAE : +971 557316937

Dubai : +971 501364530

Australia : +61 402179706

New Zealand : +64 21 0376434

Singapore : +65 91457800

www.dadabhagwan.org

प्रतिक्रमण विधी

प्रत्यक्ष 'दादा भगवानांच्या' साक्षीने देहधारी .... * च्या मन-वचन-कायेचे योग, भावकर्म-द्रव्यकर्म, नोकर्मांहून भिन्न असे हे शुद्धात्मा भगवान! आपल्या साक्षीने, आजच्या दिवसापर्यंत माझ्याकडून जे जे .... ** दोष झाले आहेत, त्यांची क्षमा मागत आहे. हृदयपूर्वक खूप पश्चात्ताप करीत आहे. आलोचना-प्रतिक्रमण-प्रत्याख्यान करीत आहे. मला क्षमा करा, क्षमा करा, क्षमा करा.

हे दादा भगवान! माझ्याकडून पुन्हा असे कोणतेही दोष केले जावू नये यासाठी परम शक्ती द्या, शक्ती द्या, शक्ती द्या.

* ज्याच्याप्रती दोष झाले असतील, त्या व्यक्तीचे नाव घ्यायचे.

** जे जे दोष झाले असतील ते सर्व मनामध्ये जाहीर करायचे.

[तुम्ही शुद्धात्मा आहात आणि जो दोष करतो त्याच्याकडून प्रतिक्रमण करावयाचे आहे. चंदुभाईकडून दोषांचे प्रतिक्रमण करावयाचे आहे. (वाचकांनी चंदुभाईच्या जागी स्वत:चे नाव समजावे.)]

ISBN 978-93-82128-14-4

9 789382 128144

Printed in India

Price ₹ 40

dadabhagwan.org